# लोकराज्य

सप्टेंबर । २०१३ । किंमत ₹१०

## जादूटोणाविरोधी कायद्याचा अध्यादेश

## उत्तर महाराष्ट्र
















RABHA

# दृष्टिक्षेपात नाशिक विभाग

- दिनांक २० फेब्रुवारी १९८१ रोजी नाशिक विभाग अस्तित्वात आला
- नाशिक विभागामध्ये नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव व अहमदनगर या पांच जिल्ह्यांचा समावेश होतो.
- २००१ च्या जनगणणेनुसार नाशिक विभागातील पाच जिल्हयात एकूण ५४ तालुके असून ६६०३ गावे व ६१ शहरे आहेत
- विभागात नाशिक, मालेगांव,जळगांव, धुळे व अहमदनगर येथे महानगरपालिका , ३५ नगरपरिषदा, २ कटकमंडळ,५४ पंचायत समित्या व ४८९० ग्रामपंचायती आहेत.
- नाशिक विभागाचे भौगोलिक क्षेत्र ५७,८०५ चौ.कि.मी.आहे
- विभागात सर्वात जास्त १७४१३ चौ.कि.भौगोलिक क्षेत्र अहमदनगर जिल्ह्याचे असून सर्वात कमी भौगोलिक क्षेत्र ५०३४ चौ.कि. मी. नंदुरबार जिल्ह्याचे आहे
- विभागाच्या पूर्वेस बुलढाणा, औरंगाबाद, बीड व सोलापूर जिल्ह्यांचा भाग येतो, तर पश्चिमेस पुणे, ठाणे जिल्ह्यांचा आणि गुजरात राज्याचा भाग येतो. उत्तरेस मध्यप्रदेश राज्य असून दक्षिणेस पुणे, सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यांचा भाग येतो
- सन २०११ च्या जनगणनेनुसार नाशिक विभागाची एकूण लोकसंख्या सुमारे १ कोटी ८५ लाख ७१ हजार असून त्यापैकी पुरुष ९६ लाख २ हजार व स्त्रिया ८९ लाख ७० हजार आहेत
- विभागातील एकूण साक्षरतेचे प्रमाण ७५.७१ टक्के असून ग्रामीण भागात ते ७०.८३ टक्के तर नागरी भागात ८७.९६ टक्के आहे
- नाशिक विभागातून गोदावरी, गिरणा, कादवा, प्रवरा, दारणा, तापी, नर्मद, पांझरा, भीमा, मुळा इत्यादी नद्या वाहत असून त्यांच्या काठावर मोठमोठी शहरे वसलेली आहेत.
- या नद्यावर गिरणा , गंगापूर , भंडारदारा , मुळा इ. धरण तसेच उर्ध्व प्रवरा , कुकडी , हतनूर, वाघूर, इत्यादी मोठे प्रकल्प असून पिण्यासाठी, औद्योगिक वापरासाठी व शेतीसाठी पाण्याचा वापर केला जातो
- नाशिक विभागात कांदा व द्राक्ष उत्पादन भरपूर प्रमाणात असून लासलगांव व पिंपळगांव या दोन प्रमुख बाजारपेठा आहेत. या बाजारपेठांमधून शेतीमाल इतर राज्यांना व परदेशातही निर्यात केला जातो
- जळगाव जिल्ह्यात केळीचे उत्पन्न भरपूर होत असून अहमदनगर जिल्ह्यात ऊसाचे उत्पन्न होते



- भारतातील प्रसिद्ध १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्वर येथे आहे
- साडेतीन शक्तीपीठापैकी अर्ध शक्तिपीठ म्हणून प्रसिद्ध असलेले सप्तशृंगी देवीचे देवस्थान सप्तशृंगीगड (वणी) येथे आहे
- अहमदनगर जिल्हयातील शिर्डी येथे प्रसिद्ध साईबाबा मंदिर, सिध्दटेक येथे गणपती व शनी शिंगणापूर येथे शनी मंदिर असून धार्मिकपर्यटनांचे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे . श्रीसंत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ नेवासे येथे लिहिला.
- जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथे पाटणा देवीचे मंदिर असून कोथळी येथे मुक्ताबाईचे देवस्थान आहे.
- नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील प्रकाशा हे तीर्थक्षेत्र प्रति-काशी म्हणून प्रसिध्द आहे
- नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ हे थंड हवेचे ठिकाण आहे तसेच रेहकुरी अभयारण्य व नांदूर मध्यमेश्वर येथील पक्षी अभयारण्य,भंडारदरा ही पर्यटन स्थळे प्रसिद्ध आहेत
- सन २०११-१२ अखेर विभागात १०५ सार्वजनिक रुग्णांलये व ३७५ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत.

वर्ष ६५ वे | अंक ६ | सप्टेंबर २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- विशेष सहकार्य — देवेंद्र भुजबळ
- सहसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम
- मुखपृष्ठ — राभा
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

संपादकीय पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.

संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६

**email :** lokrajya2011@gmail.com
lokrajya@dgipr.maharashtra.gov.in

ई-लोकराज्यसाठी

**Website :** http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२६१६९७६

**e-mail :** lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग

## उत्तर महाराष्ट्र विशेष

महाराष्ट्राच्या इतिहासात प्राचीन काळापासून ते आजतागायत उत्तर महाराष्ट्राचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. धार्मिक राजधानी किंवा दक्षिणेची काशी म्हणून नाशिक ओळखले जाते. आता मुंबई पुण्यानंतर सर्वाधिक गतीने औद्योगिक विकास होण्याचा सन्मान नाशिकने प्राप्त केलाय. सहकाराची पंढरी असलेले अहमदनगर शहर एकेकाळी निजामशाहीची राजधानी होती. आदिवासीबहुल धुळे, नंदुरबार हे दोन्ही जिल्हे त्यांच्या भौगोलिक स्थानामुळे, उत्तर भारताला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरले आहेत. दिल्लीचा मार्ग या दोन जिल्ह्यांतून जातो. साहित्य-कला-संस्कृतीच्या क्षेत्रात या प्रदेशातील नररत्नांनी केलेली कामगिरी अजोड आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे केल्या जाणाऱ्या शेतीचे व पूरक



उद्योगांचे अनुकरण महाराष्ट्राने नेहमीच केले. म्हणूनच उत्तर महाराष्ट्राला महाराष्ट्राच्या शिरपेचातील मुकुटमणी मानले जाते.




## जादूटोणा विरोधी अध्यादेश

अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने राज्यपालांनी जादूटोणा प्रतिबंध अध्यादेश जारी केला आहे.


५९

| | | |
|---|---|---|
| प्रगतीची उत्तर दिशा | संपादकीय | ५ |
| राज्याच्या प्रगतीचा आलेख उत्तर महाराष्ट्र उंचावणार | मुख्यमंत्री | ६ |
| मंत्रभूमीकडून यंत्रभूमीकडे | उपमुख्यमंत्री | ७ |
| कर्तबगार आणि कृतिशील | - - | ८ |
| उत्तुंग झेप | रामदास खेडकर | १४ |
| महाराष्ट्राचा महापूल | रवींद्र ठाकूर | १७ |
| प्रगतीच्या नव्या वळणावर | अनिरुद्ध देवचक्के | १८ |
| जलसमृद्ध | भावेश ब्राह्मणकर | १९ |
| पाटचारी सिंचन : समृद्धीचा नवा मंत्र | रमाकांत पाटील | २२ |
| ऊर्जा विकास | महेश अफले | २३ |
| लोकसहभागातून दुष्काळावर मात | लहू कानडे | २४ |
| स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिज्वाला | मिलिंद चवंडके | २५ |
| कर्तृत्व आणि कीर्ती | अर्चना वि. देशमुख | २९ |
| येवल्याची शान... पैठणीचा सन्मान | देवेंद्र भुजबळ | ३२ |
| वाघाडची यशकथा | टीम लोकराज्य | ३३ |
| द्राक्ष: समृद्धीची नवी दिशा | गोरख पगार | ३४ |
| केळीचा गोडवा | विजय पाठक | ३५ |
| सहकाराचा महामेरू | महादेव कुलकर्णी | ३६ |
| मेडिकल टुरिझमला आरोग्यविज्ञान विद्यापीठाची साथ | स्वप्नील तोरणे | ३७ |
| उज्ज्वल भविष्याची सुवर्णसंधी | अशोक सोनवणे | ३८ |
| सुव्यवस्थेचा संस्कार | मोहिनी राणे -देसले | ४० |
| बोलीभाषेचं माधुर्य | सुभाष अहिरे | ४१ |
| खानदेशी पाहुणचार | मिलिंद दुसाने | ४२ |
| नीतळ-मंगल अमळनेर | प्रा. गजानन शेपाळ | ४४ |
| जनस्थानाची रत्ने | प्रशांत भरवीरकर | ४५ |
| चिरंतन स्मृती | राजेंद्र कलाल | ४७ |
| नंदुरबार : समृद्ध आणि सुसंस्कृत | रणजितसिंह राजपूत | ४८ |
| अनुभूतीची प्रदक्षिणा | भूषण देशमुख | ५३ |
| द्रष्टे निर्णय : अभिनव योजना | मंत्रिमंडळ निर्णय | २८ |
| विज्ञाननिष्ठ समाजसुधारक | किरण केंद्रे | ६३ |
| जादूटोणा प्रतिबंध अध्यादेश-दूर करा तुमचे गैरसमज | रंगनाथ नाईकडे | ६४ |











### माहितीही मिळाली; समस्याही समजल्या

जुलै महिन्याचा कोकण विशेषांक आवडला. अंकाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे. अंकातील मजकूर वाचनीय आहे. मधु मंगेश कर्णिक यांनी लिहिलेला 'बहुरंगी' हा लेख आवडला. मीनल जोगळेकर यांनी घेतलेली खासदार डॉ.भालचंद्र मुणगेकर यांची मुलाखत देशातील परिस्थितीची माहिती देणारी आहे. कोकणातील रोजगार निर्मितीसाठी त्यांनी सुचविलेले पर्याय योग्य वाटतात. डॉ.अरुणचंद्र पाठक यांनी कोकणावर लिहिलेला अभ्यासपूर्ण लेख बरीच माहिती देणारा आहे. प्रा. गौतम केदार ब्रम्हे यांनी कोकणातील बोलीभाषांवर लिहिलेला लेख आवडला. श्रीराम खाडीलकर यांचा लेख वाचून कोकणातील कलाकारांची माहिती मिळाली. कोकणातील लोककला व संस्कृती समजली. हा अंक वाचून कोकणशी संबंधित विविध, संस्कृतीची माहिती मिळाली त्याचबरोबर कोकणातील समस्याही समजल्या. कोकणातील जलदुर्ग, गड,किल्ले याबद्दल माहिती असलेला सदाशिव टेटविलकर यांचा लेख फार आवडला.

**– प्रकाश सोनवेकर,** प्रतिनिधी दै.रामप्रहार, अलिबाग

### कोकणची प्रगती दिसली

जुलै २०१३ चा लोकराज्य मासिकाचा कोकण विशेष हा अंक वाचून समाधान वाटले. लोकराज्य मासिकातून आता नवीन-नवीन माहिती आकर्षक व वाचनीय स्वरूपात वाचकांपर्यंत पोहोचत आहे. बदलत्या परिस्थितीत कोकणसुद्धा कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रात प्रगतिपथावर वाटचाल करत असल्याचे या अंकामुळे दिसून येते. या विशेषांकात कोकणची समृद्धी, इथल्या परंपरा, थोर व्यक्तिमत्त्वे, बोलीभाषांची माहिती, कलाकारांची महती, लोकसंस्कृतीचा वेगळेपणा, कोकणातील गडकिल्ले तसेच धार्मिक, ऐतिहासिक स्थळांची माहिती प्रसिद्ध झाली आहे. एकंदरीत हा अंक वाचनीय व संदर्भासाठी संग्राह्य ठेवावा असा आहे.

**– सुरेश पाटील,** माहिती, शिक्षण संवादतज्ज्ञ
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग.





### कोकण अनुभवला

जो कोकण अनुभवतो अगदी त्याच कोकणचे दर्शन आपण लोकराज्यमधून घडवले. ७२० कि.मी. लांब पसरलेल्या कोकण किनारपट्टीला केवळ समृद्ध





निसर्गच नव्हे तर इतर संपदाही मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याची जाणीव हा अंक वाचताना वारंवार होते. आदिवासी प्रगतीचा ठाणे प्रयोग असो किंवा कोकण रेल्वे असो किंवा दुर्गमुद्रा असोत लेखकांनी अतिशय मेहनत करून प्रस्तुत अंकात त्याचे मनोरम दर्शन घडविले.

– डॉ. गणेश मा. अग्निहोत्री, प्राचार्य,
पी.एन.पी.कॉलेज, अलिबाग.

### कोकण दर्शन

लोकराज्यच्या जुलै २०१३ या अंकामधून कोकणची सविस्तर माहिती मिळते. प्रचंड आणि विस्तृत तपशीलवार माहिती एखाद्या मायक्रोफिल्ममध्ये संग्रहित करावी अशी आहे. कोकणचा इतिहास, कला, लोककला, संस्कृती, बोलीभाषा, गडकिल्ले, मंदिरे, पिके, खाद्यसंस्कृती, शिल्पकला, चित्रकला, शेतीबागायती, मत्स्यव्यवसाय, औद्योगिक प्रगती, साहित्य, पर्यटन आणि कोकणरत्ने याविषयी बहुविध माहितीने हा अंक परिपूर्ण आहे. या अंकातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लेखकांचे लेख वाचल्यावर विषयाशी संबंधित त्यांच्या अभ्यासाची कल्पना येते. सोबत यथार्थ छायाचित्रेही आहेत. हा अंक म्हणजे कोकण दर्शनच आहे.





**– भाऊ सिनकर,** ज्येष्ठ पत्रकार, अलिबाग

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

**वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी
http://dgipr.maharashtra.gov.in

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# प्रगतीची उत्तर दिशा



लोकराज्यच्या कोकण विशेष अंकाला मिळालेल्या उत्कृष्ट प्रतिसादानंतर आम्ही उत्तर महाराष्ट्र विशेषांक प्रकाशित करत आहोत. उत्तर महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक जनजीवनाचा धावता आढावा या अंकात येण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

उत्तर महाराष्ट्राचे स्थान महाराष्ट्रात वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. सह्याद्री, सातपुडा या डोंगररांगा, तापी, गोदावरी, गिरणा, भीमा, प्रवरा या नद्यांमुळे या भागाच्या समृद्धीमध्ये भर पडली आहे. उत्तर महाराष्ट्राला ५८ हजार चौ.कि.मी. चे क्षेत्र लाभले आहे. आदिवासी समुदाय या भागात मोठ्या संख्येने राहतो. राज्याच्या एकूण आदिवासींच्या साधारणत: २१ टक्के आदिवासी उत्तर महाराष्ट्रात राहतात. उत्तर महाराष्ट्राचा भाग असलेल्या खानदेशात भिल्ल, पावरा, कोळी, गावीत, तडवी, धानकर, कोकणा अशा ५५ टक्के आदिवासींचे वास्तव्य आहे.

सिंधु संस्कृतीशी साधर्म्य असणारे अवशेष खानदेशात सापडले आहेत. काही अभ्यासकांच्या मते तापी, गिरणा प्रदेशात महाराष्ट्राच्या संस्कृतीचा उदय झाला. उत्तर महाराष्ट्रातील जोर्वे, नेवासा, इनामगाव, सावळदा, बहुरूपा बहाळ, टेकवाडा या ठिकाणी झालेल्या उत्खननातसुद्धा ताम्रपाषाणयुगीन वसाहती आढळल्या. तापी खोऱ्यात सर्वप्रथम कृषी संस्कृतीचा विकास झाल्याचे समजले जाते. पारंपरिक समजुतीनुसार प्रभु रामचंद्राच्या वास्तव्याने पुनित झालेले दंडकारण्य, महाभारतकालीन अश्वत्थाम्याच्या भटकंतीचे सातपुडा, हिडिंबा अरण्य याशिवाय सप्तशृंगी, कुंभमेळ्याचे स्थान असलेले नाशिक-(दक्षिण काशी) त्र्यंबकेश्वर, नेवासे, शिर्डी, शनी शिंगणापूर, पर-काशी म्हणजेच तापी काठावरील प्रकाशे हे तीर्थस्थान, अशी महत्त्वाची श्रद्धास्थाने उत्तर महाराष्ट्रात येतात.

राणी लक्ष्मीबाई, चांदबीबी, अहिल्याबाई होळकर, दादासाहेब फाळके, स्वातंत्र्यवीर सावरकर, बहिणाबाई चौधरी, मधुकरराव चौधरी, ना.धों.महानोर यांच्यासह विविध क्षेत्रात उत्तुंग यश प्राप्त केलेल्या अनेक कर्तृत्ववान व्यक्तींची ही जन्मभूमी आहे.

उत्तर महाराष्ट्रात येणाऱ्या नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव या पाचही जिल्ह्यांची स्वतंत्र अशी प्रतिमा असून त्यांच्या एकत्रीकरणातून; या प्रदेशाला गतिमानतेने होणाऱ्या विकासोन्मुख प्रदेशाचा चेहरा प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्राच्या धार्मिक राजधानीचा सन्मान प्राप्त असणाऱ्या नाशिकमध्ये हिंदुस्थान एरोनॉटिक्स, चलनी नाणे टांकसाळ, नोटा, मुद्रांक छपाई कारखाना, संरक्षण क्षेत्रातील आर्टिलेरी केंद्र, वाहन उद्योग, वाइन उद्योग, विविध प्रकारच्या उच्चतांत्रिक शैक्षणिक सुविधा, पर्यटन स्थळे आहेत. मुंबई-पुणे-ठाणे नंतर उद्योजकांची गुंतवणुकीसाठी पहिली पसंती नाशिक असते. आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत आणि लासलगावमध्ये आहे. देशातील ७० ते ८० टक्के कांद्याचे उत्पादन या ठिकाणी होते. देशातील सर्वोत्कृष्ट वाइन नाशिकमध्ये होत असून देशाचे 'वाइन हब' होण्याकडे नाशिकने झेप घेतली आहे.

जळगाव जिल्ह्याने केळीच्या उत्पादनात देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. साधारणत: दरवर्षी ९५० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल केळीच्या व्यापारातून होते. उत्तर महाराष्ट्रातला वस्त्रोद्योगही उत्तमरीत्या विकसित झाला आहे. मालेगाव हे त्याचे प्रमुख केंद्र आहे. येवल्याची पैठणी ही कलात्मक पैठणीच्या निर्मितीसाठी जगप्रसिद्ध आहे. धुळे जिल्ह्यातील नरडाणा येथे मोठे टेक्सटाइल पार्क विकसित होत असून त्यामुळे रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या विपुल संधी उपलब्ध होऊ शकतात. अहमदनगर जिल्ह्यात राज्यातील सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. महाराष्ट्रात सर्वाधिक साखर कारखाने या जिल्ह्यात आहेत. सहकार महर्षी विठ्ठलराव विखे पाटील यांनी लावलेल्या सहकाराच्या रोपट्याचा वटवृक्ष झाला असून यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा कायापालट झाला आहे.

उत्तर महाराष्ट्रात अनेक ऐतिहासिक स्थळे, धार्मिक स्थळे, निसर्गरम्य स्थळे आणि वाइन पार्क असल्याने इथे पर्यटन विकासाची मोठी संधी निर्माण झाली आहे. या भागात दळणवळण आणि विकासाच्या उत्कृष्ट सुविधा असल्याने अधिकाधिक पर्यटक या भागाकडे आकर्षित होत आहेत. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने घेतलेल्या पुढाकारामुळे 'मेडिकल टुरिझम' चे क्षेत्रही या भागात विकसित होत आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे शिक्षणाची गंगोत्री ठरले असून राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे आणि कालावधीचे अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाने कृषी क्षेत्रातील संशोधनाला चालना दिली असून राज्यातील हरितक्रांतीमध्ये या विद्यापीठाने बजावलेली भूमिका महत्त्वाची ठरते.

हिवरेबाजार, राळेगणसिद्धी या आदर्श गावांनी पाणलोट क्षेत्रात केलेले कार्य देशस्तरावर नावाजले गेले. ही गावे देशातील इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरली आहेत. धुळे जिल्ह्यातील 'शिरपूर पॅटर्न' सुद्धा पाणी समस्येवर मात करणारा प्रभावी उपाय म्हणून झपाट्याने समोर आला आहे.

उत्तर महाराष्ट्राच्या समृद्धीमध्ये या भागातील ५ मोठे, १८ मध्यम आणि २९४ लघुप्रकल्पांमुळे लक्षावधी हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन फळबागा फुलल्या, कृषी उत्पादनात वाढ झाली आणि औद्योगिक विकासालाही चालना मिळाली.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात उत्तर महाराष्ट्राने मोठे योगदान दिले. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात या भागातील नागरिक सहभागी झाले होते. १९४२ च्या चलेजाव आंदोलनात नंदुरबार येथील विद्यार्थ्यांनी काढलेल्या मिरवणुकीचे नेतृत्व शिरीषकुमार या शाळकरी मुलाने केले. राष्ट्रध्वजाचे रक्षण करताना गोळीबारात शिरीषकुमारचा बळी गेला. शिरीषकुमारच्या बलिदानाची गाथा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, साने गुरुजी, सेनापती बापट, स्वातंत्र्यवीर सावरकर आदी थोर व्यक्तींनी स्वातंत्र्यलढ्यासाठी आपले योगदान या ना त्या रूपात दिले आहे. खानदेशातील फैजपूर येथे झालेले काँग्रेसचे सुवर्ण महोत्सवी अधिवेशन ही स्वातंत्र्ययुद्धातील एक महत्त्वाची घटना समजली जाते. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष स्व.धनाजीनाना चौधरी आणि पूर्व खानदेशचे गांधी म्हणून ज्ञात असलेले स्व.हरिभाऊ चव्हाण यांची नावे आदराने घ्यावी लागतील. कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, स्मिता पाटील या प्रतिभावंतांनी उत्तर महाराष्ट्राला देशविदेशात लौकिक प्राप्त करून दिला आहे. स्वातंत्र्यसैनिक लीलाताई पाटील, डॉ.प्रतिभाताई पाटील, शिवाजीराव पाटील, नजुबाई गावित, डॉ.मेबल आरोळे, नीलिमा मिश्रा, धावपटू कविता राऊत, अंजना ठमके यांचाही गौरवपूर्ण उल्लेख करणे आवश्यक आहे.

उत्तर महाराष्ट्राची ही सारी वैशिष्ट्ये ध्यानात घेऊन हा अंक सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

या अंकात जादूटोणा विरोधी कायद्याचा अध्यादेश वाचकांच्या माहितीसाठी समाविष्ट केला असून त्यातील तरतुदी आणि माहितीपर लेख उद्बोधक ठरतील असा विश्वास वाटतो.

लोकराज्यच्या इतर अंकाप्रमाणेच हा अंकही वाचकांना आवडेल अशी खात्री आहे.

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in

# राज्याच्या प्रगतीचा आलेख उत्तर महाराष्ट्र उंचावणार



**पाणीसाठवण असो की आदर्श गाव असो, विकासाच्या अनेक कल्पनांची बीजं उत्तर महाराष्ट्रातून आली आहेत आणि राज्याला मार्गदर्शक ठरली आहेत. राज्याचा विकास साधताना प्रादेशिक असमतोल दूर करणे, हे आमचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या अंगभूत गुणांमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरलेल्या उत्तर महाराष्ट्राला विकासाची समान संधी देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे......सांगत आहेत, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.**

महाराष्ट्राच्या विकासात उत्तर महाराष्ट्राची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे. आगामी काळात महाराष्ट्राच्या प्रगतीचा आलेख उंचावताना त्यात उत्तर महाराष्ट्राचे योगदान मोठे राहणार आहे. केंद्र सरकार पुरस्कृत दिल्ली – मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर हा उद्योग महामार्ग धुळे–नाशिक या जिल्ह्यांमधून जाणार असल्याने या भागाकडे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वळणार आहे.

विकासाचा आणि त्यासाठी होऊ घातलेल्या गुंतवणूकीचा ओघ पाहता या परिसरातील पायाभूत सुविधा, दळणवळण आणि पाण्याची उपलब्धता यासाठी शासन नियोजनबद्ध पद्धतीने मार्गक्रमण करीत आहे. या उद्योग महामार्गाच्या अनुषंगाने या परिसरातील धुळे, जळगावसारख्या कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्येच टेक्सटाइल पार्क उभारून कापूस ते कापड ही सर्व प्रक्रिया करणारे उद्योग एकाच ठिकाणी येणार आहेत. यामुळे कापसाला चांगला भाव मिळतानाच त्यावर होणाऱ्या प्रक्रिया उद्योगात स्थानिक भूमिपूत्रांसाठी रोजगाराच्या हजारो संधीही निर्माण होतील.

देशात केळीचे सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्या जळगाव जिल्ह्यात केळीची साठवण, त्यावरील प्रक्रिया, निर्यात सुविधांचे जाळे उभारण्यात येणार आहे. तीच बाब नाशिकच्या द्राक्षांसाठीही करण्यात येत आहे. द्राक्षांवर प्रक्रिया करून बेदाणे तयार करणे, वाइननिर्मिती यासारख्या प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी शासन प्रयत्न करते आहे. या माध्यमातून विदेशी चलन उपलब्ध होतानाच रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर शासनाचा भर आहे.

दळणवळणाच्या सुविधांचे जाळे या भागात विकसित केले जात आहे. मुंबई–आग्रा महामार्गाचे चौपदरीकरण पूर्णत्वास येत आहे. आवश्यक त्या ठिकाणी गरजेनुसार सहापदरी रस्ते करण्यात येत आहेत. नाशिकमधील ६.१ किमी लांबीच्या उड्डाणपुलाला स्थापत्य अभियांत्रिकीच्या दृष्टीनं महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. नाशिकच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असलेला नाशिक–पेठ–सुरगाणा–सुरत या मार्गाला राष्ट्रीय महामार्ग म्हणून मान्यता केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने दिली असून या महामार्गाचे कामही लवकरच सुरू होईल, असा आम्हाला विश्वास आहे.

नाशिकजवळच्या ओझरनजीक प्रवासी विमानतळ विकसित करण्याचे काम सुरू झाले आहे. त्या दृष्टीने आवश्यक ती परवानगी केंद्राकडून मिळवण्यात आली आहे. या ठिकाणी ३०० प्रवासीक्षमतेची एअर टर्मिनल बिल्डिंग उभारण्यात येत असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाने, एचएएल या कंपनीसोबत करारही केला आहे. शिर्डी येथील धार्मिक पर्यटनाचे वाढते महत्त्व पाहता तेथेही अद्ययावत विमानतळ उभारण्यात येत आहे.

उत्तर महाराष्ट्रात धार्मिक आणि निसर्ग पर्यटनासोबतच कृषी व वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्याचा आमचा प्रयत्न आहे. तोरणमाळसारखे महाराष्ट्रातले दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण असो किंवा गिर्यारोहकांना साद घालणारे कळसुबाई शिखर किंवा अंकाई–टंकाईचे किल्ले यासारखे परिसर साहसी पर्यटनासाठी विकसित करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. केंद्र शासनाच्या मदतीने उत्तर महाराष्ट्रात रेल्वेमार्गांचे जाळे विकसित करण्यासाठीही प्रयत्न सुरू असून त्यांना यशही येत आहे. बहुप्रतिक्षित मनमाड–धुळे–इंदूर या रेल्वेमार्गाला मंजुरी मिळाली असून त्यासाठी लागणाऱ्या खर्चात राज्यशासनाने आपला वाटा देऊ केला आहे. त्याचप्रमाणे नाशिक–पुणे या रेल्वेमार्गालाही मंजुरी मिळाली आहे. १,८९९.६४ कोटी रुपयांच्या या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन ९५० कोटी रुपये देणार आहे.

सुवर्णजयंती राजस्व अभियानांतर्गत नाशिक विभागात ८,८३२ शिबिरांचे आयोजन करून ४ लक्ष ९८ हजार ६५८ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागात पाणंद रस्ते मोकळे करण्याच्या कार्यक्रमाद्वारे ४१९९.८८ कि.मी. लांबीचे ३०२७ रस्ते या विभागात मोकळे करण्यात आले.

२०१५–१६ मध्ये नाशिकच्या तीर्थभूमीवर सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होत आहे. त्यासाठी शासनाचे सर्व विभाग सज्ज झाले आहेत. यानिमित्त जवळपास २०६० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा प्रस्तावित आहेत. त्यामुळे नाशिक शहरात कायमस्वरूपी पायाभूत सुविधांची निर्मिती होईल.

दुष्काळावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी शासनाने साखळी सिमेंट नालाबांध बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला. या कल्पनेची बीजं शिरपूर पॅटर्नमध्ये आहेत. त्याचप्रमाणे राळेगणसिद्धी, हिवरेबाजार यासारखी आदर्श गावंही राज्याला मार्गदर्शक ठरली आहेत. ही सर्व या उत्तर महाराष्ट्राची देणगी आहे.

**(शब्दांकन: सतीश लळीत,**
मा. मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी)

# मंत्रभूमीकडून यंत्रभूमीकडे



**उत्तर महाराष्ट्रात वाहतूक व्यवस्था, पाणी, जमीन आणि कच्च्या मालाची मोठ्या प्रमाणात उपलब्धता आहे. प्रक्रिया उद्योगालाहि येथे मोठ्या प्रमाणावर वाव आहे. त्याचा अधिकाधिक उद्योजकांनी लाभ घेणे आवश्यक आहे. शासनस्तरावरून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम सुरूच आहे. कारण उत्तर महाराष्ट्रासह संपूर्ण राज्याचा आपल्याला सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधायचा आहे. सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार**

भारताच्या नकाशात जवळपास मध्यवर्ती ठिकाणी उत्तर महाराष्ट्राचा भूभाग आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्राला महामार्ग आणि रेल्वेचे जाळे लाभले आहे. धुळे महामार्गांचे जंक्शन आहे. उत्तर महाराष्ट्राचा सर्वाधिक भाग व्यापणाऱ्या मुंबई-नाशिक-धुळे या महामार्गाचे चौपदरीकरण पूर्ण झाले आहे. अहमदनगरला पुणे आणि औरंगाबादशी जोडणाऱ्या महामार्गाचेही चौपदरीकरण झाले आहे. नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि अहमदनगर या पाचही जिल्ह्यांच्या मुख्यालयांना रेल्वेची सुविधा उपलब्ध आहे. नाशिक-पुणे रेल्वेगाडी सुरू होण्याच्या मार्गावर आहे. शिर्डीला जाणाऱ्या भाविकांसाठी रेल्वेची चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रस्तावित मनमाड-धुळे-इंदौर आणि नाशिक-पुणे लोहमार्गासाठी आर्थिक वाटा उचलण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली आहे. विभागात नियमित विमानसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नाशिक येथून लवकरच प्रवासी विमानसेवा अपेक्षित आहे. शिर्डी विमानतळ उभारणीची प्रक्रियाही सुरू आहे.

महाराष्ट्राच्या सहकारी साखर उद्योगाची बीजे उत्तर महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात रोवली गेली होती. अहमदनगर जिल्ह्याने प्रतिकूलतेवर मात करून शेती क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करून दाखवली आहे. राहुरीच्या महात्मा जोतिबा फुले कृषी विद्यापीठाने शेती विकासात मोलाची भर घातली आहे.

नाशिकची वाटचाल मंत्रभूमीकडून यंत्रभूमीकडे झाली असली तरी कुंभमेळ्याच्या दृष्टीने नाशिकचे आध्यात्मिक महत्त्व कायम आहे. आगामी कुंभमेळ्यासाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे. नाशिक जिल्हा द्राक्षांपाठोपाठ आता वाइन उद्योगाचा जिल्हा म्हणूनही नावारूपास आला आहे. द्राक्ष उत्पादकांच्या अडचणी सोडवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कांदाचाळीसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना बऱ्याचवेळा नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागले आहे. त्यांना वेळोवेळी मदत करण्यात येत आहे. येथील डाळी उद्योगालाही प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या आसोदा या जन्मगावी एक सुंदर स्मारक साकार होणार आहे. जळगाव जिल्हा ही साने गुरुजींची कर्मभूमी होती. त्यांच्या विचारांची 'साधना' आजही आपल्याला प्रेरणादायी आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या संशोधनामुळे धुळ्यात समृद्ध इतिहासाचा ठेवा साकारला आहे. धुळे जिल्ह्यातील साक्री आणि शिरपूर तालुका, नंदुरबार जिल्हा आपली आदिवासी संस्कृती जोपासत आहे. आदिवासी समाजातील लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या साहित्यकृतींचा गौरव करण्याच्या उद्देशाने आदिवासी साहित्य पुरस्कार सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. बारावीनंतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना 'लॅपटॉप' दिले जाणार आहेत. मुलीचा जन्म होताच तिच्या नावे सुरक्षा ठेव ठेवण्याची 'आदिवासी किशोरी सुरक्षा ठेव योजना' सुरू करण्यात येणार आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून नाशिक, जळगाव आणि नंदुरबार येथे सामाजिक न्यायभवन उभे राहिले आहे. नाशिक येथे विभागस्तरीय एक हजार मुला-मुलींचे वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. इतर ११ शासकीय वसतिगृहदेखील कार्यान्वित केली आहेत. विभागात दहा निवासी शाळासुद्धा सुरू केल्या आहेत. येवल्याच्या मुक्तिभूमीचं ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन तिथे यथोचित स्मारक साकारले जात आहे. जात पडताळणीची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी अहमदनगर आणि जळगाव येथे नवीन विभागीय जातपडताळणी समित्या स्थापन करण्यात येणार आहेत.

विभागातील सिंचन प्रकल्पांसाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. तापी नदीवरील सुलवाडे, सारंगखेडा आणि प्रकाशा या तीन बॅरेजचे काम पूर्णत्वास गेल्याने पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत झाली आहे. भर उन्हाळ्यातही आता तापीचे पात्र तुडुंब भरलेले असते. त्यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होण्यास मदत होत आहे.

उत्तर महाराष्ट्रात आता शिक्षणाच्या सोयी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. पारंपरिकबरोबरच तांत्रिक आणि वैद्यकीय शिक्षणाच्या सोयी-सुविधांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. नाशिक, अहमदनगर आणि जळगाव जिल्ह्यामध्ये दर्जेदार शैक्षणिक संकुले उभी राहत असल्याने त्यामुळे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत आहे. नंदुरबार येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजुरी दिली आहे. उत्तर महाराष्ट्राने सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने उंच झेप घेतली आहे. त्याचा उपयोग महाराष्ट्राच्या समृद्धीत वाढ होण्यास होणार आहे.

**(शब्दांकन: जगदीश मोरे,**
उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी)

उत्तर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे सार्वजनिक बांधकाम व पर्यटन मंत्री छगन भुजबळ, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, आदिवासी विकास मंत्री मधुकर पिचड, कृषी मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ. विजयकुमार गावित, क्रीडा व युवक कल्याण मंत्री डॉ. पद्माकर वळवी, राज्यमंत्री संजय सावकारे तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातील सामाजिक न्याय राज्यमंत्री माणिकराव गावित आणि इतर लोकप्रतिनिधींनी या प्रदेशाला विकासाच्या नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. या भागात झालेल्या विविध विकासकामांमुळे उत्तर महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला आहे.

# कर्तबगार आणि कृतिशील

## छगन भुजबळ, मंत्री, सार्वजनिक बांधकाम




नाशिक जिल्हा आता विकासाच्या वाटेवर आहे. नाशिकला जगातील १६ व्या क्रमांकाचे विकसनशील शहर म्हणून गौरव प्राप्त झाला आहे. उत्तर महाराष्ट्राचे प्रवेशद्वार म्हणून नाशिकची ओळख आहे. दहा वर्षापूर्वी येवल्याचे प्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या छगन भुजबळ यांच्याकडे नाशिकच्या पालकमंत्रीपदाची सूत्रे सोपवली गेली. त्यानंतर जिल्ह्याच्या विकासाला गती मिळाली.

नाशिकच्या विकासात गेल्या पाच वर्षात आमूलाग्र बदल झाला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे उद्योगांना मिळणारा पाणीपुरवठा भविष्यात कमी होण्याची शक्यता असल्यामुळे एमआयडीसीसाठी कळमुस्ते या स्वतंत्र प्रकल्पाची निर्मिती करण्यात येणार आहे. पश्चिम वाहिन्या नद्यांचे पाणी अरबी समुद्रात वाहून जात असल्यामुळे ते अडवून दुष्काळी भागातील पाण्याची गजर भागवली जात आहे.

नाशिक ही कृषी उत्पादनाची संपूर्ण देशाची राजधानी आहे. महाराष्ट्र राज्याचा कृषिपतपुरवठा आराखडा ३५ हजार कोटीचा आहे. तर एकट्या नाशिकचा तो ७ हजार कोटीचा आहे. नाशिकमध्ये कांदा, द्राक्ष, डाळिंब, फुले, भाजीपाला या कृषी उत्पादनाला आणि त्यावर प्रक्रिया करण्याला व निर्यातीला खूप मोठी संधी आहे. गेल्या दहा वर्षांत येवला तालुक्यात शेकडो बंधारे केल्यामुळे येवल्यातील कांदा, कापूस, मका पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढली आहे. या ठिकाणी पतसंस्थेच्या, सहकारी व राष्ट्रीयकृत बँकेच्या संख्येत वाढ झाली. त्यामुळे ठेवी वाढल्या आहेत.

मुंबई-आग्रा महामार्ग चौपदरीकरण



**नाशिकमध्ये सुरू असणारी विविध विकास कामे**

दीर्घकाळ रखडलेल्या नाशिक-पुणे लोहमार्गाच्या कामाला लवकरच सुरुवात होऊन नाशिक आणि पुणे या दोन्ही शहरांच्या लोहमार्ग जोडणीच्या कामाला प्रारंभ होणार आहे. या रेल्वेमार्गाच्या संपूर्ण प्रकल्पाची किंमत रु. १८९९.६४ कोटी आहे. महाराष्ट्राने या प्रकल्पासाठी अर्धा वाटा म्हणजे रु. ९५० कोटी देण्याचे मान्य केले आहे.

दिल्ली हाटच्या धर्तीवर नाशिकमध्ये कलाग्राम अर्थात नाशिक हाट हा प्रकल्प उदयास येत आहे. त्यामुळे नाशिक शहराजवळ कायमस्वरूपी प्रदर्शन व विक्रीची व्यवस्था होणार आहे. याचा सर्वात मोठा फायदा महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळण्यासाठी होणार आहे.

**कन्व्हेन्शन सेंटर** - राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या परिषदांसाठी आधुनिक कन्व्हेन्शन सेंटर होणार आहे.

गोंदेश्वर हे सिन्नर शहरी वसलेले शिवमंदिर असून याची रचना हेमाडपंथी आहे. मेगा डेस्टिनेशन आणि नाशिक विकास पॅकेज या दोन्ही योजनेच्या माध्यमातून प्राचीन अशा गोंदेश्वर मंदिराला पुनर्वैभव प्राप्त होणार आहे. या मंदिरालगत असलेला तलावही भविष्यात विकसित करण्याचे नियोजन आहे. सुमारे २१ एकर जागेवर पर्यटन स्थळाचा विकास करण्यात येत आहे.

मुंबई आणि ठाणे येथील पर्यटकांचे आकर्षण असलेले इगतपुरी तालुक्यातील घाटनदेवी या पर्यटन स्थळाच्या विकासासाठी केंद्राचा निधी मिळवला आहे.

कुंभमेळ्याचे स्थान असलेल्या कपिलधाराच्या तीर्थविकासासाठी केंद्राचा निधी मिळवला आहे. गोदावरीचे उगमस्थान असलेल्या ब्रह्मगिरीला अनेक भाविक जात असतात. त्या ठिकाणी रोप-वे बनवण्यात येणार आहे. अंजनेरी येथे साहसी पर्यटकांसाठी ट्रेकिंगसंस्था व पर्यटन सुविधा करण्यात येणार आहे.

नाशिकरोड रेल्वे स्थानकाचे विमानतळाच्या धर्तीवर आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

नाशिक शहरासाठी मेट्रो रेल्वे व्हावी म्हणून मेट्रो रेल्वे कार्पोरेशन व शहरी विकास मंत्रालय यांच्याकडे सातत्याने पाठपुरवा केला जात आहे. ओझर, सिन्नर, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर या ठिकाणी अर्ध्या तासात

पोहचता यावे यासाठी रॅपिड रेलच्या संकल्पनेबाबत विचार केला जात आहे.

नाशिकमधील पर्यटनाला चालना देण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या बोट क्लबचे काम जोत्यापर्यंत पूर्ण झाले आहे. गोड्या पाण्यातील जलक्रीडा केंद्र, साहसी, चित्तथरारक खेळांचे केंद्र गंगापूर धरणस्थळी विकसित करण्याचे काम पर्यटन विकास महामंडळ आणि केंद्रीय निधीतून सुरू आहे.

नाशिक महापालिका हद्दीतील द्वारका ते बिटको चौक हा साडेपाच किलोमीटर रस्ता सध्या चारपदरी असून या रस्त्यावरील वर्दळ, तसेच मुंबई, गुजरातवरून शिर्डीला जाणाऱ्या भाविकांची गर्दी लक्षात घेता या रस्त्याचे सहापदरीकरण करण्याची गरज दिवसेंदिवस वाढत होती. त्या दृष्टीने पावले उचलण्यात आली आहे. नाशिक-सिन्नर महामार्गाच्या कामासाठी ३१२.९६ कोटी रुपये खर्च येणार आहे. नाशिक-सिन्नर या रस्त्याची लांबी २५.३१ कि.मी. होणार आहे. या महामार्गाच्या उभारणी कामात अडथळे असणाऱ्या विविध शासकीय विभागाच्या सेवा वाहिन्यांचे स्थलांतर सुरू आहे. सर्व तांत्रिक प्रक्रिया आगामी दोन महिन्यात पूर्ण होऊन पावसाळ्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.

नाशिक -पुणे महामार्गावरील खेड-सिन्नर रस्ता चौपदरीकरणाच्या १३७.९४ किलोमीटर कामाला केंद्र सरकारच्या मूलभूत सुविधा समितीने मंजुरी दिली आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील पिंपळगाव-नाशिक-गोंदे या ६० किमी मार्गावर सहापदरी रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ६.१ कि. मी. लांबीचा नाशिक शहरातील एलिव्हेटेड कॉरीडोर या डिझायनचा हा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा लांबीचा उड्डाणपूल आहे. या उड्डाणपुलामुळे नाशिक शहरातून बारापदरी रस्ता वाहतुकीसाठी तयार झाला आहे.

**नाशिक विमानतळ**

ओझर येथील नाशिक विमानतळ हा दिवाळीपर्यंत प्रवाशांच्या सेवेसाठी खुला होईल. या ठिकाणाहून देशी विदेशी विमाने येतील आणि जातील. सध्या मुंबई विमानतळावर पार्किंगसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे विदेशी विमाने अहमदाबादला पार्किंगला जातात. ही विमाने नाशिकला आल्यास आपोआपच नाशिककरांना अल्पखर्चात मुंबईत तसेच देशविदेशात जाता येईल.

येवला तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून केलेली कामे पुढीलप्रमाणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्तिभूमी, मांजरपाडा प्रकल्प क्र. १, पुणेगाम्रा-दरसवाडी-डोंगरगाव पोहच कालवा, पैठणी क्लस्टर, ग्रामीण पर्यटन केंद्र येवला, महात्मा फुले नाट्यगृह, येवला, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर घाट, येवला ३८ गाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, येवला नगरपालिका पाणी पुरवठा योजना.

## राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री



कृषी व पणन मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक उत्थानासाठी अनेक कल्याणकारी निर्णय घेतले. त्याचे दृश्य परिणाम आता दिसून येत आहेत. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात घेतलेल्या निर्णयानुसार विदर्भ पॅकेजंतर्गत गैरव्यवहारास कारणीभूत ठरलेल्या ४०३ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक प्रशासकीय कारवाई केली. प्रशासन गतिमान व पारदर्शक करण्यासाठी कृषि साहाय्यकांना लॅपटॉप व संगणक देण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी २००० कोटींहून अधिक उलाढाल असलेली ठिबक व तुषार सिंचन योजना ऑनलाइन करून अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला. जागतिक निविदा प्रक्रियेद्वारे ठिबक व तूषारसंचाचे दर निश्चित केल्यामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात २५ ते ३० टक्क्यांपेक्षा अधिक बचत झाली. राज्य निधीतून सूक्ष्म सिंचनासाठी ४०० कोटीचा अतिरिक्त निधी मंजूर करून घेतला. देशात प्रथमच गाव पातळीवरील पीकरचना व खतांच्या वापराबाबतची माहिती संकलित करून गाव घटक धरून कृषी निविष्ठांचे नियोजन केल्यामुळे केंद्र शासनाने याची नोंद घेतली. खते बी-बियाणाचा काळाबाजार थांबविण्यासाठी प्रथमच शेतकऱ्यांना टोल फ्री क्रमांक १८००-२३३-४००० सुरू केला. त्यावर ८१००० हून अधिक कॉल्स प्राप्त झाले. या तक्रारीवरील कारवाईसाठी राज्यात ३९३ दक्षता पथकांची निर्मिती केली. एक लाखाहून अधिक निविष्ठा केंद्राची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणारी केंद्रे बंद केली.

बिटी कापूस बियाणाबाबत सरकारशी सहकार्याचे धोरण न ठेवणाऱ्या महिकोसारख्या कंपनीचा विक्री परवाना रद्द केला. निविष्ठांची उपलब्धता, विक्री दराबाबत वृत्तपत्रात जाहिरात करून संपूर्ण पारदर्शकता आणली.

खताची ओढाताण थांबवण्यासाठी जिल्हास्तरावर बफर स्टॉक व गाव पातळीवरील नियोजन यशस्वी ठरले. बांधावर खत वाटपासारख्या उपक्रमांमुळे शेतकरी गट एकत्र आले. त्यामुळे छापील किंमतीपेक्षा कमी किमतीत खताची उपलब्धता झाली.

बीजोत्पादन वाढवण्यावर जोर देण्यात आला. खाजगी कंपन्यांकडून संशोधित वाणांच्या नावाखाली, बाजारात नवनवीन बियाणे आणून होणाऱ्या फसवणुकीस आळा घालण्यासाठी; खाजगी कंपन्यांमार्फत राज्यात कोणतेही नवीन वाण विक्रीपूर्वी कृषी विद्यापीठस्तरावर २ वर्षे अभ्यासाअंती व त्यांच्या शिफारशीनंतरच, बियाणे विक्री करण्याच्या निर्णयामुळे वाणांची संख्या मर्यादित राहिली.

कृषी धोरणात शेतकऱ्यांचे प्रतिबिंब उमटण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'आत्मा' यंत्रणेच्या माध्यमातून तालुका व जिल्हा



**जागतिक हवामान बदलाच्या शेतीवरील परिणामाच्या अभ्यासाकरिता, महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारणीच्या १०० कोटीहून अधिक रकमेचा प्रकल्प खाजगी गुंतवणूकदारांच्या माध्यमातून राज्यात सुरू आहे. त्यामुळे मोबाइल, एसएमएस, एफएम, रेडिओच्या माध्यमातून सल्ला दिला जाणार आहे.**

पातळीवर शेतकरी सल्ला समिती, गाव पातळीवर शेतकरी मित्र अशी रचना निर्माण केली.

कोरडवाहू शेतीला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी १०,००० कोटी रुपये नियतव्यय असलेले कोरडवाहू शेती अभियान सुरू केले. राष्ट्रीय कृषी विमा योजनेत बदल करून जोखीम स्तर वाढवल्यामुळे रब्बी हंगाम २०११-१२ मधील शेतकऱ्यांनी भरलेल्या २७.२३ कोटी विमा हप्त्याच्या तुलनेत १३५.७० कोटी नुकसानभरपाई मिळाली. खरीप २०१२ मध्येही २०० कोटीहून अधिक नुकसान भरपाई मिळणार आहे.

देशात प्रथमच फळपिकासाठी हवामानावर आधारित पीक विमायोजना २०११-१२ पासून राज्यात सुरू केल्यामुळे पहिल्याच वर्षी शेतकऱ्यांना ४१ कोटींपर्यंत नुकसान भरपाई मिळाली. २०१२ च्या मृगबहरात संत्रा, मोसंबी, पेरू पिकांसाठी शेतकऱ्यांना १६ कोटींहून अधिक नुकसान भरपाई. आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी बी.एस.एन.एल च्या सहकार्याने सुरू केलेल्या महाकृषि संचार उपक्रमात १४ लाखाहून अधिक सभासदांनी लाभ घेतला असून जगातील हा सर्वात मोठा मोबाइल पॅकेज यूजर्स ग्रूप झाला आहे.

याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात धान्य, फळ व खाद्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. थेट भाजीपाला विक्री व्यवस्था, शेतमालाच्या प्रभावी विक्रीसाठी दिल्ली, कलकत्ता, हैद्राबाद व चेन्नई येथे पणन मंडळाची कार्यालये सुरू, हमीभावात मालाची खरेदी, शेतमाल तारण योजना कार्यान्वित, कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम पुनर्रचनेबरोबरच राज्यातील आदिवासी भागात कृषि व संलग्न महाविद्यालये सुरू केली.

**– सुरेश काचावार**

## बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री



महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी महत्त्वाचे व कल्याणकारी निर्णय घेतले. सुवर्ण जयंती राजस्व अभियान राज्यात १ मे,२०११ पासून राबवण्यात येत आहे. त्यांतर्गत इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना शाळेत तसेच शिबिरे घेऊन ४० लाख विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. प्रत्येक आठवड्याला मंडळ मुख्यालयी फेरफार अदालतीचे आयोजन करून पूर्वीच्या सर्व प्रकारच्या प्रलंबित नोंदी केल्या. मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदी अशा उपक्रमातून ८,७०,२८२ नोंदी मंजूर केल्या. समाधान योजनेंतर्गत मंडल मुख्यालयी सर्व विभागाचे अधिकारी एकत्र येऊन १९,०५,०६२ लाख समस्यांचे निराकरण केले. १४ जिल्ह्यातील नागरिकांना मार्च,१३ अखेर १६,००,३०५ दाखल्यांचे अर्ज ऑनलाइन उपलब्ध करून दिले. ई लोकशाही हेल्पलाइन योजना ८ जिल्ह्यात सुरू केली. तसेच ई-चावडी उपक्रमांतर्गत ३५ पैकी २४ जिल्ह्यात ८,१०,८५९ दाखले व सातबारा वितरण झाले आहे. अपिल निर्गती उपक्रमात १ मे ते ३० नोव्हेंबरपर्यंत ५५,५६६ अपिलांची निर्गती. तसेच कर्मचाऱ्यांची उपस्थिती तपासण्यासाठी बायोमेट्रिक यंत्रे बसविली. भरती प्रक्रियेतील परिक्षार्थ्यांसाठी अधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल करून अधिवास प्रमाणपत्राऐवजी जन्मतारखेच्या पुराव्यासंबंधी दाखला ग्राह्य धरण्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला. खंडकरी शेतकऱ्यांचा जमीन वाटपाबाबतचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयातील स्थगितीमुळे बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित होता. राज्य शासनाने पाठपुरावा करून सुमारे ४,०१५ इतक्या खंडकरी शेतकऱ्यांना व त्यांच्या वारसांना तब्बल ५० वर्षानंतर न्याय मिळवून दिला. तसेच कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील बेदखल कुळांना मालकी हक्क देण्याबाबतचे प्रलंबित दावे विशेष मोहीम आखून निकाली काढले. त्यामुळे ६० टक्के प्रकरणांत बेदखल कुळांना मालकी हक्क प्राप्त झाले. केंद्र शासनाच्या वनहक्क अधिनियमाची संपूर्ण राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे आदिवासी धारकांचे ३,३३,२३७ इतक्या वनजमिनीवरील हक्कांचे दावे मंजूर करण्यात आले.

वाळू लिलावात पारदर्शकता आणण्यासाठी ई टेंडरिंग करण्याचा निर्णय घेतला. नागपूर व अमरावती विभागातील नझूल जमिनीच्या संदर्भातील जनतेचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न सोडवण्यासाठी नझूल धोरण ठरवले.

राज्याचा नोंदणी व मुद्रांक हा विभाग राज्यात सर्वाधिक महसूली उत्पन्न देणारा दुसऱ्या क्रमांकाचा विभाग आहे. २०१०-११ या वर्षात १३,४११ कोटी रुपये तसेच २०११-१२ या वर्षात १४,५०० कोटी रुपये महसूल प्राप्त झाला. येत्या ३ महिन्यात मुंबई, पुणे,ठाणे येथे एकूण २९ नवीन कार्यालये उघडण्यात येतील. यापैकी २ कार्यालये मुंबईत सकाळी ७ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्री ९ या वेळेत प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात येतील.




**३१ मे २०११ पर्यंतची प्रलंबित असलेली सर्व मोजणीची प्रकरणे डिसेंबर,२०११ अखेर पूर्ण केली. ६७,८७६ इतक्या प्रलंबित प्रकरणांपैकी ६१,६१९ प्रकरणे ३१ ऑक्टोबर २०११ अखेर निकाली काढली.**

वाळूपासून २०१०-११ या वर्षासाठी १४०० कोटी रुपये महसूलाचे उद्दिष्ट होते. त्यापैकी १०५१.६९ कोटी रुपये तसेच सन २०११-१२ या वर्षात १४०० कोटीच्या उद्दिष्टापोटी १०५९.५१ कोटी रुपये महसूल प्राप्त झाला. वाळू संदर्भातील विविध गुन्ह्यांपोटी २०१०-११ या वर्षात २८.२६ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला. त्याकरिता ३०७ गुन्हे दाखल असून ३८९ लोकांना अटक केली आहे. २०११-१२ या वर्षातही ३३.४३ कोटी दंड वसूल करण्यात आला असून ३५५ गुन्हे दाखल आहेत. ४२१ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे.

**– सुरेश काचावार**

आला. नंदुरबार शहरासाठी दोन्ही उड्डाणपुलास टोलमुक्त केले. रस्त्यांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांना निधी उपलब्ध करून दिला. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रस्त्यांना व विकासकामांना निधी उपलब्ध करून देण्यात आला. नंदुरबार मतदारसंघातील स्थानिक युवकांना शासकीय नोकरी मिळाली.

जिल्ह्याला लागलेला कुपोषणाचा रोग तसेचा सिकलसेलचे वाढते रुग्ण यावर उपाययोजना करण्यासाठी डॉ. गावित यांनी भर दिला आहे.

**– रणजित राजपूत**




नंदुरबार जिल्हा राज्याच्या शेवटच्या भागात आहे. या भागातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते. ही बाब हेरुन डॉ. गावित यांनी जिल्ह्यात अधिकाधिक शैक्षणिक सुविधा देण्याचे नियोजन केले. त्यात पॉलिटेक्निक महाविद्यालय कार्यान्वित केले, कृषी महाविद्यालय सुरू केले. त्यात आता वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचे नियोजन आहे. तसेच दंत महाविद्यालयही सुरू करण्यात येईल. या जिल्ह्यात शिक्षणाच्या सर्व सुविधा मिळाव्यात, हा भाग शैक्षणिक केंद्र व्हावा, यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

## डॉ. विजयकुमार गावित,
## वैद्यकीय शिक्षण मंत्री



विकासाचे कोणतेही काम करायचे एकदा मनात ठरवले की, त्या दिशेने पावले टाकायची, आणि कुठेही अधिकची वाच्यता न करता विकासकामे पूर्ण करण्याचेच ध्येय ठेवणारे, राज्याच्या राजकारणातील एक यशस्वी मंत्री म्हणून डॉ. विजयकुमार गावित यांची ओळख आहे. नंदुरबार जिल्हानिर्मितीसह अनेक मोठी कामे त्यांच्या नावावर जमा आहेत.

डॉ. गावित यांच्या प्रयत्नांमुळे नंदुरबार जिल्ह्यासाठी कृषी महाविद्यालयास मंजुरी व प्रवेशप्रक्रिया सुरू, वैद्यकीय महाविद्यालयास मंजुरी, सिंचनासाठी नर्मदेचे पाणी बोगद्याद्वारे आणण्यासाठी मंजुरी व त्या कामी सर्व्हेसाठी १२.९१ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला. पर्यटनस्थळाच्या विकासासाठी ५४ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. तीर्थक्षेत्र (यात्रास्थळ) यासाठी ४.६० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. प्रकाशा बुराई उपसा सिंचन योजनेस अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. सिंचन प्रकल्पांना शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला. नदीकाठच्या डामरखेडा, करजई, बुपकरी, वाघोदा, ता. शहादा गावांना पूर संरक्षक भिंतीसाठी २ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. गोमाई नदीवरील कवळीथ (ता. शहादा) बंधाऱ्याच्या व सुसरी कालवा (ता. शहादा) दुरुस्तीसाठी २ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात विकास निधीतून समाज मंदिर, सामाजिक सभागृह, रंगमंच व गावांतर्गत रस्त्यांच्या कामांना निधी मंजूर करण्यात आला. नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फळबागांसाठी विशेष विमा योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला. जिल्ह्यात १० हजार लाभार्थींना बैलजोडी वाटप केले. जिल्ह्यातील सिंचन कामासाठी जिल्हा परिषद (लघुसिंचन विभाग) अंतर्गत विहिरींसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात आले. नंदुरबार जिल्ह्यातील नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ९ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. आदिवासींसाठी खावटी कर्ज योजना, शासकीय आश्रमशाळांत सुधारणा व पर्यटन विकासाबाबत अधिक काम केले. शिक्षण घेतले तरच समाजाचा विकास होईल, अशी त्यांची धारणा आहे. त्यामुळे शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या सर्व सुविधा देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. कोणत्याही योजनेचा अभ्यास करायचा, त्यानंतर काम करायचे अशी कामाची पद्धत अंगीकारली. त्यामुळे कामाचा वेग वाढला. डॉ. गावित यांच्याकडे आदिवासी विकास विभाग असताना वैयक्तिक लाभाच्या योजना त्यांनी राबवल्या. डॉ. गावित यांच्याकडे सामान्य प्रशासन विभाग होता, त्या काळात त्यांनी राज्यात अनुशेष भरती मोहीम राबवली. त्याद्वारे राज्यात सुमारे एक लाखांवर

## पद्माकर वळवी,
## क्रीडा व युवककल्याण मंत्री



युवककल्याण तथा क्रीडामंत्री पद्माकर वळवी यांच्याकडे तळागाळातील जनतेचे पालकमंत्री म्हणून पाहिले जाते. मोदलपाडा ता.तळोदा या लहानशा गावात शिकून पुणे येथील महाविद्यालयात विधी शाखेची पदवी मिळविणारे वळवी विद्यार्थीदशेपासूनच समाजकार्यात आहेत. जेव्हा ते विद्यार्थीदशेत होते, त्यावेळी कोणत्याही शासकीय कामासाठी जनतेला धुळे येथे जावे लागत असे. तळोदा ते धुळे हे अंतर आताही सुमारे चार तासांचे आहे. २० वर्षापूर्वी हे अंतर पूर्ण दिवसाचे ठरत होते. अशा वेळी युवकांना लागणारी विविध कागदपत्रे, ग्रामीण भागातील वसतिगृहाच्या अडचणी लक्षात घेत त्यांनी आदिवासी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे संघटन उभारण्यासाठी पुढाकार घेतला. प्रारंभापासून विद्यार्थी आणि युवकांविषयी त्यांना आत्मीयता आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना पदोपदी जाणवणाऱ्या अडीअडचणी, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन, प्रशासन पातळीवर लढा उभारून त्यांना न्याय मिळवून देण्याचा



**खेळाडू व खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता याबाबी केंद्रीभूत ठरवून राज्याचे क्रीडा धोरण तयार करण्यात आले. हे धोरण ठरवताना क्रीडा मंत्री पद्माकर वळवी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या धोरणास अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली. स्वतंत्र क्रीडा विद्यापीठाची स्थापना, क्रीडाविषयक अभ्यासक्रमात सुसूत्रता, संशोधन, राज्य क्रीडा विकास निधी सक्षम करणे, क्रीडाविषयक मूलभूत सुविधांचा विकास, साहसी खेळांना प्रोत्साहन, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरीसाठी क्रीडाविषयक तंत्रशुद्ध प्रशिक्षण आदी बाबींचा यात समावेश आहे.**

ते सातात्याने प्रयत्न करतात.

श्री. वळवी यांचे गाव तळोदा तालुक्यात असले तरी जिल्ह्याच्या सर्वच भागात त्यांचे कार्य आहे. अक्कलकुवा, धडगाव व शहाद्याचा काही भाग हा सातपुडा पर्वतरांगामध्ये आहे. या भागातील वनक्षेत्र हळूहळू नष्ट होत आहे. तेथे पुन्हा नवनिर्माण होणे ही काळाची गरज आहे. ही बाब लक्षात घेत दहा वर्षांपासून डॉ. वळवी वनक्षेत्र वाढवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यात लोकसहभाग वाढवण्यासाठी त्यांनी आतापर्यंत कोट्यवधी रोपांचे, बियाण्यांचे नागरिकांना वाटप केले आहे. त्यातून बांबूची लागवड या भागात मोठ्या प्रमाणात झाली. याचा उपयोग आदिवासींना हस्तकौशल्याच्या वस्तू तयार करण्यासाठी होईल व त्यातून रोजगारनिर्मिती होईल असा त्यांचा दृष्टिकोन आहे. गावागावात व्यसनमुक्ती व्हावी. जुगार, सट्टा हे अवैध व्यवसाय बंद व्हावेत, यासाठी ते प्रयत्नशील असतात. लहान लहान गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सतत ऐरणीवर असतो. त्यात जिल्ह्यातील गाव व पाडे विखुरलेले आहेत. अनेकांना अर्धा ते दोन कि.मी. पर्यंत पायपीट करून पिण्यासाठी पाणी मिळवावे लागते. याची जाण वळवी यांना प्रारंभापासून होती. ज्यावेळी ते आमदार म्हणून निवडून आले त्यावेळी त्यांनी गावपाड्यात कूपनलिका केल्या. त्यांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र खाजगी युनिट कार्यान्वित केले. त्यातून प्रत्येक गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व कूपनलिका दुरुस्तीचा प्रश्न सोडवण्यात त्यांना यश आले.

राज्याचे स्वतंत्र युवाधोरण असावे, असे केंद्र शासनाने राज्यांना कळविले. त्यानुसार राज्याचे स्वतंत्र युवाधोरण ठरवण्यासाठी डॉ. वळवी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली. त्यांचा अहवाल शासनाने स्वीकारला. या धोरणात भौगोलिक, वैविध्य, सामाजिक परिस्थिती, स्थानिक स्तरावर उपलब्ध आणि विकसित होऊ शकणाऱ्या संधी यावर भर देण्यात आला. युवा प्रशिक्षण केंद्र जिल्हा व राज्यस्तर युवा पुरस्कार, युवा वसतिगृहे युवा आदानप्रदान कार्यक्रम, सुविधा केंद्र उभारणी आदी हितावह योजना या युवा धोरणात अंतर्भूत करण्यात आला.

नंदुरबार जिल्ह्यातील वनक्षेत्रातील झाडे नष्ट होत असताना झाडे लावण्याचा उपक्रम राबवणाऱ्या वळवी यांना प्रियदर्शनी इंदिरा गांधी वृक्षमित्र पुरस्कार देण्यात आला. त्यांनी काही वर्षांपूर्वी अक्कलकुवा-तळोदा तालुक्यातील ज्या प्रकल्पांसाठी आंदोलन केले. त्या प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्याचे कामही मंत्री झाल्यावर केले. आदिवासी विकास विभागाचे राज्यमंत्री असताना विविध योजना त्यांनी राबवल्या. आता युवककल्याण विभागाचे मंत्री असताना त्यांनी युवकांच्या आरोग्यासाठी गावागावात व्यायमशाळा, क्रीडांगण अनुदान व्यायमशाळांना साहित्य, व्यक्तिमत्त्व विकासासाठी विशेष शिबिरे, राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा, कै. भाई नेरुरकर खो-खो स्पर्धा आदी उपक्रम राबवले आहेत. अक्कलकुवा तळोदा तालुक्याचे प्रतिनिधित्व करताना डॉ. वळवी यांनी या भागात रस्ते आणि दळणवळणाची सुविधा व्हावी यासाठी २२२ कोटींचा विशेष कृती कार्यक्रम राबवला. धडगाव-तळोदा तालुक्यांतील लोकांसाठी जिल्ह्याच्या मुख्यालयाचे अंतर कमी व्हावे, त्यांची कामे वेळेत व कमी श्रमात व्हावी, म्हणून यासाठी महाराष्ट्र गुजरातला जोडणारा, तापी नदीवरील हातोडापूल बांधण्याचे काम श्री. वळवी यांच्या प्रयत्नाने मार्गी लागले आहे. लवकरच या मार्गावरून वाहतूक सुरू होईल.

**- रणजित राजपूत**

## श्री. मधुकरराव पिचड, मंत्री आदिवासी विकास



राज्यातील आदिवासी जनतेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी वेळोवेळी शासनाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयामध्ये मधुकरराव पिचड यांचा महत्वाचा वाटा आहे. राज्यातील आदिवासी तालुक्यात पडणारे पावसाचे पाणी अडवून जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली आणणे, कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, आदिवासींना खावटी कर्ज थेट त्यांच्या बँकेच्या खात्यात जमा करणे, आदिवासी आश्रमशाळेत गुणवत्तेवर शिक्षण भरती , स्थानिक बोलीभाषेचे ज्ञान असणाऱ्यांना यामध्ये प्राधान्य ,इयत्ता १२ वी नंतर इंजिनिअरिंग, मेडिकल, बीसीए , बीएससी च्या विद्यार्थ्यांना लॅपटॉप, आदिवासी तालुक्यात पर्यटन व्यवसायाला चालना, आदिवासी गौरवदिनाच्या निमित्ताने नाशिक

## श्री. माणिकराव गावित, केंद्रीय राज्यमंत्री

'सबसे साधा माणिकदादा' ही सातपुडा आणि सह्याद्रीच्या कुशीतील आदिवासी बांधवांनी दिलेली, बिरुदावली तंतोतंत लागू होते, ती देशाच्या सार्वभौम संसदेत सलग नऊ वेळा खासदार म्हणून निवडून आलेले केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री माणिकराव गावित यांना. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या धुळीपाडा (ता.नावापुर) या लहानशा गावात माणिकरावांचा जन्म झाला. १९६५ ते १९७१ या काळात सर्वप्रथम त्यांची नावापूर ग्रामपंचायतीच्या सदस्यपदी निवड झाली. तेथूनच त्यांच्या राजकारणाचा श्रीगणेशा झाला. एका दुर्गम आदिवासी गावातील एक ग्रामपंचायत सदस्य केंद्रीय गृहराज्यमंत्री आणि सामाजिक न्याय राज्यमंत्री व लोकसभेच्या हंगामी अध्यक्षपदापर्यंत पोहचतो, तेव्हा हे व्यक्तिमत्त्व भारतीय लोकशाहीतील आगळेवेगळे ठरते.




माणिकराव गावितांनी केवळ मतदारसंघातीलच नव्हे, तर धुळे,नंदुरबार जिल्ह्यातील गोरगरिबांच्या सुख-दु:खात सहभागी होत. त्यांच्या वेदनेवर नेहमीच फुंकर घालत आले. विरोधाला विरोध न करता विधायक कामासाठी ते नेहमीच झटतात. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया तर आहेच त्याचबरोबर ती शाश्वत होण्यासाठी वाट पाहावी लागते. म्हणूनच माजी मंत्री सुरुपसिंह नाईक यांच्या सोबतीने विकासाचा पाया रचला. आज त्याची फळे या भागात दिसताहेत. विधायक दृष्टिकोनातून त्यांनी जलसिंचन, कृषी विकासाला प्राधान्य दिल्याने डोकारे येथे आदिवासी सहकारी साखर कारखाना नावारूपाला आला. २००९ मध्ये ते नवव्यांदा खासदार झाले.

धुळे-नंदुरबार जिल्ह्यात विस्तारलेले दूरसंचाराचे जाळे, पंतप्रधान ग्रामसडक योजनेतील रस्ते, उधना-जळगाव रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण, विद्युतीकरण, आदर्श रेल्वेस्थानक, केंद्र शासनाच्या विविध योजना, महामार्गांचे चौपदरीकरण, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील उड्डाणपुलांच्या माध्यमातून श्री. गावित यांनी शाश्वत विकासाची पायाभरणी केली आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे उधना-जळगाव रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण, उधना-जळगाव रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण झाले, पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून ग्रामीण भागात व वाड्या-पाड्यात रस्त्यांचे विस्तृत जाळे विणले गेले. त्यांनी दूरसंचार विभागाच्या विविध योजना दऱ्याखोऱ्यात राबवण्यात पुढाकार घेतला. धडगाव-अक्कलकुवा विशेष कृती कार्यक्रमासाठी २२२ कोटींचा निधी त्यांनी मिळवला. नंदुरबार शहरात दोन रेल्वे उड्डाणपुलांचे काम झाले.

येथे आदिवासी सांस्कृतिक परिषदेचे आयोजन हेसुद्धा निर्णय श्री. पिचड यांनी घेतले आहेत.

मुधकरराव पिचड यांनी जिल्ह्याच्या दृष्टीने अलीकडे महत्त्वाचे काही निर्णय घेतले आहेत. त्यामध्ये समन्यायी पाणीवाटपाच्या धोरणाबाबत राज्य सरकारशी चर्चा. जिल्ह्यातील कालवेक्षेत्रात अतिरिक्त पाणी सोडण्याबाबत जलसंपदा विभागाला पाणी सोडण्याच्या सूचना, जामखेड तालुक्यातील खर्डा किल्ला सुशोभिकरणाच्या कामाला गती, जामखेड तालुक्यातील प्रलंबित वीज प्रश्न मार्गी, नगर-मनमाड राष्ट्रीय महामार्गाच्या कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना, कोल्हार-कोपरगांव रस्त्याचे काम तातडीने करण्याच्या सूचना, कर्जत बस आगाराच्या प्रश्नी पुढाकार आदींचा समावेश आहे.

जिल्ह्यातील टंचाईसदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी सुमारे १ हजार ७५ कोटी रुपये राज्य शासनाने खर्च केले आहेत. टंचाई निवारणार्थ उपाययोजनांवर राज्यात सर्वाधिक निधी खर्च करणारा हा जिल्हा आहे. पाऊस झाला असला तरी छावण्या व पिण्याचे पाणी आवश्यकतेनुसार व मागणीनुसार सुरू ठेवण्याबाबत शासनाकडे आग्रही मागणी करून निर्णय घेण्यात आला. टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी मागील वर्षी सिमेंट साखळी नालाबांधासाठी तीस कोटी रुपये खर्च करण्यात आले.



आदिवासी विद्यार्थ्यांना गणवेश खरेदी करण्यासाठी त्यांच्या खात्यावर पैसे वर्ग करणे, आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना थेट शाळेत दाखले देण्यासाठी राज्यभर शिबिरे भरवणे, आदी महत्त्वाच्या निर्णयांसाठी श्री. मधुकर पिचड यांनी पुढाकार घेतला आहे.

आता नऊ तालुक्यात बांधण्यात येणाऱ्या सिमेंट साखळी नालाबांधाच्या कामासाठी २६ कोटी ४८ लाख रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. खंडकरी शेतकऱ्यांचा दीर्घकालीन प्रलंबित असणार प्रश्न राज्य शासनाने नुकताच सोडविला आहे. जिल्हयातील १९४० खंडकरी शेतकऱ्यांना १२ हजार ४४५ एकर शेतजमीन वाटपासाठी निश्चित करण्यात आली आहे. जमीन व सातबारा, वाटपाची प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यातील १,५९९ गावांतील १६ लाख ८८ हजार ४१९ सातबारा संगणकीकृत करण्यात आले. १,३६७ शिवरस्ते, पाणंद रस्ते मोकळे झाले. फेरफाराच्या १ लाख २६ हजार २५२ नोंदी निकाली काढल्या. विविध प्रकारचे ४ लाख ३१ हजार ८१२ दाखल्याचे वाटप करण्यात आले. दाखलामुक्त गांव ही संकल्पना जिल्हयात राबवण्याचा संकल्पही असल्याचा मानस ना. पिचड यांनी व्यक्त केला. (पान १६ वर)



# उत्तुंग झेप

रामदास खेडकर

**देशात नाशिकचे नाव वेगवेगळ्या क्षेत्रात अग्रेसर आहे. उदा. एचएएल कंपनी, चलनी नाणी व नोटा छपाई मुद्रांक, संरक्षण क्षेत्रातील आर्टिलरी केंद्र महाराष्ट्रात मुंबई-पुणेनंतर उद्योगधंद्यातील सर्वाधिक गुंतवणूक नाशिकमध्ये झाली आहे. अभियांत्रिकी, औषधनिर्माण, जैव-तंत्रज्ञान, संगणकीय अथवा शेती मालावर आधारित उद्योगांची भरभराट होण्यासाठी ज्या बाबींची गरज असते त्या सर्व या परिसरात मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. स्वच्छ पाणी, कुशल-अकुशल कामगार, बंदराकडे जाणारी रस्ते वाहतूक, रेल्वेसेवा या व इतर बाबींमुळे नाशिक आणि परिसराचे औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे.**

नाशिक शहराला जसा धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक व सहकार क्षेत्राचा वारसा लाभला आहे, तसाच औद्योगिक क्षेत्रातही या परिसराचा सहभाग महत्त्वाचा आहे. मुंबई, ठाणे व पुणे यानंतर नाव घेण्यात येते त्या नाशिक शहराचं. अलीकडील काळात प्रामुख्याने सुवर्णत्रिकोण, सुवर्णचौकोन या संकल्पना त्याप्रमाणे पुढे आल्या, त्यातील महत्त्वाचा वाटा नाशिक व नाशिक परिसराचा आहे.

**विविध उद्योग**

नाशिक परिसरात मे. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, मे. बॉश (मायको), ग्लॅस्को, सीएट लि., मे. सिमेन्स इंडिया, मे. गरवारे प्लास्टिक, मे. ग्लेनमार्क, कार्बन कॉर्पोरेशन, इप्कॉस, हर्डीज स्पायसर, क्रॉम्प्टन ग्रिव्हज, किर्लोस्कर इंजिन, हिदुस्थान नॅशनल क्लास, एबीबी, स्नायडर, जिंदाल सॉ पाईप, इंडियन टुल्स, व्हीआयपी, टपारिया टुल्स या उद्योगांचा ठळकपणे उल्लेख करावा लागेल. या व इतर अशा अनेक उद्योगांची प्रगती, त्यांच्यामुळे निर्माण झालेला रोजगार, उत्पादनाची निर्यात, व पर्यायाने प्राप्त झालेले परकीय चलन या सर्व बाबींचा संबंध येतो तो या आर्थिक विकास व समाज या घटकांशी. या मोठ्या उद्योगांवर आधारित लहान उद्योगांचा वाटाही तेवढाच महत्त्वाचा आहे. अर्थात कोणत्याही उद्योगाची वाढ होण्यासाठी जागेबरोबरच त्या भागातील राजकीय परिस्थिती, सामाजिक रचना, कामगारांचे सहकार्य, विपणन व्यवस्था, कामगार कौशल्य या बाबी महत्त्वाच्या ठरतात. त्या सर्व बाबी या परिसरात चांगल्या प्रमाणात आहेत. त्यामुळे गुतंवणूकदारांची पसंती नाशिक शहराला राहिली आहे.

नाशिक परिसरात उद्योगांचा विकास होण्यासाठी असणाऱ्या अनुकूल बाबींमध्ये कच्चा माल, मुंबई-नाशिक महामार्गाचे सहापदरीकरण नाशिक-पुणे महामार्गाचे चौपदरीकरण, नाशिक-पुणे प्रस्तावित रेल्वेमार्ग, पाण्याची उपलब्धता, औद्योगिक संघटनांचा सकारात्मक दृष्टिकोन या बाबींचा समावेश आहे.

**कृषिमाल व प्रक्रिया**

नाशिक परिसरातील शेती संपन्न व वैविध्यपूर्ण आहे. इगतपुरीमध्ये भात, नांदगांवमध्ये बाजरी ही पिके होतात. आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्यांची बाजारपेठ नाशिक जिल्ह्यांतील पिंपळगाव बसवंत, लासलगांवमध्ये आहे. देशातील कांदा उत्पादनांपैकी ७० ते ८० % कांद्याचे उत्पादन येथे होते. निर्यातीत ९० टक्के वाटा नाशिकचा आहे. दर वर्षी नाशिक जिल्हयातून १५०० ते २००० हजार कंटेनर द्राक्षे परदेशात जातात. त्यांचा देशातील निर्यातीत ८० टक्के सहभाग आहे. राज्यातील वाईन निर्मिती उद्योगांपैकी ३२ वाईनरी एकट्या नाशिक जिल्हयात आहे. जागतिक बाजारपेठेत सुला, विंचुरा, सिरमा व्हिव्हेरा,







या वाइन प्रसिद्ध आहेत.

**विशेष आर्थिक क्षेत्र (एसइझेड)**

नाशिकपासून २५ कि.मी. अंतरावर सिन्नर या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व मे. इंडियाबुल्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने



विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती होत आहे. प्रामुख्याने वीज निर्मितीचे काम सध्या सुरु आहे.

**ऊर्जा क्षेत्र**

धुळे जिल्हयामध्ये साक्री , ब्राम्हणवेल, मावजीपाडा या परिसरात साधारणपणे ४०० हेक्टर एवढया क्षेत्रावर पवन ऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला असून ५० हेक्टर क्षेत्रावर सोलर एनर्जी प्रकल्प सुरू आहे. या परिसरामध्ये यापुढेही पवन ऊर्जा व सौर ऊर्जा निर्मिती करण्यासाठी मोठया प्रमाणावर वाव आहे.

**आयटी उद्योग**

मुंबई, पुणेनंतर आयटी क्षेत्रातील उद्योगासाठी नाशिक व परिसर अत्यंत पोषक आहे. सद्य:स्थितीत नाशिक येथे ईएसडीएस सॉफ्टवेअर, व्हीएनएस, व्हीटेक, रेस टेक्नॉलॉजी आणि डाटामॅटिक्स यासारख्या आयटी क्षेत्रातील नामांकित कंपन्या कार्यरत आहेत. उत्तर महाराष्ट्रामध्ये या क्षेत्रात सर्वसाधारणपणे ७००० ते ८००० लोकांना प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरीत्या रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (डीएमआयसी) प्रकल्प**

या डिडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या दोन्ही बाजूस मिळून १५० ते २०० किलोमीटरच्या परिसरात उद्योगांच्या व मूलभूत सुविधांच्या एकात्मिक विकासासाठी केंद्र शासनाने दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (डीएमआयसी) स्थापन केले आहे. डीएमआयसी प्रकल्पात येऊ घातलेले उद्योग हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे असणार आहेत. त्यामुळे तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता मोठया प्रमाणात लागेल. तेथे तांत्रिक तसेच अतांत्रिक, कुशल, अकुशल अशा साधारणत: १७.५ लक्ष रोजगाराची निर्मिती होणार आहे. या प्रकल्पामध्ये नाशिक व धुळे जिल्हयाचा समावेश असून नाशिक जिल्हयामध्ये २२०० हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे.

**महत्वाच्या आस्थापना**

नाशिक शहर व लगतच्या क्षेत्रात अतिशय महत्त्वाच्या अशा प्रमुख आस्थापना आहेत. हिंदुस्थान एरॉनॉटिक्स लिमिटेड ही भारताच्या संरक्षणक्षेत्रात मोलाचे योगदान देत आहे. सुखोई विमानांची निर्मिती याच ठिकाणी होते. मुद्रांक व चलनी नोटांची छपाई इंडिया सिक्युरिटी प्रेस व करन्सी नोट प्रेस या ठिकाणी होते. देवळाली येथे आर्टिलरी सेंटर आहे. वीजनिर्मितीचे एकलहरे हे प्रमुख ठिकाण आहे. शिवाय महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक शहरातच आहे.

**शैक्षणिक सुविधा**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एमइटी, सपकाळ नॉलेज हब, संदीप फाउंडेशन, फ्रावशी ॲकॅडमी, गोखले एज्युकेशन सोसायटी, या महत्त्वाच्या संस्था नाशिकच्या शैक्षणिक प्रगतीत योगदान देत आहेत.

**तीर्थक्षेत्रे**

उत्तर महाराष्ट्रामध्ये उद्योगधंद्यांचा विकास होण्यामागे जसे वातावरण पोषक आहे. त्यामध्ये तीर्थक्षेत्रांचाही महत्त्वाचा वाटा आहे. नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे दर १२ वर्षांनी होत असलेला कुंभमेळा, १२ ज्योतिर्लिंगांमधील एक त्र्यंबकेश्वर, वणी येथील सप्तश्रृंगी देवी, उत्तर महाराष्ट्रातील पाटणा देवी, मुक्ताईनगर, नंदुरबार येथील तोरणमाळ यासारखी तीर्थक्षेत्रे व पर्यटनस्थळे पाहण्यासाठी लोक आल्यानंतर, उद्योगधंदे करण्यासाठी ते या परिसराकडे आकृष्ट होतात.

**नाशिक जिल्हयातील औद्योगिक क्षेत्र**

मोठे औद्योगिक क्षेत्र- सातपूर (नाशिक), अति. नाशिक (अबंड), सिन्नर (माळेगांव), अति. सिन्नर (एसईझेड) - या क्षेत्रात असणारे उद्योग- महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, बॉश (मायको), ग्लेक्सो, सीएट लि., सिमेन्स इंडिया, गरवारे प्लास्टिक, ग्लेनमार्क, कार्बन कॉर्पोरेशन, इपीसी इरीगेशन इप्कॉस, हर्डीज स्पायसर, मे. क्रॉम्प्टन ग्रिव्हज, किर्लोस्कर इंजिन, हिदुस्थान नॅशनल क्लास, एबीबी, स्नायडर, जिंदाल सॉ

**वस्त्रोद्योग**

उत्तर महाराष्ट्रमध्ये वस्त्रोद्योग क्षेत्रात प्रामुख्याने हातमाग, यंत्रमाग, यांसारख्या व्यवसायामध्ये मोठी गुंतवणूक झाली असून यापुढेही गुंतवणुकीसाठी संधी उपलब्ध आहे. येवला येथे पैठणी उद्योगामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पैठणी संशोधन व पैठणी क्लस्टरची निर्मिती करण्यात आली आहे. मालेगाव येथील यंत्रमाग हा वस्त्रोद्योग व्यवसायामध्ये रोजगार निर्मिती व कच्चामाल निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान देत आहे. त्याचप्रमाणे धुळे जिल्ह्यातील नरडाणा येथे महामंडळामार्फत टेक्सटाइल पार्क विकसित करण्यात आला आहे.



पाईप, इंडियन टुल्स, व्हीआयपी, टपारिया टुल्स, इत्यादी मोठे उद्योग कार्यान्वित आहे. तसेच महामंडळ व इंडियाबुल्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांचे संयुक्त विद्यमाने बहुउद्देशीय विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यात येत आहे.

लघु औद्योगिक क्षेत्र- विंचुर पेठ, दिंडोरी-मालेगांव विंचुर येथे अशिया खंडातील सर्वात मोठे वाइन पार्क विकसित केले असून त्या ठिकाणी महामंडळाने वाइन उद्योगासाठी आवश्यक असलेली किमती यंत्रसामग्री, ना नफा, ना तोटा या तत्त्वावर वाइन उद्योजकांना वापरण्यासाठी उपलब्ध करून दिली आहे. तसेच कोल्ड स्टोरेज, वाइन इन्स्टिट्यूट व इतर बाबींसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्या ठिकाणी विंसुरा, फ्लेमिगो, इंडियन्स वाईन्स, बाळा रवी आदी नामांकित वाइनरी सुरू आहेत. मालेगाव येथे महामंडळामार्फत टेक्सटाइल पार्क विकसित करण्यात येत आहे.

नाशिक (सातपुर),अति. नाशिक (अबंड) व सिन्नर औद्योगिक क्षेत्रात पुढील उद्योग कार्यान्वित आहेत. महिंद्र अँड महिंद्र:-



लोगोन, स्कॉर्पीओ, बोलेरो, झायलो, एक्सयुव्ही ५०० या गाडयांचे उत्पादन.

बॉश (मायको): या कंपनीमध्ये दुचाकी गाडयांचे प्लग. सीएट - सर्व प्रकारचे टायर. सीमेन्स इंडिया - इलेक्ट्रॉनिक्स पार्ट. गरवारे - वेगवेगळ्या प्रकारच्या पॉलिस्टर फिल्म. ग्लेनमार्क व ग्लॅक्सो फार्मास्युटिकल - विविध प्रकारची औषधे . इप्कॉस : कॅपेसिटर. क्रॉम्प्टन ग्रिव्हज् -स्विचगीअर, ट्युबलाईट व फॅन. जिदांल सॉ पाईप - लोखंडी पाईप. हिदुस्तान नॅशनल ग्लास - काच.

**धुळे जळगांव येथील प्रमुख उद्योग**

पार्थ स्टील प्रा.लि. रॉडस- प्लेटस तसेच चॅनल्स दिसान ग्रो टेक लि.- खाद्य तेल महाराष्ट्र व्हेजिटेबल प्रा. लि. - वनस्पती, ऑईल, रिफायनरी व इतर मे.



आर एम केमिकल्स -हिंदुस्थान लिव्हर साबण बी.एन.बी. कॉर्पोरेशन -स्टील श्रीजी इंडस्ट्रिज - वनस्पती ऑईल अजंठा फार्मास्युटिकल्स लि.-फार्मास्युटिकल्स विक्रम प्लास्टीक प्रा.लि. -प्लास्टिक उत्पादन रेमण्ड वुलन मिल. लि.-वस्त्रोद्योग मे.व्ही आय पी इंडस्ट्रिज लि.-पीव्हीसी लगेज व क्लॉथ.

## अहमदनगर जिल्हा

अहमदनगर जिल्ह्यात ४ औद्योगिक वसाहती आहेत. त्याचप्रमाणे ४ सहकारी औद्योगिक वसाहती आहेत. नोंदणी झालेल्या स्थायी लघुउद्योगाची संख्या ६२३४ इतकी तर नोंदणी झालेल्या अस्थायी उद्योगाची संख्या २९६४ इतकी आहे. जिल्ह्यात औद्योगिक मान्यताप्राप्त नोंदणीकृत ४३ मध्यम व मोठे उद्योग आहेत.

अहमदनगर शहरापासून १२ कि.मी. अंतरावर नगर-मनमाड रोडवर वसलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात किर्लोस्कर पंप लि., लासर्न ॲण्ड टुब्रो, इंडियन सिमलेस लि., क्रॉम्टन ग्रिव्हीज, कायनेटिक इंजिनिअरींग लि., सन फार्मास्युटिकल्स, जयंत कॉस्टिंग प्रा.लि., होगनज इंडिया लि., सी.जी.न्यूयेज आदी नामवंत उद्योग आहेत. यामुळे लघुउद्योगामध्ये अंदाजे ३२ हजार तर मोठे व मध्यम उद्योगामध्ये अंदाजे १९ हजार कुशल व अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.




❑ ❑

## कर्तबगार आणि कृतिशील

(पान १३ वरून)

### जळगाव पालकमंत्री संजय सावकारे

कृषी , सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती कार्य, विमुक्त भटक्या जमाती व इतरमागासवर्गीयांचे कल्याण, पशुसंवर्धन, दुग्धविकास, रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे राज्यमंत्री तथा जळगांव जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांनी जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासावर भर



दिला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत त्यांनी ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या दृष्टीने जिल्हा नियोजन समितीच्या प्रत्येक सदस्यास १० लाख रुपयांचा विकास निधी देण्याचा निर्णय घेतला. जिल्ह्यासाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ३१० कोटी ६९ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली असून २६१ कोटी ९ लाख रुपये निधीची तरतूद जिल्ह्यासाठी प्राप्त झाली आहे. जिल्ह्यातील आरोग्य सेवांचे बळकटीकरण करणे, ग्रामीण भागातील दवाखान्यांसाठी औषध पुरवठा, इंदिरा आवास योजने अंतर्गत घरांची उपलब्धता, महिला बाल विकास योजनेअंतर्गत अंगणवाड्यांचे बांधकामे करणे यांसारखी कामे घेण्याबाबत त्यांनी तरतूद केली आहे. यातून ग्रामीण भागात आरोग्य सुविधांसोबत गोरगरिबांना निवारा उपलब्ध होणार आहेत. ग्रामीण भागातील खेळाडूंना वाव मिळावा म्हणून त्यांनी तालुका क्रीडा संकूले उभारण्यावरही भर दिला आहे. जळगाव येथे ३० कोटी रुपये खर्चून बंदिस्त नाट्यगृह उभारण्यात येत आहे. त्याचा कोनशीला अनावरण समारंभही नुकताच पार पडला.

**- दिलीप गवळी**

❑ ❑

## नाशिक शहराच्या टप्प्यात येणारा ६.१ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल



# महाराष्ट्राचा महापूल

मनुष्याचा विकास हा शिक्षणामुळेच होतो. गावाचा व शहरांचा विकास हा रस्त्यांमुळे व मूलभूत सेवासुविधांमुळे होतो. देशाच्या व राज्याच्या विकासात राष्ट्रीय महामार्ग महत्त्वाची भूमिका बजावतात. याचे उदाहरण म्हणजे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव- नाशिक- गोंदे या भागातील सहापदरीकरण प्रकल्पांतर्गत नाशिक शहराच्या टप्प्यात येणारा ६.१ किलोमीटर लांबीच्या एलिव्हेटेड कॉरीडॉर (उड्डाणपूल). हा उड्डाणपूल भारतातील तिसऱ्या क्रमांकाचा पूल आहे. या उड्डाणपुलामुळे जिल्हयाच्या विकासाला गती मिळणार आहे.

**रवींद्र ठाकूर**

**वैशिष्ट्ये** : राष्ट्रीय महामार्ग क्र.३ च्या महाराष्ट्रातील पिंपळगांव-नाशिक-गोंदे या ६० किमी मार्गावर सहापदरी रस्त्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी ९४० कोटी रुपये खर्च आला आहे. एलिव्हेटेड कॉरीडोर या डिझाइनचा हा राज्यातील सर्वाधिक लांबीचा उड्डाणपूल आहे. या पुलासाठी १७२ पिलर वर प्रत्येकी १२ सेग्मेंट असे एकूण २,०६४ सेग्मेंट आहेत. स्टरटेड तंत्रज्ञान पद्धतीचा हा पूल यापूर्वी बँकॉकमध्ये बनवण्यात आला आहे.

या उड्डाणपुलामुळे नाशिक शहरातून १२ पदरी रस्ता वाहतुकीसाठी तयार झाला आहे. मुंबई नाका ते आडगाव नाकादरम्यानचा हा उड्डाणपूल चारपदरी आहे. त्याच्या खाली पुलाला लागून ग्रेड रोड दोन्ही बाजूंनी चारपदरी आहे. त्याच्या बाजूला सर्व्हिस रोड चारपदरी आहे.

आडगाव, लेखानगर, पाथर्डी, गरवारे हे फ्लायओव्हर नाशिक महानगरपालिका क्षेत्रात आहेत. नाशिक शहराबाहेर वणी आणि एच.ए.एल हे दोन फ्लायओव्हर आहेत. या ठिकाणी इंदिरानगर, राणेनगर, फाळके स्मारक, विल्होळी, रायगडनगर, वाडीवरहे, चिंचखेड, उमंबरखेड, ओझर येथे अंडरपास देण्यात आले आहेत.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये २१ कि.मी रस्त्यावर पदरी सर्विस रोड आहे. याशिवाय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने नाशिक शहर हद्दीमधील महामार्गाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पाणीपुरवठा पाइपलाइन, भूमिगत गटाराचे पाइप व वीजवाहक तारा यांचे स्वःखर्चाने स्थलांतर केले आहे. त्याचा अंदाजे खर्च रुपये ५८.०२ कोटी झाला आहे. वरील सर्व बाबी धरून या महामार्गावर झालेला खर्च रुपये ७०९.५२ कोटी इतका आला आहे.

फ्लायओव्हर व्यतिरिक्त दोन मुख्य पूल व ११ छोटे पूलही महामार्गावर आहेत. याव्यतिरिक्त ३४ बस थांबे व ४ ठिकाणी अवजड वाहनांसाठी स्वतंत्र मार्ग आहे. स्ट्रेटेड डिझाइन (पुलाखालील आडव्या दांडया) मुळे वजन पेलण्याची क्षमता वाढते. १०० वर्ष आयुष्य, रोडच्या भाषेत क्लास ए लोडिंगसाठी डिझाइन केले आहे.

❑ ❑

# प्रगतीच्या नव्या वळणावर

अनिरुद्ध देवचक्के

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिलेल्या चाराबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, नसबंदी, नशाबंदी या पंचसूत्रीनुसार राळेगणसिद्धीचा कायापालट झाला. हा पॅटर्न देशभरात नावाजला जाऊ लागला. 'माथा ते पायथा' या पद्धतीनं पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम राबवला गेला. पाणी अडविण्यासाठी आणि ते जमिनीत जिरविण्यासाठी गावातले कष्टकऱ्यांचे हात सामूहिकरीत्या झटू लागले. ओसाड डोंगरावर वनराई फुलू लागली. चर घेतले गेले. पावसाचं वाहून जाणारं पाणी त्यात अडवलं जाऊ लागलं. गावातल्या विहिरी पाण्याने तुडूंब भरू लागल्या. शासनाच्या विविध कल्याणकारी योजना ग्रामीणभागात प्रभावीपणे राबवल्या गेल्या, तर ग्रामीणभागाचं चित्र नक्कीच पालटू शकतं, हा धडा राळेगणसिध्दीनं दिला. विकासाची हीच 'आदर्श गाव योजना' भारतातील अनेक राज्यांनीही स्वीकारली. ही बाब उत्तर महाराष्ट्रातील नाशिक विभागाला अभिमान वाटावी अशीच आहे. राळेगणसिद्धीनंतर हिवरे बाजार, गुंडेगाव याच पध्दतीने विकासाच्या रथावर बसून पुढे जाताना दिसत आहेत. केवळ नगर जिल्हाच नव्हे तर धुळे-जळगाव-नाशिक आणि नंदुरबार या नाशिक विभागातल्या उर्वरित चारही जिल्ह्यात याच पद्धतीने विकासाची कामे केली जात आहेत. धुळे जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकासाच्या कार्यक्रमावर आधारित 'शिरपूर पॅटर्न' आज महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी राबवला जात आहे.

**गोधडीला प्रतिष्ठा**

ग्रामीण भागात पांघरूण म्हणून वापरण्यात येणाऱ्या 'गोधडी'ला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रकल्प नाशिक विभागात राबवला जात आहे. जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातल्या बहादूरपूर येथे नीलिमा मिश्र यांनी बचतगटांची चळवळ रुजवली. आज तेथून शेकडो गोधड्या विदेशात विक्रीसाठी जात आहेत.

**साखर कारखाने**

आदर्श गावांमधील विविध विकास कामांमुळे उत्तर महाराष्ट्र शेती उत्पादनात अग्रेसर ठरत आहे. नगरची साखर कारखानदारी , नाशिकची द्राक्षे, जळगाव-नंदुरबारची केळी राज्यात प्रसिद्ध आहेच. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटलांनी सहकारी साखर कारखानदारीची मुहूर्तमेढ रोवली. नगर जिल्ह्यातच १७ सहकारी साखर कारखाने उभे राहिले. शासनाने या कारखान्यांच्या उभारणीसाठी पैसा उपलब्ध करून दिला. कर्जाची बँक गॅरंटी आणि थकहमी घेतली. सरकार पाठीशी उभे राहिले नसते, तर नगर जिल्ह्यातील १६, नाशिक जिल्ह्यातील ५, धुळ्यातील





२, नंदुरबारमधील ३ आणि जळगाव जिल्ह्यातील ७ असे ३३ सहकारी साखर कारखाने नाशिक विभागात उभे राहणे अशक्यच होते. एका साखर कारखान्यावर किमान ५० हजारांहून अधिक कुटुंबांची गुजराण अवलंबून आहे.

कपाशी उत्पादकांसाठी जिनिंग ॲन्ड प्रेसिंग मिल्सही सहकार तत्त्वावर उभारल्या गेल्या. त्यांनाही सरकारने वेळोवेळी मदत केलीच.

**नाशिक विभागातील धरणे**

नाशिक विभागात पाच मोठे, १८ मध्यम ३८ आणि २९४ लघू असे एकूण ३५० धरण प्रकल्प आहेत. यातील दारणा आणि भंडारदरा हे दोन मोठे प्रकल्प वगळता अन्य सर्व प्रकल्प स्वातंत्र्योत्तर काळात उभारण्यात आले आहेत. काही पूर्ण झाले, तर काही प्रगतिपथावर आहेत. या प्रकल्पांमुळे लक्षावधी हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले. यातून अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखानदारी, नाशिक , जळगाव , नंदुरबार जिल्ह्यात फळबागा फुलल्या. अगदी विदेशी चलन मिळविणारे कृषी उत्पन्न निघू लागले. पाणीवाटपाच्या धोरणानुसार अहमदनगर , नाशिक, धुळे या महापालिकांसह जळगाव, नंदुरबार नगरपालिका आणि या विभागातील अनेक नगरपालिकांच्या हद्दीतील व जिल्ह्यातील कोट्यवधी माणसे आणि जनावरांची तहान याच पाण्यावर भागते. इतकेच नव्हे तर मराठवाड्याचीही तहान भागविली जाते.

नाशिक विभागातील औद्योगिक वसाहतींचाही मोठा विकास झाला आहे. मुंबई-नाशिक-पुणे असा कॉरिडॉर तयार झालेला आहे.

सरकार महसूल विभागामार्फत सुवर्णजयंती राजस्व अभियान राबवत आहे. त्याचा लाभ नाशिक विभागातील विशेषत:आदिवासी भागातील नागरिकांना झाला. ज्यांच्याकडे जातीचे काहीच पुरावे नाहीत, परंतु जात तर सांगतोय तीच आहे, अशा विद्यार्थ्यांनाही घरपोच दाखले देण्यात आले. म्हाडा आणि हुडकोच्या माध्यमातून लक्षावधी मध्यमवर्गीयांना स्वत:ची हक्काची घरे मिळाली. कृषी आणि महसूल विभागाच्या माध्यमातून अन्नवस्त्राची, औद्योगिक व अन्य उपाययोजनांमधून उत्पन्नाची आणि हुडकोसारख्या योजनांमधून निवाऱ्याची व्यवस्था झाली. नागरिकाच्या सर्व गरजा पूर्ण झाल्या. त्यातूनच व्यावसायिक स्पर्धाही वाढीस लागली.

**- संपर्क : ९८९०६६४७७९**

# जलसमृद्ध

पश्चिम घाट आणि सातपुडापर्वतरांगा यांच्या मधल्या भागात असलेले गोदावरी आणि तापी नदीचे खोरे हे संपूर्ण उत्तर महाराष्ट्रासाठी जीवनदायी आहे. हा भाग नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध आहे. उत्तरेकडील गंगेचे खोरे वगळता गोदावरी आणि तापीचे खोरे महत्त्वाचे आहे. उत्तर महाराष्ट्रातील जनतेची तहान आणि लाखो हेक्टरचे क्षेत्र यामुळे सिंचनाखाली आहे. मराठवाड्याला याच खोऱ्याने तारले आहे.

**भावेश ब्राह्मणकर**

गोदावरी, दारणा, दमणगंगा, तापी, पूर्णा यांसारख्या नद्यांमुळे उत्तर महाराष्ट्रात पाण्याची मुबलकता आहे. धरणांचा तालुका असलेले इगतपुरी, त्र्यंबकेश्वर हे राज्याची राजधानी असलेल्या मुंबईला पाणी पुरवठा करीत आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे या दोन्ही खोऱ्यातील पाण्याचे योग्य नियोजन होण्याची आवश्यकता आहे. गोदावरी आणि तापी खोऱ्यातील पाण्याची तूट लक्षात घेऊनच राज्य सरकारने सर्वेक्षणाचे आदेश दिले आहेत. यापूर्वी असे सर्वेक्षण झाले आहे. पण, पाण्याचे दुर्भिक्ष आणि आगामी आव्हाने पाहता सर्वंकष जलनियोजनाची गरज





आहे. ते झाले तरच उत्तर महाराष्ट्र जलसंपन्न होणार आहे.

**गोदावरीचा उगम**

ब्रह्मगिरी टेकड्यांत गोदावरीचा उगम झाल्यावर नदी डोंगराळ भाग ओलांडून खाली येते. नाशिकला येईपर्यंत नदीचे पात्र अरूंद असून तिचा प्रवाह खडकाळ प्रदेशातून आहे. गोदावरीच्या उजव्या तीरावरून किंवा दक्षिणेकडून दारणा, प्रवरा, मुळा, बोरा, बंदिसुरा, कुंडलिका या नद्या मिळतात, तर डाव्या तीराकडून किंवा उत्तरेकडून कदवा, शविना, खाम नद्या मिळतात. कळसुबाई शिखराजवळ उगम पावणारी दारणा नदी नाशिकच्या दक्षिणेला २४ किमी अंतरावर उजव्या किनाऱ्याने गोदावरीला मिळते. आणखी १७ किमी अंतरावर डावीकडून नांदूर येथे कादवा नदी मिळते. हरिश्चंद्र डोंगरावर भंडारदाराजवळ प्रवरा नदी उगम पावते. प्रवरा व मुळा नदीच्या संयुक्त प्रवाहावर नेवासे वसलेले आहे. पुढे गोदावरीस प्रवाह उजवीकडून मिळतो. सातमाळाच्या डोंगरात शिवना नदी उगम पावून दक्षिणेला वाहते व गोदावरीस मिळते. नाशिक ते नांदेड दरम्यान गोदावरी नदी बेसॉल्टच्या खडक असलेल्या भागातून वाहते. सह्याद्री व डोंगररांगावरून वाहणाऱ्या नद्यांमधून गोदावरी खोऱ्यात गाळाचे मैदान निर्माण झाले आहे. मुख्य गोदावरीच्या खोऱ्यात नाशिक, नेवासे, औरंगाबाद, जालना, पैठण, परभणी, बीड, नांदेड वगैरे महत्त्वाची शहरे आहेत. गोदावरी आणि तिच्या उपनद्यांनी नदीच्या खोऱ्यातील दख्खनच्या लाव्हाची झीज केली आहे. खोऱ्याची सरासरी उंची ३५० ते ५५० मी. दरम्यान आहे. गोदावरी खोऱ्यात जसजसे पूर्वेकडे जावे तसा तिचा विस्तार कमी होत जातो. नांदेडजवळ तर खोऱ्याची रुंदी फक्त ५० किमी आहे, त्या मानाने खोऱ्याच्या वरच्या बाजूस रुंदी १५० ते २०० किमी आहे. डोंगरांची मोठ्या प्रमाणात नदीने झीज केली आहे. गोदावरी खोऱ्यामधून दरवर्षी सुमारे ३७,८३० दशलक्ष घनमीटर पाण्याचा प्रवाह वाहतो.

**सिंचन प्रकल्प**

नाशिक जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र १५ हजार ५३० चौ.कि.मी. असून त्यापैकी साधारण ५० टक्के (७,८२१ चौ.कि.मी.) क्षेत्र गोदावरी खोऱ्यात तर ३६ टक्के, (५,५९० चौ.कि.मी.) तापी खोऱ्यात आहे. उर्वरित १४ टक्के क्षेत्र (२११९ चौ.कि.मी.) पश्चिमवाहिनी खोऱ्यामध्ये आहे. नाशिक जिल्ह्यात ११ मोठे प्रकल्प, ६ मध्यम प्रकल्प व ३८ लघु प्रकल्प पूर्ण झाले आहेत. या प्रकल्पांची एकूण २ लाख १४ हजार ५४५ हेक्टर सिंचन क्षमता असून ४५.८९१ टीएमसी पाणीसाठा आहे. नाशिक जिल्ह्यातील बांधकामाधीन प्रकल्पांची एकूण सिंचन क्षमता ५० हजार ७४९ हेक्टर असून त्यापैकी जून २०११ अखेर २७ हजार ८३० हेक्टर सिंचन क्षमता निर्मित झाली आहे. उर्वरित २२ हजार ९१९ हेक्टर सिंचन निर्मितीचे नियोजन आहे. जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून



पूर्ण करण्यात आले आहेत.

१९ प्रवाही वळण योजनेद्वारे, पश्चिमेकडे वाहून जाणारे अरबी समुद्राचे पाणी गोदावरी खोऱ्यात १.९ टीएमसी पाणी वळविणे प्रस्तावित आहे. या १९ प्रवाही वळण योजनांपैकी १२ प्रवाही वळण योजनांची कामे प्रगतिपथावर आहेत. त्यासाठी अंदाजे ४२५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे .

दिंडोरी तालुक्यातील लघु पाटबंधारे योजना जोरण, अंबड व वणीखुर्द यास मंजुरी प्राप्त असून याद्वारे ०.३ टीएमसी पाणीसाठा निर्माण होणार आहे. एकूण १,०७२ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. या तिन्ही योजना पूर्ण होण्यासाठी अंदाजे एकूण ३० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

जोड उपसा योजना क्र. ३ (भेनशेत-मेनमाळ) व जोड उपसा योजना क्र. ४ (ममुदा-कोपुरली-खंबाळे) याद्वारे १२ टीएमसी पाणी वळवून गोदावरी खोऱ्यात उपलब्ध होणार असल्याने, दिंडोरी तालुक्यातील आदिवासी तसेच चांदवड व येवला तालुक्यातील अवर्षणप्रवण भागातील याचा ६६ हजार हेक्टर क्षेत्रास यामुळे सिंचनाचा लाभ होईल. याबाबत सर्वेक्षणाची प्राथमिक कार्यवाही सुरू आहे. सर्वेक्षणासाठी अंदाजे १० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असून योजनेसाठी अंदाजे ७०० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. हे १२ टीएमसी पाणी मांजरपाडा बोगद्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे, त्यासाठी मांजरपाडा-१ वळण योजनेच्या बोगद्याचा व्यास दुप्पट करण्याचे नियोजित आहे.

ओझरखेड प्रकल्प वाढीव कालव्याचे काम पूर्ण करण्यासाठी अंदाजे १० कोटी रुपये तर दरसवाडी प्रकल्प कालव्याचे काम पूर्ण

करण्यासाठी अंदाजे २४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. याद्वारे जिल्ह्यातील निफाड, चांदवड, येवला इत्यादी तालुक्यातील दुष्काळी भागाला लाभ होणार आहे.

वाघाड धरण भरल्यानंतरचे पूरपाणी करंजवण धरणात बोगद्याद्वारे सोडण्याचे प्रस्तावित असून त्याचे सर्वेक्षणाचे काम प्रगतिपथावर आहे. करंजवण धरणाचे पूरपाणी ओझरखेड धरणात सोडणे प्रस्तावित असून याचेदेखील सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. याकरिता ऊर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावात ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

किकवी धरण २.५ टीएमसी इतक्या क्षमतेचे प्रस्तावित आहे. या पाण्याचा उपयोग नाशिक शहराकरिता पिण्याच्या पाण्यासाठी प्रस्तावित आहे. किकवी पेयजल प्रकल्पासाठी ५२५ रुपये कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

नांदूरमध्यमेश्वर प्रकल्पांतर्गत इगतपुरी तालुक्यामध्ये भाम, बाहुली, वाकी आणि मुकणे ही चार धरणे आहेत. त्यापैकी बाहुली व मुकणे यांची कामे पूर्ण झाली आहेत. वाकी धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी ३० कोटींचा निधी आवश्यक आहे. भाम धरण पूर्ण करण्यासाठी ४० कोटी रुपये इतक्या निधीची आवश्यकता आहे.

**तापी खोरे**

तापी नदीचा उगम मध्य प्रदेशात सातपुडा पर्वतरांगांवर मुलताई येथे होतो. नदीचा प्रवाह पूर्वेकडून पश्चिमेकडे आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र व गुजरात राज्यातून वाहत जाऊन सुरत येथे अरबी समुद्रास तापी नदी मिळते. तापी नदीची एकूण लांबी ६७० किमी असून नदीप्रणालीचे क्षेत्र ५७,६६२ चौकिमी आहे. यापैकी महाराष्ट्रात तापी नदीची लांबी २०८ किमी असून नदीप्रणालीचे क्षेत्र ३१,६६० चौकिमी आहे. महाराष्ट्रात तापी नदीच्या खोऱ्यातून दरवर्षी पाण्याचा प्रवाह सुमारे ७२५० दशलक्ष घनमीटर वाहतो. तापी नदीस विदर्भाच्या पश्चिम भागातून वाहत येणारी पूर्णा नदी मिळते. ही तापीची मुख्य उपनदी आहे. तापी नदीला उजव्या किनाऱ्याने चंद्रभागा, भुलेश्वरी, शहानूर, नंदवान या उपनद्या मिळतात. बहुतेक सर्व नद्या सातमाळा, अजिंठा डोंगरात उगम पावून दक्षिणोत्तर वाहून डाव्या किनाऱ्याने तापीला मिळतात. या उपनद्या पेढी, काटेपूर्णा, मोरणा, मण व नळगंगा आहेत, तर तापी पूर्णेच्या संयुक्त प्रवाहास पुढे पश्चिमेकडे वाघूर, गरिणा, बोरी, पांझरा, बुराई या उपनद्या येऊन मिळतात. उत्तर महाराष्ट्रात तापी-पूर्णा खोरे आहे. तापी नदीचे क्षेत्र खचदरीच्या भागात आहे, यामुळे नदी खोल घळईमधून वाहत जाते. तापी नदीच्या दक्षिणेस मेळघाट व गाविलगडचे डोंगर तर उत्तरेस कालीभीतचे डोंगर आहेत. मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर खिंडीतून महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यात रावेर शहराजवळ तापी नदी पुन्हा प्रवेश करते. जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून वाहताना नदीचा प्रवाह पूर्व-पश्चिम असून जवळजवळ सरळ आहे. शहादा शहराच्या पश्चिमेस तापी नदी गुजरातमध्ये प्रवेश करते.



तापी-पूर्णा खोऱ्याची साधारण रुंदी २४० कि.मी. आहे. खोऱ्याच्या उत्तरेस तापी नदीला अगदी जवळून समांतर अशी सातपुडा पर्वतरांग आहे. त्याची दक्षिण बाजू लहान लहान प्रवाहाने झिजलेली असून पायथ्याशी शिलापद किंवा पिडमॉंट तयार झाले आहेत. तसेच तो भाग ओबडधोबड प्रदेशाचा बनलेला असून बिहडची निर्मिती झालेली आहे. तापी नदीच्या खोल घळईने काठाचे भागही झिजलेले आहेत. तापी नदीची मुख्य उपनदी पूर्णा असून तिचा उगम या खोऱ्यात पूर्वेस असलेल्या गाविलगड डोंगराच्या दक्षिण उतरावर होतो. नंतर ती दक्षिणेकडे अमरावती जिल्ह्यात येते व पश्चिमेला वळते. पुढे अकोला व बुलढाणा जिल्ह्यातून पश्चिमेस पूर्णा नदी वाहत जाऊन त्या ठिकाणी तापी नदी जळगाव जिल्ह्यात शिरते. तेथे श्रीक्षेत्र चांगदेवजवळ पूर्णा मिळते. हे ठिकाण भुसावळच्या पूर्वेस आहे. डाव्या किनाऱ्याने तापी नदीस मिळणारी दुसरी महत्त्वाची उपनदी गिरणा आहे. तिचा उगम दक्षिणेस सातमाळ्याच्या उत्तर सुळक्यावरील चांदोर टेकडीत होतो. नदी पूर्वेस मालेगाव पठारावरून वाहत जाते. नंतर ती उत्तरेस वाहते व जळगाव जिल्ह्यात तापी नदीस मिळते. गिरणा नदीस उजव्या किनाऱ्याने पांजण नदी व डाव्या किनाऱ्याने मोसम नदी मिळते. याशिवाय धुळ्याच्या जवळून वाहणाऱ्या बोरी व पांझरा नद्या प्रथम पूर्व दिशेने व नंतर दक्षिणोत्तर वाहत जाऊन तापी नदीस मिळतात. तसेच पश्चिम-पूर्व दिशेने बुराई नदी वाहत जाऊन ती तापीस मिळते. तापी नदीच्या खोऱ्यात अमरावती, अकोला, चाळीसगाव, बुलढाणा, जळगाव, भुसावळ, धुळे व नंदुरबार यांसारखी शहरे आहेत.

**तापी पाटबंधारे विकास महामंडळ**

जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक या चार जिल्ह्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी आणि येथील कोट्यवधी नागरिकांची तहान भागविण्यासाठी १९९८मध्ये तापी पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. महामंडळानेच प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, महामंडळ स्थापनेपूर्वी तीन मोठे, १६ मध्यम आणि १९७ लघुप्रकल्प असे एकूण २१६ प्रकल्प पूर्ण झाले असून त्याद्वारे २ लाख ९० हजार २६ हेक्टर्स सिंचनक्षमता आणि १४७२.५२५ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा निर्माण झाला आहे. महामंडळ स्थापनेनंतर तीन मध्यम, ६० लघु, एक उपसा सिंचन योजना आणि चार वाढ विस्तार कामे असे एकूण ६८ प्रकल्प पूर्ण झाले. त्याद्वारे ३४ हजार ९७२ हेक्टर सिंचनक्षमता व १५०.३३ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा निर्माण झाला आहे. महामंडळांतर्गत सध्या ११६ मूळ प्रकल्प आणि १३ वाढ विस्तार कामे अशी एकूण १२९ प्रकल्पांची कामे सुरू आहेत.

❑ ❑



# पाटचारी सिंचन

## समृद्धीचा नवा मंत्र

**कुठल्याही ऊर्जेचा वापर न करता नदी अथवा जिवंत झऱ्यातील पाणी पाटचारीने शेतापर्यंत नेऊन सिंचन करण्याचे सातपुड्यातील आदिवासींचे पाणी व्यवस्थापन तंत्र हे अफलातून असे आहे. प्रतिकूल परिस्थितीत येथील आदिवासींची ही पारंपरिक शेती सिंचनाची पध्दत वर्षानुवर्षांपासून सुरू असून अशा पध्दतीने एक हजार एकरपेक्षा अधिक शेती सिंचनाखाली आली आहे.**

रमाकांत पाटील

सातपुड्यातील आदिवासी प्रयोगशील शेती करू लागले आहेत. अक्कलकुवा आणि धडगांव तालुक्यातील डोंगरावर असलेल्या भागात थंड हवामान असल्याने त्याचा फायदा घेत येथील आदिवासी शेतकरी स्ट्रॉबेरी आणि लीचीची शेती करीत आहेत. स्वातंत्र्यांच्या ५० वर्षांपर्यंत काजूची चव चाखायलाही पारखे झालेले येथील शेतकरी, आता काजूचे उत्पादनच नव्हे तर त्यावर प्रक्रिया करून बाजारपेठेत काजू विक्री करीत आहेत. मोलगी-काठी रस्त्यावर निंबीपाडा येथील काजू प्रक्रिया उद्योग आदिवासी सभासद चालवीत आहेत. पारंपरिक आमसुलाला आधुनिकतेची जोड देऊन या वर्षापासून सोलर ड्रायरवर आमसूल प्रक्रिया उद्योग सुरू झाला आहे. विविध प्रयोग या भागात सुरू असल्याने सातपुड्यातील शेती राज्यभर चर्चेत आली आहे. येथील आदिवासी सिंचन तंत्र तर जगाला थक्क करणारे आहे.

पाटचारीचे ब्रिटिशांनी संशोधित केलेले सायफन सिंचन तंत्र सर्वश्रुत आहे. सातपुड्यातील तोरणमाळ येथे यशवंत तलावावर पाच दशकाहून अधिक काळापासून तो प्रयोग सुरू आहे. त्याला शास्त्रीय आधारही आहे. परंतु त्याहीपेक्षा वेगळे तंत्र सातपुड्यातील आदिवासींनी विकसित केले आहे ते म्हणजे पाटचारीचा प्रयोग. हा प्रयोग दुसरा-तिसरा काही नसून पहाडापासून वाहणाऱ्या स्थानिक नदी-नाल्यातील अथवा जिवंत झऱ्यातील पाणी अनोख्या तंत्राने कुठल्याही ऊर्जेचा वापर न करता पाटचारीने आपल्या शेतापर्यंत पाणी नेण्याचा प्रयोग. सातपुड्यातील नद्या अथवा नाले डोंगरातूनच वाहतात. त्यामुळे कुठलीही नदी अथवा नाला जमिनीपासून खोलच असतो. परंतु या खोलीवर वाहणारे पाणी पाटचारीने प्रवाहाच्या विरुध्द दिशेने २० ते २५ मीटर उंचीवर नेले जाते आणि तेच पाणी दोन ते तीन किलोमीटर पाटचारीने शेतांमध्ये पोहोचविले जाते.

या संदर्भातील सातपुड्यातील बेडाकुंड, बिजरीपाटी, पिंपळबारी, दहेल या गावांना भेटी दिल्यानंतर तेथील शेतकऱ्यांनी अवगत केलेल्या तंत्राची माहिती घेतली. तेव्हा असे समजले की, बेडाकुंड ते वाडीबारदरम्यान वाहणाऱ्या नाल्यावरुन पाणी आणून ४० ते ४५ एकर शेती बागायती केली जाते. पिंपळबारी येथील डेमजी गोयल्या नाईक या शेतकऱ्याने डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या झऱ्यातून सुमारे अडीच किलोमीटरची चारी टाकून पाणी आपल्या शेतापर्यंत नेले आहे. या चारीतून सुमारे ५० एकर शेती बागायती होते. बिजरीपाटी येथील शेतकरी सोमा बोगल्या वसावे या शेतकऱ्याने गावाजवळच असलेल्या साकलीउमरपासून दीड किलोमीटर चारी टाकून पाणी नेले आहे. या शेतकऱ्यांशी चर्चा केली असता हे पाणी त्यांनी सहजतेने नेले असून चारी खोदत जाऊन मागून पाणी सोडायचे, हे पाणी पुढे प्रवाहित कसे होईल त्यासाठी चारी किती खोल करावी, पाणी पुढे प्रवाहित होण्यासाठी पाण्याचा दाब किती वाढवावा याचा अंदाज येतो व त्यावरूनच पुढे पाणी नेले जाते. असे चारी खोदणारे जाणकारही सातपुड्यात दुर्मीळ झाले असून नवीन पिढीत त्याबाबत कुणीही जाणकार

नाहीत.

आदिवासींच्या या प्रयोगाला प्रोत्साहन देण्यासाठी बायफ मित्र संस्थेने वाडी प्रकल्पांतर्गत आवश्यक त्या ठिकाणी सर्वेक्षण करून बंधारे बांधण्याचे नियोजन केले आहे. या पाण्याचा बारमाही वापर तेथील शेतकऱ्यांना करता यावा यासाठी ६० छोटे-छोटे सिमेंट-दगडाचे बंधारे बांधले आहेत. या बंधाऱ्यांमुळे नदीतील वाहून जाणारे पाणी अडविले जाते. परिणामी पूर्वी डिसेंबर-जानेवारी मध्येच कोरड्या पडणाऱ्या नद्यांमध्ये बंधाऱ्यांमुळे मार्च-एप्रिलपर्यंत पाणी असते. शिवाय पाणी अडविल्याने चारीतील पाण्याचा दाबही वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी त्याचा चांगला फायदा होत आहे. या प्रयोगामुळे ६२८ आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळत असून त्यांनी त्याद्वारे एक हजार १०६ एकर जमीन ओलिताखाली आणली आहे. त्यात ते हरभरा, मका, गहू आणि भाजीपाल्याचेही पीक घेत आहेत. पीकपेरा आणि पाण्यांच्या नियोजनासंदर्भात बायफतर्फे मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी शेतकऱ्यांचे छोटे छोटे गट तयार करण्यात आले असून या भागातील आदिवासी शेतकऱ्यांना अतिशय उत्तम पद्धतीचे शेतीचे तंत्र गवसले आहे. त्यामुळे त्यांचे उत्पन्नही वाढले आहे. या पाटचाऱ्यांची दुरुस्ती शेतकरी स्वत:च करीत असून त्यासाठी देखभालीचा खर्च ते वार्षिक प्रत्येकी २०० रुपये जमा करून भागवीत असतात.

आदिवासींचा पाटचारीचा प्रयोग खरोखर इतर भागांसाठीही प्रेरणादायी आहे. आतापर्यंत पुणे-मुंबई येथील काही सिंचनतज्ज्ञ व शास्त्रज्ञांनी या भागाला भेट दिली असून त्यांनीही या प्रयोगाचे कौतुक केले आहे. त्यामुळे शासनानेही याकडे लक्ष घालून त्याला आधुनिकतेची जोड देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. हे तंत्र महाराष्ट्रभर पोहोचविण्यासाठी नव्याने निर्माण होणाऱ्या कृषी महाविद्यालयातूनही त्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

❑ ❑



# ऊर्जा विकास



**भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र**

खानदेश भूषण म्हणून ओळखले जाणारे भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र तापी नदीच्या काठी, गर्द व दाट अशा वनराईमध्ये वसले आहे. एशियन हायवे क्रं. ४६ च्या निकट व भुसावळ शहरापासून ८ कि.मी. अंतरावर सुमारे ७०४.९८ हेक्टर परिसरात हे विद्युत केंद्र वसलेले आहे. दीपनगर भुसावळ संच क्र. १ ची स्थापना जुलै १९६८ मध्ये झाली होती. परंतु त्याचे अयुष्यमान संपल्यामुळे गेल्या दोन वर्षापासून ते बंद करण्यात आले. त्याची स्थापित क्षमता ही ६२.५ मे.वॅ. (सध्या घटीत क्षमता ५५ मे.वॅ.) होती. संच क्रं. २ ची स्थापना सन १९७९ च्या ऑगस्ट महिन्यात झाली असून त्याची स्थापित क्षमता २१० मे.वॅ. एवढी असून याकरिता ८३.८९ कोटीची गुंतवणूक करण्यात आलेली होती. संच क्रं. ३ ची स्थापना सन १९८२ च्या मे महिन्यात झाली असून त्यांची स्थापित क्षमता २१० मे. वॅ. एवढी आहे. त्याकरिता ११०.४४ कोटीची गुंतवणूक करण्यात आली होती. भुसावळ नवीन प्रकल्पांतर्गत प्रत्येकी ५०० मे.वॅ.चे आणखी दोन संच नुकतेच उभारण्यात आले आहे. भुसावळ केंद्राची सध्याची स्थापित क्षमता ९२० मे.वॅ असून लवकरच ती १४२० मे.वॅ. होईल.

## नाशिक औष्णिक विद्युत केंद्र

हे केंद्र नाशिक रोड रेल्वे स्थानकापासून व नाशिक पुणे महामार्गापासून ८ कि.मी. अंतरावर गोदावरी नदीच्या तीरावर आहे. नाशिक औष्णिक विद्युत केंद्रात ३- २१० मे. वॅ. स्थापित क्षमतेचे संच आहेत.टप्पा क्र. १ मधील प्रत्येकी १४० मे.वॅ. क्षमतेचे संच सन १९७० व १९७१ मध्ये सुरू झाले होते. परंतु आयुष्यमान संपल्यामुळे गेल्या दोन वर्षापासून ते बंद करण्यात आले. पहिला टप्पा क्र. १ १६ जुलै १९७० रोजी कार्यान्वित झाला. संच क्र. २, दि. २१ मार्च १९७१ रोजी कार्यान्वित झाला. नाशिक औष्णिक विद्युत केंद्र टप्पा क्र.२ येथे पहिला संच २६ एप्रिल १९७९ रोजी कार्यान्वित झाला. पुढील दोन संच क्र. ४ (१० जुलै १९८०) व ५ (३० जानेवारी १९८१) रोजी कार्यान्वित झाले. नाशिक औष्णिक विद्युत केंद्रामध्ये ''शक्तिमान '' हे टाकाऊ लोखंडापासून बनविलेले आशिया खंडातील पहिले शिल्प आहे. त्याचे वजन २७ टन आणि त्याची उंची १७ मीटर आहे. याची नोंद ''गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्''मध्ये आहे. स्वत:चे संकेतस्थळ www.mahagencontps.com सेवा सुरु करणारे नाशिक औष्णिक विद्युत केंद्र हे पहिले केंद्र ठरले आहे. हे औष्णिक विद्युत केंद्र हे आय. एस. ओ ९००१:२००० ही गुणवत्ता प्रणाली अंगीकारून प्रगतिपथावर वाटचाल करणारे विद्युत केंद्र आहे. जून २००६ पासून नाशिक औष्णिक विद्युत केंद्राने पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली आय.एस.ओ १४००१:२००४ अंगीकारण्याचे उद्दिष्ट ठेवून ते साकार केले.

**- महेश अफले**

❑ ❑

अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, डॉ. संजीवकुमार यांनी 'लोक सहभागातून गाळ काढण्याची विशेष मोहीम' (Misson De-silting of water reservoirs in Ahmednagar district) गेल्या दोन वर्षांमध्ये राबवली आहे.

# लोकसहभागातून दुष्काळावर मात



**अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, डॉ. संजीवकुमार यांनी 'लोक सहभागातून गाळ काढण्याची मोहीम' राबवली. यामुळे १,४४९ तलावांतून ८५ लाख ४० हजार ब्रास एवढा गाळ काढला गेला. यामुळे नवीन पाणीसाठवण क्षमता निर्माण होऊन जवळपास तीन हजार हेक्टर्स जमीन सिंचित होऊ शकली. यामुळे नऊ हजार हेक्टर शेतजमिनीची उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे. या मोहिमेमुळे जवळपास पाचशे तलावांची पाणीसाठवण क्षमता वाढली. एवढ्या क्षमतेचे नवीन तलाव बांधावे लागले असते तर ५४.३६ कोटी रुपयांचा निधी लागला असता.**

लोकशिक्षण, लोकसहभागातून आणि ग्रामीण भागातील स्थनिक स्वराज्य संस्थाच्या सहकार्यातून राबवण्यात आलेल्या या योजनेचे उद्दिष्ट होते ते गाळ काढण्याच्या प्रक्रियेतील अडथळे दूर करून; विस्तृत प्रमाणावर गाळ काढण्याचे! या छोटयाशा कालावधीमध्ये १,४४९ तलावांतून ८५ लाख ४० हजार ब्रास एवढा गाळ काढला गेला. वरकरणी लहान वाटणाऱ्या या कृतीची कृषी अर्थशास्त्राच्या परिभाषेत मांडणी केली तर पाणीसाठवण बंधाऱ्यांतील अडचण झालेल्या या कामाची किंमत आहे किमान १२० कोटी ८४ लाख रुपये. यामुळे नवीन पाणीसाठवण क्षमता निर्माण होऊन जवळपास तीन हजार हेक्टर्स जमीन सिंचित होऊ शकली. नऊ हजार हेक्टर शेतजमिनीची उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे. यामुळे कृषीउत्पन्न वाढीमध्ये किमान चाळीस कोटी रुपयांची भर पडणार आहे. या मोहिमेची विशेष नोंद घ्यायची आहे, ती यासाठी की शेकडो कोटींचा शेतकऱ्यांना फायदा देणाऱ्या या उपक्रमावर शासनाचा एक पैसाही खर्च झाला नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील भौगोलिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करून 'गाळ काढण्याचा उपक्रम' त्यांनी राबवला. या जिल्ह्यातील दक्षिणेतील सर्व तालुके कायमस्वरूपी अवर्षणप्रवण आहेत. त्याचाच परिणाम म्हणून १९७२ च्या दुष्काळामध्ये मोठ्या प्रमाणावर साठवण बंधारे, पाझर तलाव, गाव तलाव व नालाबांध अशी पाणीसाठवण करणारी कामे होत आली आहेत. या सर्व तलावांची संख्या आजमितीला ९७४१ एवढी प्रचंड आहे. एकूण साठवण क्षमता जवळपास ९८६५ एम.सी.एम एवढी आहे. बहुतांश तलाव आज गाळाने भरले असून त्यांची पाणीसाठवण क्षमता नष्ट झाली आहे. मोठ्या प्रमाणावर शासकीय निधी खर्च करून जलसंधारणासाठी उभी केलेली ही व्यवस्था दुरुस्तीसाठी किंवा देखभालीसाठी शासकीय निधी उपलब्ध होत नसल्याने कुचकामी ठरली आहे. एका बाजूला अत्यंत कमी पाऊस व दुसऱ्या बाजूला पावसाच्या पाण्याची वापरासाठी साठवणूक करता यावी म्हणून बांधलेले तलाव गाळाने भरलेले असल्यामुळे त्यांचा शेतकऱ्यांना / गावांना काहीच उपयोग होत नाही. अशा वारंवार उदभवणाऱ्या टंचाईसदृश्य परिस्थितीमध्ये प्रशासनासमोर कायमस्वरूपी प्रश्न निर्माण झाला होता. अशा वेळी पावसाळा सुरू होण्यापूर्वी, शासकीय निधी उपलब्ध नसताना, जिल्हाधिकाऱ्यांनी कल्पकता दाखवून हा उपक्रम राबवला व यशस्वी केला.

डॉ. संजीवकुमार यांनी हे काम महात्मा फुले जल व भूमी संधारण अभियानांतर्गत केले. स्वत:च्या अध्यक्षतेखाली व जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोबत घेऊन जिल्हा समिती गठित केली. जिल्ह्यातील मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली थेट ग्रामपातळीवर यंत्रणा कशा पद्धतीने सहभागी करून घेता येईल याचे नियोजन केले. तालुका पातळीवरील समिती व सदस्याचे प्रशिक्षण ग्रामपातळीवरील कर्मचारी/सरपंचांसाठी प्रशिक्षण व कार्यक्रम आखला. प्रचलित नियमांचा अभ्यास करून गाळ काढण्यावरील रॉयल्टी, स्थानिक अडचणी इत्यादींवर मात केली. गावोगावच्या तलावामधील रॉयल्टीमुक्त गाळ शेतकऱ्यांना घेऊन जाण्याचे आवाहन केले गेले.

**लहू कानडे**

शेतकरी जमिनीची सुपीकता वाढण्यासाठी हजारो रुपयांचे रासायनिक खते वापरत असतो. त्याऐवजी समृद्ध खनिजे पोटॅश, ऑरगॅनिक कार्बन, फॉस्फरसयुक्त झालेला गाळ जमिनीमध्ये टाकण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वखर्चाने नेला. काही शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात गाळ टाकण्याकरीता कर्जसुद्धा घेतले. या मोहिमेस इतके यश लाभले की, त्याचा फायदा जवळपास दहा हजार हेक्टर क्षेत्रासाठी झाला. या मोहिमेमुळे जवळपास पाचशे तलावांची पाणीसाठवण क्षमता वाढली. एवढ्या क्षमतेचे नवीन तलाव बांधावे लागले



असते तर ५४.३६ कोटी रुपयांचा शासकीय निधी लागला असता. या प्रयोगाने 'गाळ काढणे म्हणजे नवीन साठवण तलाव बांधणे' असा एक वाक्प्रचार प्रत्यक्षात आणला आहे.

गाळ काढण्याच्या या उपक्रमाने एक नवीन दिशा मिळाली आहे. येणाऱ्या पावसाळ्यात गाळ काढलेल्या तलावात आणि उद्‌भवात पाणी साठेल. गाळ काढण्याच्या या योजनेने कोणतेही प्लॅन इस्टिमेट, तांत्रिक मंजुरी या किचकट प्रशासकीय प्रक्रियेमध्ये न पडता, मागेल त्याला त्वरित काम देण्याची एक योजना यामुळे प्रशासनाला मिळाली आहे. अभियान काळात ज्यांना शक्य आहे, त्यांना स्वखर्चाने मोफत गाळ नेता आला. आता जर रोजगार देणारे काम म्हणून मजुरांना खोदकाम देता आले तर, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून मागेल त्याला त्याच्या गावाजवळ काम देता येईल व सर्वार्थाने उपयुक्त असणारी योजना म्हणून ती चिरंतन होईल.

❐ ❐

# स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिज्वाला

**स्वातंत्र्यलढ्यात उत्तर महाराष्ट्राचे योगदान लक्षवेधी असे आहे. वेगळेपणाचा ठसा उमटविणाऱ्या चळवळी, आंदोलने व उठाव उत्तर महाराष्ट्रात झाले. अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदूरबार आणि जळगाव या उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांनी आपल्या देशाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांपासून क्रांतिकारक अन् स्वातंत्र्यसैनिकांच्या सहवासाच्या स्मृती अभिमानाने उराशी बाळगल्या आहेत.**

मिलिंद चवंडके

२८ मे १४९० मध्ये अहमद निजाम शहाने अहमदनगर शहराची मुहूर्तमेढ रोवली व आपली राजधानी केली. दख्खनच्या पठारावर १६ वे शतक म्हणजे निजामशाहीचे शतक मानले जाते. नगरचा प्रांत इ. सनापूर्वी ९० ते ३०० पर्यंत पैठणच्या आंध्र भृत्यांकडे होता. इ.स. ५५० ते ६७० पर्यंत चालुक्यांकडे होता. इ.स. ६७० ते ९७३ पर्यंत राष्ट्रकुटांकडे होता. इ.स. ९७३ ते ११९० पर्यंत चालुक्यांकडे आला. इ.स. ११९० ते ११३० पर्यंत देवगिरीच्या यादवांकडे होता. इ.सन १७५९ मध्ये नगर पेशव्यांकडे आले व नंतर इंग्रजांकडे गेले. नगरने निजामशाही, मोगलकाळ, पेशवाई, ब्रिटिश अंमल सारे काही सोसले. नगर शहराजवळील भिंगारची 'स्वातंत्र्य सैनिकांचे गाव', अशी ओळख निर्माण झाली. लो. टिळकांनी केसरी वृत्तपत्रामधून येथील स्वातंत्र्यसैनिकांचे खास कौतुक केले होते.



क्रांतिवीर शिरीषकुमार यांचे स्मारक

१९०८ मध्ये भिंगारला पहिला बॉम्ब तयार करण्यात आला. महाराष्ट्रात सर्वप्रथम भाषण बंदी कायदा येथील गणपतराव फुलारी यांनी १९३२ मध्ये मोडला. भिंगारमधील रखमाजी बोंदर्डे आणि सौ. विठाबाई बोंदर्डे या पती-पत्नीने १९४० मध्ये जोडीने केलेला महाराष्ट्रातील पहिला सत्याग्रह होय. येथील नारायणराव लकारे यांच्या वाड्यात आयोजित केल्या जाणाऱ्या गुप्त बैठकांचे निरोप लिंगायत गवळी समाजामध्ये दुधाचे रतीब घालणारे मोठ्या विश्वासाने देत असत. मिश्रीलाल भंडारी, किसनराव पतके, चिमाजी लालबोंद्रे, उमाजी हरबा, नारायण विटणकर, पन्नालाल भंडारी, भगवान वराडे, सौ. द्वारकाबाई कुलट, श्रीमती गीताबाई जंगम, गंगुबाई गाडगीळ आदींच्या उपस्थितीत होणाऱ्या गुप्त बैठका स्फुर्ती देणाऱ्या ठरत. १९४२ मध्ये हरिभाऊ गोंधळे व घाटे यांनी भिंगारच्या वेशीवर असलेले कॅन्टोन्मेंट बोर्डाचे कार्यालय टाइमबॉम्ब लावून उडवून दिले होते.

१९०८ मध्ये मोहिनीराज शंकर, श्रीपत मुळे, माधव रसाळ, ग्यानबा रानमाळकर, बबन शिंपी, वासुदेव कुकडे, शाहुराव कुकडे प्रभृतींनी बॉम्बची निर्मिती करण्याची कामगिरी फत्ते केली होती. भिंगारच्या मारुती मंदिरासमोर जानकीबाई आपटे यांच्या अध्यक्षतेखाली युध्द विरोधी घोषणा देऊन परिसर दणाणून टाकण्यात आला. १९४१ मध्ये महात्मा गांधींच्या आदेशानुसार येथील मिश्रीलाल भंडारी यांनी वैयक्तिक सत्याग्रह केल्याने त्यांना अटक झाली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांना स्थानबद्ध करून येरवडा, साबरमती व नाशिक येथील तुरुंगात ठेवण्यात आले. मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह, दारू गुत्यावर पिकेटिंग, परदेशी कापडाची होळी अशा अनेकविध आंदोलनांनी भिंगार गाजले. २५ डिसेंबर १९४२ ला नगरच्या सरोज सिनेमागृहामध्ये 'चॉकोलेंट सोल्जर' हा सिनेमा पाहत असलेल्या ब्रिटिशांवर झालेल्या हॅण्डग्रेनेड (बॉम्ब) हल्ल्यात भिंगारमधील राधाकिसन खोमणे, रत्नम पिल्ले, पन्नालाल चौधरी, घनश्याम वराडे यांचा सहभाग होता. हबीबखान महंमदखान यांनी बॉम्ब टाकला. त्यात ५ -६ सैनिक मरण पावले. २५-३० जखमी झाले. मोहन देठ, पप्पुशेठ बेद्रे, सोनोसिंग परदेशी, नारायण औटी, सुलोचना वराडे आदी प्रभात फेऱ्या, बुलेटीन वाटप, मोर्चे, आंदोलने यात हिरिरीने सहभाग घेत असत.

### १८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम

१८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या वेळी नगर जिल्ह्यातील समशेरपूर डोंगरात भागुजी नाईक व ब्रिटिश सैनिक यांच्यामध्ये झालेली चकमक राहुरी तालुक्यातील वळणपिंप्री येथील पाथरजी नाईक याने पाहिली व त्याला स्फुर्ती मिळाली. पाथरजीची मोठी फौज असल्याने राहुरी, नेवासा, सोनई भागात त्याचा मोठा दबदबा होता. नगर जिल्ह्यातील पानेगाव मांजरीचा भिल्ल शहाजी नाईक याने राहुरी तालुक्यापासून मोगलाईतील कन्नड परगण्यापर्यंत जे भिल्ल राहत होते, त्या बहुतेकास जमा करून खानदेशच्या सरहद्दीवर नवे बंड उभे केले. नगरचे पोलीस सुपरिटेंडेंट लेफ्टनंट जे. डब्ल्यू हेंद्रे यांनी बंडाच्या बिमोडाची तयारी केली. गोळीबार सुरू होताच भिल्लांनी तलवारी, कुऱ्हाडी, भाले, बरच्या, गोफनी, तोड्याच्या बंदुका या गावठी शस्त्रांसह इंग्रजांना प्रत्युत्तर दिले. त्यात ले. हेन्री ठार झाले. नगरच्या उत्तरेकडील प्रदेशातून, नाशिकच्या दक्षिण भागातून आणि त्र्यंबकेश्वरमधून भिल्लांनी

स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरोधात लढा उभारला होता. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील नांदूर शिंगोटे गावचा भागोजी नाईक हा रहिवासी. १८५५ मध्ये भागोजी नगरच्या पोलीस दलात जमादार होता. बंडखोरांना अप्रत्यक्ष मदत केल्याने त्याला शिक्षा झाली. तेथून पळ काढून त्याने कोपरगाव, राहुरी, पारनेर, अकोले, सिन्नर, निजामाचे राज्य या भागातील भिल्ल टोळ्या जमा केल्या. ब्रिटिश विरोधी स्वातंत्र्ययुद्धाचे नाशिक व अहमदनगर भागाचे नेतृत्व भागोजी नाईकने केले. पेठचे नेतृत्व भगवंतराव पवार यांच्याकडे होते. नाशिक, त्र्यंबक आणि पेठचे उठाव परस्परांशी पूरक व संबंधित होते. ले. स्टुअर्ड फेब्रुवारी १८५८ मध्ये भागोजीवर चाल करून गेला असता भिल्लांच्या धनुष्यबाणांपुढे इंग्रजी हत्यारे फिकी पडली. तीर लागून स्टुअर्ड गतप्राण झाला. जंगलात पळून गेलेल्या भिल्लांच्या टोळ्यांचा पाठलागावर कॅप्टन नताल गेला. नगर जिल्ह्याचा संपूर्ण बंदोबस्त करून बाजूच्या खेडेगावावर त्याने पहारा ठेवला होता. जंगलातील टोळ्यांचा सुगावा लागताच कॅप्टन पाटंजर याने डोंगरातील एका कडेकपारीच्या अवघड जागी भिल्लांच्या एका टोळीला बायकामुलांसह पकडले असता इंग्रज पलटणीतील ३५ माणसे मारली गेली. ले. ब्लेअर व ले. लरिंट जखमी झाले. भिल्लांच्या लपलेल्या दुसऱ्या टोळीने ६० इंग्रजांना ठार केले. ११ नोव्हेंबर १८५९ ला सिन्नरजवळ मिठसागर येथे ब्रिटिशांबरोबर झालेल्या युध्दात भागोजी व त्याचे सहकारी ठार झाले. भागोजीच्या साथीदारांना पकडून काळ्यापाण्याची शिक्षा देण्यात आली. ब्रिटिश दफ्तरात पेठ परिसरातील २६ जणांना काळ्या पाण्यावर पाठविल्याची नोंद आहे. १८१८ पासून रामोशी, भिल्ल, धनगर, हटकर यासारखी मंडळी उठाव करत होती. नाशिकमधील पेठ आणि हरसुल भागातून कोळ्यांनी ब्रिटिश विरोधी उठाव केला होता. संस्थानिकांची मदत नसताना आदिवासी क्रांतिकारकांनी १८५७ चा उठाव गाजवला. नाशिक जवळील ठाकरांपैकी पांडू ठाकर याने बंड उभारल्याने त्याला त्र्यंबकला फाशी देण्यात आली. महादेव कोळी बंडखोरांनी हरसुलचा बाजार लुटून उठावात सहभाग घेतला. नगर, नाशिक, खानदेश, माळवा, गुजरात या भागात आदिवासी इंग्रजांशी सतत झगडत राहीले. महाराष्ट्रीय बंडखोरांची संघटना नाशिक जिल्ह्यातील पेठ गावचीच.

धुळे जिल्ह्यातील नवापूर भागात इंग्रजांवर हल्ले करण्यात येत होते. दशरथ नाईक यांनी १८२० मध्ये लढा सुरू ठेवला होता. सागबारा संस्थानातील कुंवर आणि सावे यांनी नवापूर व कुकरमुंडा भागात इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला होता. नगर भागातील भिल्लांच्या बंडखोर तुकडीने पिंपळनेर (ता. साक्री) येथे सरकारी खजिना लुटला होता. (इ.स.१८४१) नगर जिल्ह्यातील ४०० भिल्लांनी ७ ऑक्टोबर १८५७ ला पालनशेर हे खेडे लुटून तारा तोडल्या. १९४२ च्या आंदोलनात धुळे जिल्ह्यातील मोहाडी गावी रेल्वे रूळ काढण्याचा व सोनगिरीजवळ तारायंत्र तोडण्याचा प्रयत्न झाला. घातपाताचे बरेच प्रकार घडले. जळगावला पूर्व खानदेश म्हणून नवी ओळख मिळाली. नंदुरबार तेव्हा धुळे जिल्ह्यातच होते. धुळे जिल्ह्यातील चिमठाणे गावी ४ एप्रिल १९४४ ला ब्रिटिशांचा साडेपाच लाखांचा खजिना डॉ. उत्तमराव पाटील, नागनाथ नाईकवाडी, विष्णू सिताराम पाटील आदी १६-१७ जणांनी मोठ्या हुशारीने लुटला. चिमठाणे दरोडा म्हणून ती घटना प्रसिद्ध पावली.

जळगाव जिल्ह्यातील किनगाव तालुयातील यावल गावचे एल. जी. चौधरी हे मूळ रहिवासी. मधु लिमये व साने गुरुजींच्या प्रेरणेने स्वातंत्र्यलढ्याच्या आंदोलनात सहभागी झालेल्या एल. जी. चौधरी यांना २४ वर्षांची शिक्षा झाली होती. रेल्वेकटाचे मुख्य सूत्रधार म्हणून त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला होता.

## 'चले जाव' आंदोलन

**१९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात सहभागी होण्यासाठी नंदुरबार येथे विद्यार्थ्यांनी काढलेल्या मिरवणुकीचे नेतृत्व शालेय विद्यार्थी शिरीषकुमार याने केले होते. हातात राष्ट्रध्वज घेऊन मोठ्या धाडसाने ब्रिटिश विरोधी घोषणा देणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांच्या मिरवणुकीवर ब्रिटिश शिपायांनी बेछूट गोळीबार केला. शिरीषकुमार आणि द्रविड या दोघांनी राष्ट्रध्वजाचे रक्षण करत छातीवर गोळ्या झेलल्या व ते हुतात्मे झाले. ५ सप्टेंबर १९४२ ला शिरीषकुमारने देशासाठी बलिदान देऊन युवापिढीसमोर 'राष्ट्रनिष्ठ' राहण्याचा आदर्श उभा केला.**



कोकणातील शिरोडा येथे झालेल्या मिठाच्या सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी धुळे जिल्ह्यामधून बरेच जण गेले होते. तेथून मीठ आणून ते विक्री करण्याचा कार्यक्रम धुळ्यात झाला. मीठ विकणाऱ्या व ते विकत घेणाऱ्या सहा जणांना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी तुरुंगात पाठविले होते. वकील शंकर श्रीकृष्ण देव, अनंतराव क्षीर इ. नी 'सॉल्ट ॲक्ट' भंग केला. धुळ्यातील गरुड हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी १८५७ च्या उठावात सहभाग घेतला. त्यात विद्यार्थी दशेतील गजेंद्रगडकर होते. ते पुढे न्यायमूर्ती झाले. १९२० मध्ये धुळ्यातील बऱ्याच विद्यार्थ्यांनी शाळा सोडून असहकार आंदोलनात सहभागी होणे पसंत केले. त्यात पिंपळनेरच्या राजाराम महाराजांचा समावेश होता. १९३० मधील सविनय कायदेभंग आंदोलनासही धुळे जिल्ह्यातून मोठा प्रतिसाद मिळाला. १९०६ पर्यंत धुळे, नंदुरबार, जळगाव हे तिनही जिल्हे खानदेशाचा भाग होते. १९६० मध्ये धुळ्याला पश्चिम खानदेश आणि वाघोड गावात रात्री १२ च्या सुमारास पंजाब मेल पाडण्याची धाडसी कामगिरी एल. जी. चौधरी यांनी सहकार्यांसह बजावली. मेल पाडण्याचा थरारक कट रचून त्यांनी मेल कशी पडते? हे शेजारच्या आंब्याच्या झाडावर बसून पाहिले. या प्रसंगाने इंग्रज पोलीस खडबडून जागे झाले. बोधवडजवळील उजनी जंगलात रेल्वे रूळ उखडण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु तो अयशस्वी झाला. १५ ऑगस्ट १९४२ ला भुसावळच्या रेल्वेपुलाला सुरुंग लावण्याची मोहीम एल. जी. चौधरी यांच्या नेतृत्वाखालीच पार पडली. भुसावळला पकडले गेल्यावर जळगावच्या कोर्टात खटला चालवून त्यांना शिक्षा सुनावली गेली.

१८५७ च्या सशस्त्र उठावाच्यावेळी इंग्रजांनी आपले नुकसान टाळण्यासाठी युक्तीने जाहीरनामा काढून अहमदनगर भागात प्रथमच जारी केला. कोणीही कोणत्याही प्रकारचे शस्त्र बाळगू नये. ज्यांच्याजवळ शस्त्रे असतील त्यांनी ठाण्यात आणून द्यावीत अन्यथा शस्त्र

सापडल्यास गुन्हेगार समजून कायद्याप्रमाणे शिक्षा करण्यात येईल. मराठीचे आद्य व्याकरणकार आणि नगर जिल्ह्यातले डेप्युटी मॅजिस्ट्रेट दादोबा पांडुरंग यांच्या हस्ते नि:शस्त्रीकरणाचा जाहीरनामा जाहीर करण्यात आला होता.

**न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे**

नाशिक जिल्ह्यातील निफाड या गावी १८ जानेवारी १८४२ ला न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा जन्म झाला. ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते. त्यांना भारतातील उदारमतवादी तत्त्वज्ञानाचे जनक मानले जाते.

नाशिकमधील ब्रिटिश कचेरी व त्र्यंबकेश्वरमधील सरकारी तिजोरीवर वासुदेव भगवंत जोगळेकर यांच्या नेतृत्वाखाली हल्ला करण्यात आला. मात्र तो अयशस्वी झाला. तरीही ब्रिटिशांनी जोगळेकरांवर खटला भरून त्यांना जाहीररीत्या फाशी दिले. ब्रिटिशविरोधी कारणाखाली भगवंतराव दळवी (नाशिक जिल्ह्यातील पेठ संस्थानचे प्रमुख) यांच्याविरोधात खटला चालवून ४ जाने. १८५८ ला मामलेदार कचेरीसमोर त्यांना साथीदारांसह फाशी देण्यात आले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ ला नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. वयाच्या ७-८ व्या वर्षी त्यांनी कुलदेवतेसमोर 'देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारून मारिता मारिता मरे तो झुंजेन' अशी शपथ घेतली. १९१० साली मारिया बोटीतून त्यांनी मारलेली उडी म्हणजे त्यांचा 'सागर विक्रम'च होता. यामुळे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न जगभर चर्चिला गेला. फ्रान्सच्या भूमीवर अटक झालेल्या सावरकरांना ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध युध्दाचा प्रयत्न, शस्त्रास्त्रांची गुप्त जमवाजवमव, जॅक्सन हत्याकांडास मदत या आरोपाखाली दोन जन्मठेपेच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. १९११ साली शिक्षा भोगण्यासाठी त्यांना अंदमानात पाठवण्यात आले. २६ फेब्रुवारी १९६६ ला २१ दिवसांच्या प्रायोपवेशनानंतर त्यांनी आत्मार्पण केले.

## तात्या टोपे

**१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातील नेते रघुनाथ उर्फ तात्या टोपे हे नाशिक जिल्ह्यातील येवला गावातील होते. इंग्रजांचे दिग्गज सेनापती विंडहॅमशी त्यांनी गनिमी काव्याने लढा देऊन त्यांचा पराभव केला. नानासाहेब पेशव्यांचे सेनापती म्हणून तात्या टोपे काम पाहत होते. त्यांचे संपूर्ण नाव रघुनाथ पांडुरंग येवलेकर. जन्म १८१४. दुसऱ्या बाजीरावाने त्यांच्या सद्‌गुणांची मुक्तकंठाने स्तुती करून भर दरबारात त्यांना नऊ मौल्यवान रत्ने लावलेली भरजरी टोपी दिली. तेव्हापासून लोक त्यांना तात्या येवलेकर ऐवजी 'तात्या टोपी' म्हणू लागले. पुढे 'तात्या टोपे' असे नाव पडले.**



**२७ नोव्हेंबर १८५७ ला त्यांनी इंग्रजांकडून कानपूर जिंकून घेतले. त्यामुळे इंग्रजी सत्तेला हादरा बसला. सर ह्यू रोज याने झाशीभोवती वेढा टाकल्याचे समजताच तात्या झाशीच्या राणीच्या मदतीला धावून गेले. ब्रिटिश राज्यसत्तेविरुद्ध बंड केल्याचा आरोप ठेवून १७ एप्रिल १८५९ रोजी त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली.**

**फैजपूर अधिवेशन**

**दादाभाई नौरोजींमुळे देशसेवेचे विचार प्रबळ झालेले 'पश्चिम खानदेशाचे गांधी' ॲड. बाळुभाई मेहता हे धुळे जिल्ह्यातील थाळनेर गावचे रहिवासी. पुढे ते नंदुरबारला स्थायिक झाले. लो. टिळकांनी धुळ्यामध्ये २७ ते ३० एप्रिल १९०८ दरम्यान मुंबई प्रांतिक सभेचे तीन दिवसीय अधिवेशन भरवले होते. जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथे १९३६ मध्ये काँग्रेसचे सुवर्णमहोत्सवी अधिवेशन झाले. ते खेड्यातील पहिले अधिवेशन असल्याने धुळे जिल्ह्यामधून स्वातंत्र्यप्रेमी मोठ्या संख्येने गेले होते. भुसावळचे वकील आण्णासाहेब दास्ताने यांनी टिळक व गांधी युगात अतुलनीय कार्य केले. पं. मदनमोहन मालविय यांच्या अध्यक्षतेखाली १९३२ मध्ये दिल्लीत झालेल्या काँग्रेसच्या बेकायदेशीर आंदोलनात सहभागी झाल्यावरून नवल आनंदा पाटील यांना १० दिवसांची शिक्षा झाली होती.**

**साने गुरुजी**

म. गांधींच्या प्रेरणेने सविनय कायदेभंग आंदोलनात सहभागी झालेले साने गुरुजी १९२३ मध्ये अंमळनेर (जि. जळगाव) तत्त्वज्ञान मंदिराच्या सेवेत रुजू झाले. तेथे त्यांना 'छात्रानंद' हे नाव मिळाले. १९३० च्या चळवळीत त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून सत्याग्रहात सहभाग घेतला. २ वर्षांची शिक्षा झाल्यावर धुळ्यातील तुरुंगात असताना त्यांनी विनोबा भावे यांची गीता-प्रवचने लिहून घेतली. नाशिकच्या तुरुंगात 'श्यामची आई' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी लिहिली. १९४८ नंतर काँग्रेसचे राजकारण न पटल्याने ते काँग्रेसमधून बाहेर पडले व समाजवादी झाले. १९४८ मध्ये 'साधना' साप्ताहिक सुरू केले.

**सेनापती बापट**

नगर जिल्ह्यातील पारनेर येथे पांडुरंग महादेव उर्फ सेनापती बापट यांचा जन्म झाला होता. मुंबईत शिक्षकाची नोकरी करत असताना मुंबई विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळवून १९०५ साली ते मेकॅनिकल इंजिनीअरिंग शिकण्यासाठी इंग्लंडला गेले. तेथे युरोपातील क्रांतिकारकांशी त्यांचा संबंध आला. पॅरिसमध्ये जाऊन ते बॉम्ब तयार करण्याची विद्या शिकून आले. लंडनच्या पार्लमेंटवर बॉम्ब टाकण्याचे त्यांनी ठरवले होते. १९०८ मध्ये बॉम्ब व पिस्तुले घेऊन ते हिंदुस्थानात आले. कलकत्याच्या क्रांतिकारकांना त्यांनी ही विद्या शिकवली. १९०९ मध्ये माणिकतोळा बॉम्ब प्रकरणात नरेंद्र गोस्वामी याने बॉम्बचे आद्यप्रवर्तक म्हणून बापटांचे नाव सांगितल्यावरून साडेचार वर्षे ते भूमिगत होते. १९२१ मध्ये त्यांनी मुळशी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. सुमारे १६ वर्षे त्यांनी तुरुंगवास भोगला.

ब्रिटिश सरकारला कारभार करणे अशक्य केलेल्या महाराष्ट्राच्या चळवळीचे प्रमुख सूत्रधार नगरचे अच्युतराव पटवर्धन होते.

म. गांधींच्या सत्याग्रहाच्या चळवळीतील नगर जिल्ह्यातील पहिले सत्याग्रही रावसाहेब पटवर्धन होते. ते पं. नेहरूंचे स्नेही होते. नेहरु त्यांना 'राऊ' म्हणत. नगर शहरातील गांधी मैदानात १९४० मध्ये भाऊसाहेब फिरोदिया यांनी नगरमधून पहिला वैयक्तिक सत्याग्रह केला. दादा चौधरी, भाई सथ्था,



**लो. टिळकांनी नगर शहरातील कापडबाजारलगतच्या इमारत कंपनीमध्ये 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच', अशी गर्जना केली होती.**

बाळासाहेब भारदे, रामभाऊ निसळ, भाऊसाहेब हिरे, डॉ. बोरा आदी नगर शहरातील मंडळींनी स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिले. नगरच्या किल्ल्यातच छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्वातंत्र्यासाठी शहीद झाले. १५ ऑगस्ट १९४७ ला आचार्य नरेंद्र देव यांनी बापूसाहेब भापकर व रावसाहेब पटवर्धन यांच्या उपस्थितीत नगरच्या किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकावला. धुळ्यात हरिजन सेवक संघाचे महाराष्ट्राचे प्रमुख रंगनाथ टोणगावकर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावण्यात आला.



**'अभिनव भारत'**

स्वा. सावरकरांच्या 'अभिनव भारत'चे क्रियाशील कार्यकर्ते नाशिकमधील कृष्णाजी गोपाळ कर्वे, विनायक नारायण देशपांडे, शंकर रामचंद्र सोमण, वामन उर्फ दाजी नारायण जोरी आदी होते. नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांची मुंबईला बदली झाल्याने त्यांना निरोप देण्यासाठी विजयानंद थिएटरमध्ये शारदा नाटकाचे आयोजन किर्लोस्कर कंपनीने केले होते. शारदा नाटकामध्ये बालगंधर्व काम करत होते. जॅक्सन मराठीचा जाणकार होता. अभिनव भारतच्या कार्यकर्त्यांनी जॅक्सनच्या जुलमी कारकिर्दीचा शेवट करण्याचा संकल्प केला. या कामगिरीसाठी क्रांतीकारक अनंत कान्हेरे यांना खास निमंत्रण धाडले. तेव्हा ते औरंगाबादला भास्कर बर्वे या त्यांच्या मामांकडे होते. सावरकरांनी इंग्लंडहून पाठवलेल्या पिस्तुलांपैकी निवडक पिस्तुले कान्हेरे, कर्वे व देशपांडे या तिघांनी निवडली. विजयानंद थिएटरमध्ये कोणी कोठे थांबायचे हे ठरवण्यात आले. कर्वे थिएटरमध्ये व देशपांडे दारात थांबण्याचे ठरले. कान्हेरेंना अडचण आल्यास या दोघांनीही तयार राहण्याचे निश्चित झाले. थिएटरमध्ये नाटकाची तिसरी घंटा होत असताना बाहेर घोडागाडीतून जॅक्सन उतरले. ते थिएटरच्या दाराजवळ येत असतानाच अनंत कान्हेरे यांनी अत्यंत चपळाईने गोळी झाडली. ती त्यांच्या काखेतून निघून जाताच कान्हेरेंकडून लागलीच आलेल्या दुसऱ्या गोळीने त्याच्या छातीचा वेध घेतला. जॅक्सन रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. पळापळ सुरु झाली पण अनंत कान्हेरे तेथेच उभे राहिले. खून केल्याची कबुलीही त्यांनी दिली. इंग्रजांनी कृष्णाजी कर्वे, विनायक देशपांडे, शंकर सोमण, वामन जोरी यांच्यासह ३७ जणांना पकडले. १५ सप्टेंबर १९१० ला मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश सर बेसील स्कॉट, न्यायमूर्ती हिडन व न्यायमूर्ती चंदावरकर यांच्यासमोर खटला सुरु झाला. मुख्य आरोपी म्हणून कान्हेरे, कर्वे व देशपांडे यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. १९ एप्रिल १९१० रोजी त्यांना फाशी देण्यात आले.

**संपर्क : ९४२२४९५२८९**

# लढवय्या तंट्या भिल्ल

महाराष्ट्र-मध्यप्रदेशच्या सरहद्दीवरील डोंगररांगांच्या पायथ्याशी असलेल्या बिरडा (जिल्हा निमाड) गावात राहणाऱ्या भाऊसिंग व जीवणी या भिल्ल दांपत्याच्या पोटी जन्मलेले साधे-भोळे मूल म्हणजे तात्या. धनुष्यबाण चालवणे, भालाफेक या पारंपरिक विद्येत तरबेज असलेल्या तात्याला ब्रिटिश सरकारने खोट्या गुन्ह्यात अडकवून दोन वेळा शिक्षा ठोठावली. २४ डिसेंबर १८७८ ला खांडवा जेलमधून पळून गेल्यावर जंगलाच्या आश्रयाने ते राहू लागल्यावर तंट्या भिल्ल म्हणून तात्या सर्वपरिचित झाले. त्यांच्या आईला गावातील शिवा पाटलाच्या माणसांनी मारुन नदीत फेकल्याचा व वडील सावकारकीच्या विळख्यात सापडल्याचा राग मनात असल्याने त्यांनी बंड छेडले. होळकर मुलखात ते राहू लागले. खांडव्याच्या डेप्युटी कमिशनरला आव्हान देणारा निरोप पाठवून त्यांनी बंडाचा श्रीगणेशा केला. सावकाराविरुद्धचे अभियान राबवले. सावकार व मालगुजारांना धडा शिकविण्यासाठी लढा सुरु केला. तंट्या भिल्ल यांच्या कार्यपद्धतीने सातपुडा पट्ट्यातील शेतकरी व आदिवासी भिल्लांमध्ये चैतन्य निर्माण झाले. त्यांनी स्वत:ला राजा म्हणून घोषित केले. भिल्लांची सुसंघटित हेरयंत्रणा उभी केली. नर्मदा-तापी मधील विंध्य सातपुड्याच्या टापूवर तंट्या भिल्ल यांची सार्वभौम सत्ता होती. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना व त्यांच्या साथीदारांना पकडण्यासाठी १० हजार ५०० रुपये आणि १५०० एकराच्या मालगुजारीचे मोठे बक्षीस जाहीर केले होते. तंट्या भिल्ल यांच्या विरुद्धच्या कार्यवाहीसाठी तंट्या पोलीस या स्वतंत्र सैन्यदलाची स्थापना करण्यात आली होती. तंट्या भिल्ल यांच्या गौरवाची गाणी निमाडच्या दऱ्या-खोऱ्यात गायली जायची. तंट्या भिल्ल एका दिवसात ते ५०-६० मैल अंतर पार करायचे. खरगोणमध्ये अटक झाल्यानंतर त्यांना २८ ऑगस्ट १८८९ ला जबलपूरच्या जेलमध्ये ठेवण्यात आले. ९ सप्टेंबर १८८९ ला सेशन कोर्टाने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ११ वर्षे ब्रिटिश सत्तेच्या तोंडचे पाणी पळवलेल्या या वीराला फाशी देण्याचा निर्णय न्यायालयाने १८ ऑक्टोबर १८८९ ला घेतला. जबलपूर सेंट्रल जेलमध्ये ४ डिसेंबर १८८९ ला त्यांना फाशी देण्यात आली. किशोरवयात माजलेल्या रेड्याशी एकाकी झुंज देणाऱ्या तंट्या भिल्ल यांचे जीवन अनेक नाट्यपूर्ण व अद्‌भुत घटनांनी भरले आहे.



११ ऑगस्ट १८८४ ला उपायुक्त निमाड यांनी आयुक्त नर्मदा विभागामार्फत दिलेल्या रिपोर्टमध्ये, तंट्या हल्ली जिथे निमाड, खानदेश व होळकर प्रांत एकत्र येतात त्या प्रदेशात असल्याची नोंद आहे.

- मिलिंद सदाशिव चवंडके,
संपर्क : ९४२२४९५२८९

# कर्तृत्व आणि कीर्ती

**साडेतीन शक्तिपीठांपैकी एक शक्तिपीठ उत्तर महाराष्ट्रात आहे. केवळ आराधनेपुरतेच नाही तर स्त्रीशक्तीचा विकास उत्तर महाराष्ट्रात कर्तृत्वरूपाने होत आहे. आपल्या कर्तृत्वाने देशातच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात उत्तर महाराष्ट्रातील अनेक महिलांनी कीर्ती मिळविली आहे.**

अर्चना वि. देशमुख

**चांदबीबी (१५५०-१५९९)** – अहमदनगरचा निजामशाह पहिला हुसेन याची ही मुलगी. तिला अरबी, फारसी, मराठी, कन्नड, तुर्की भाषांचे ज्ञान होते. चांदबाबीचा विवाह विजापूरचा पहिला अली आदिलशाह याच्याशी झाला. परंतु त्याच्या मृत्यूनंतर १५७५ मध्ये निजामशाही बुडविण्यासाठी मुघलांनी अहमदनगरवर चाल केली, तेव्हा चांदबीबीने निजामशाही सैन्याचे नेतृत्व केले. मुघल सैन्यास काहीकाळ रोखून ठेवण्यास ती यशस्वी झाली. १५९६ ते १५९९ या काळात तिने निजामशाहीचे तख्त राज्यपालक राणीच्या नात्याने सांभाळले. मुघलांशी युद्धबंदीच्या तहाची बोलणी सुरू झाली तेव्हा ती मुघलांना फितूर झाल्याची अफवा निजामशाही सैन्यात पसरली त्यातूनच निर्माण झालेल्या असंतोषातून चांदबीबीची हत्या करण्यात आली.



**अहिल्याबाई होळकर** : अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात अहिल्याबाईंचा जन्म ३१ मे, १७२५ रोजी झाला. माणकोजी शिंदे हे अहिल्याबाईंचे वडील गावाचे पाटील होते. स्त्रीशिक्षणास त्याकाळी फारसे महत्त्व नसतांनाही माणकोजी शिंदेनी आपल्या मुलीला शिकविले. पुढे जाऊन मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याबाईंचा विवाह झाला. कुम्हेरच्या लढाईत खंडेराव धारातीर्थी पडले. परंतु अहिल्याबाईंच्या सासऱ्यांनी त्यांना सती जावू दिले नाही. मल्हाररावांनी अहिल्याबाईंना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केले. १७६६ ते १७९५ पर्यंत त्यांनी माळव्यावर राज्य केले. नर्मदातीरी इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलविली. त्या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांना तत्त्वज्ञानी राणी म्हणून ओळखले जाते. अहिल्याबाईंनी भारतभरातील अनेक ठिकाणांच्या हिंदू मंदिरांचा जीर्णोद्धार करून नदीघाट बांधले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल.



**राणी लक्ष्मीबाई** – १८५७ च्या उठावात सहभागी झालेल्या आणि धोरणी, चतुर, युद्धशास्त्र निपुण अशा राणी लक्ष्मीबाई यांचे वडील मोरोपंत तांबे यांनी १७२७ साली पारोळा जि. जळगाव येथे एक किल्ला बांधला. ते काही काळ पारोळा येथे राहत असल्यामुळे पारोळा हे राणी लक्ष्मीबाई यांचे मूळगांव म्हणून ओळखले जाते.



गंगाधरराव नेवाळकर यांच्यासोबत लग्न झाल्यानंतर राणी लक्ष्मीबाई ह्या झाशी येथे गेल्या. परंतु गंगाधररावांच्या मृत्यूनंतर पुरुषप्रधान संस्कृती असणाऱ्या समाजाने एका विधवा राणीला दुर्लक्षित करू नये म्हणून त्यांनी पुरुषी पोशाखात धोरणीपणाने वावरण्याचे ठरवून झाशीच्या गादीच्या रक्षणार्थ युध्दशास्त्रातील प्रत्येक विद्येत प्रावीण्य मिळविले.

गव्हर्नर जनरल डलहौसीने संस्थाने खालसा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर १३ मार्च, १८५४ रोजी दत्तक विधान नामंजूर करून झांशी संस्थान ब्रिटिश साम्राज्यात विलीन करण्याच्या वेळी राणीने 'मेरी झांसी नही दूँगी', असे स्फूर्तिदायक उद्‌गार काढले, हेच शब्द पाळण्यासाठी राणी लक्ष्मीबाईंनी शेवटच्या क्षणांपर्यंत प्रयत्न केला. वयाच्या तेविसाव्या वर्षी राणी लक्ष्मीबाईंना वीरमरण आले.

**लीलाताई पाटील** – स्वातंत्र्याच्या संग्रामात अनेक महिला क्रांतीकारक सहभागी झाल्या होत्या. अशा या महिला क्रांतिकारकांच्या यादीतील खानदेशची क्रांतिवीरांगना लीलाताई पाटील यांचा उल्लेख करणे अनिवार्य आहे.

लीलाताईंचा जन्म नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्यातील साकोरे खेड्यात १५ मार्च, १९२२ रोजी झाला. घरची श्रीमंती होती. त्या काळात मुलींचे विश्व चूल व मूल इथपर्यंतच मर्यादित असून त्यांच्यावर अनेक बंधनेही होती. परंतु अशावेळी लीलाताईंनी सर्वांचा विरोध पत्करून वयाच्या सोळाव्या वर्षी उत्तमराव पाटील यांच्याशी १९३८ मध्ये विवाह केला. त्याचवेळी नर्सिंगचे शिक्षण पूर्ण केले व १९३९ साली अमळनेर येथे दवाखाना सुरु केला.

जन्मत:च अन्यायाविरूद्ध पेटून उठणारे कृतिप्रवण बंडखोर मन हाच लीलाताईंचा स्वभाव होता. आधुनिक विचारांच्या पार्श्वभूमीवर उभे राहून



उत्तमराव आणि लीलाताई पाटील

पतीबरोबर स्वातंत्र्याच्या रणसंग्रामात त्यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला. १९३९ ते १९४२ या काळात साने गुरुजींच्या खादी, काँग्रेस वर्तमान, सभासद नोंदणी, प्रभात फेरी, ग्रामसफाई, मजूर शेतकरी संघटन आदी कार्यात त्या आघाडीच्या स्वयंसेविका होत्या. याच दरम्यान अमळनेर कोर्ट, पोस्ट, स्टेशन जाळणे, कचेरी मोर्चा, मार्शल लॉ चा भंग अशा कारवायांसाठी त्यांना १४ वर्षांची शिक्षाही झाली. १९४० मध्ये त्यांची पहिली जेलयात्रा धुळे तुरुंगात झाली. १९४५ साली त्यांनी जेलमधून पलायन केले. त्यांनतर पत्रीसरकारच्या स्त्री तुफान सैनिकांच्या त्या सेनानी झाल्या.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शर्थीचे प्रयत्न केल्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी शिक्षणावर व महिलांना स्वबळाबर उभे करण्यासाठी भर दिला. १९४७ साली अमळनेर येथे जनता शिक्षण सहकारी मंडळाची स्थापना केली. पारोळा येथे ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. १९५२ साली लीलाताई ह्या पारोळ्याहून शिरपूर येथे स्थायिक झाल्या. तेथे त्यांनी वनिता सेवा मंडळाची स्थापना करून बालवाडी, शिवणवर्ग चालवले. कन्या विद्यामंदिर हे मुलींचे पहिले माध्यमिक विद्यालय स्थापन करून त्यात ८ वी ते ११ वी पर्यंत मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

१९७८ नंतर लीलाताई ह्या शिरपूर होमगार्ड युनिटच्या कमांडर म्हणून शेवटपर्यंत कार्यरत होत्या. अशा या क्रांतिवीरांगणेची दिनांक १ मे, १९८५ रोजी प्राणज्योत मालवली.

कै. लीलाताईंचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग पाहून साने गुरुजी म्हणतात–

लीलाप्रमाणे निर्मळ नि निष्पाप
सरळ नि निर्भय
सेवामय नि त्यागमय
स्त्री मी अजून पाहिली नाही.

**पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील** – राजकीय क्षेत्रात आपली प्रतिभा उमटविणाऱ्या प्रतिभाताई पाटील या खानदेश कन्येने भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा बहुमान मिळवून खानदेशच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

प्रतिभाताई पाटील यांचा जन्म १९ डिसेंबर, १९३४ मध्ये नंदगाव (जि. जळगाव) येथे झाला. घरची श्रीमंती. पाच भावांची एकुलती एक लाडाची बहीण. जळगावच्या एम. जे. कॉलेजमधून एम. ए. ची पदवी घेतल्यानंतर मुंबई येथे एल.एल.बी. चे शिक्षण घेऊन कायदेतज्ज्ञ झाल्या व १९६२ साली जळगाव विधानसभा मतदारसंघातून निवडून आल्या. ७ जुलै, १९६५ मध्ये अमरावतीचे देवीसिंह शेखावत यांच्यासोबत प्रतिभाताईंचा विवाह झाला. विवाहानंतर त्यांनी राजकीय क्षेत्र सोडले नाही. आरोग्य, पर्यटन, संसदीय कार्य, गृहनिर्माण, समाजकल्याण, सांस्कृतिक, शिक्षण असे विविध खात्यांचे मंत्रिपद त्यांनी भूषविले.



१९८५ साली राज्यसभेवर निवडून गेल्यावर राज्यसभेच्या उपाध्यक्षा म्हणून त्यांची निवड झाली. काही वर्षे त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्षपदही सांभाळले. त्यानंतर ८ नोव्हेंबर, २००४ मध्ये राजस्थानच्या राज्यपालपदाच्या जबाबदारी पार पाडल्यानंतर २५ जुलै, २००७ मध्ये प्रतिभाताई पाटील देशाचे सर्वात महत्त्वाचे व मानाचे पद असलेल्या राष्ट्रपतिपदी विराजमान झाल्या. प्रतिभाताई ह्या भारतीय प्रजासत्ताकाच्या १२ व्या राष्ट्रपती ठरल्या. आहेत.

## महिला साहित्यिक

**बहिणाबाई चौधरी** – खानदेशची 'निसर्गकन्या' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बहिणाबाई चौधरी यांचा जन्म आसोदा (जि. जळगांव) येथे १८८० मध्ये महाजनांच्या घरी झाला. वयाच्या १३ व्या वर्षी जळगांवचे नथुजी चौधरी यांच्याशी बहिणाबाईंचा विवाह झाला. बहिणाबाईंना तीन अपत्ये. वयाच्या तिशीतच बहिणाबाईंना वैधव्याचा योग आला. पण त्या खचल्या नाहीत. शिक्षणाशी बहिणाबाईंचा कधीच संबंध आला नसला तरी त्यांना निसर्गाकडून मिळालेली उदात्त देणगी म्हणजे त्यांच्या तोंडून निघालेल्या अस्सल ग्रामीण भाषेतील कविता. त्यांच्या ह्या कविता म्हणजे काम करताना त्यांच्या तोंडून जीवनाचा खरा मथितार्थ सांगणाऱ्या साध्या, सरळ व बोलीभाषेतील ओव्या.



कानाला गोड वाटणारी, मनाला भुरळ घालणारी, पण तितक्याच उत्कटपणे जीवनाच्या प्रत्येक प्रसंगाचा ठाव घेणारी साधी भाषा, विचारांचा व कल्पनेचा सुंदर मिलाप असलेल्या, बहिणाबाई चौधरी ह्यांच्या कविता आहेत.

**नजुबाई गावित :** या मावची जमातीच्या. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील गोंडारी पाड्यात जन्माला आलेल्या नजुबाई. घरात अठरा विश्वे दारिद्र्य, अंगाला पुरेसा कपडा नाही आणि पोटाला पोटभर भाकरी नाही. आशा परिस्थितीही पाड्यावर सुरु झालेल्या शाळेत वडीलांनी नजुबाईंचे नाव घातले. नजुबाईंनी चौथीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. साधारण १९६५–७० च्या सुमारास आदिवासी महिलांवर अनेक अन्याय, अत्याचार होत. जातपंचायतीसारख्या जाचक निर्णयांना आदिवासी महिलांना सामोरे जावे लागत होते. त्यावेळी आदिवासी लोकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवण्यासाठी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या माध्यमातून आदिवासी भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात यासाठी; १९७२ ते १९७८ च्या काळात नजुबाईंच्या नेतृत्वाखाली सर्वोच्च न्यायालयासमोर लढा पुकारण्यात आला होता. तेव्हापासून सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या माध्यमातून सत्यशोधक साहित्य सभेची निर्मिती झाली. या माध्यमातून ग्रामीण, दलित, आदिवासी साहित्याचा एक प्रवाह एकत्र आणण्याची महत्त्वाची भूमिका बजावली गेली.



नजुबाई गेल्या ४० वर्षांपासून दलित, आदिवासी महिलांच्या समस्यांवर आपल्या साहित्यातून भूमिका मांडत आहेत.

## अभिनय क्षेत्र

### शारदाबाई धुळेकर

१९४५–५० च्या काळात शारदाबाई धुळेकर यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. शारदाबाई या उत्तम गायिका व नृत्यांगना होत्या. त्याच बळावर त्यांनी चित्रपटसृष्टीत प्रवेश मिळवला. त्याकाळी अनेक चित्रपटातून नायिका, सहनायिकेच्या भूमिका करून धुळे शहराचे नाव रूपेरी पडद्यावर झळकावले. शारदाबाईंचे २००९ मध्ये

निधन झाले. त्यांनी, संन्यासी (१९४५), दिल्लगी (१९४९), लडाई के बाद (१९४३), लेफ्टनंट (१९४४), गृहस्थी (१९४८), हमारी शान (१९५१), हुस्न का चोर (१९५३), अलिबाबा और चालिस चोर (१९५४) अशा अनेक चित्रपटांतून भूमिका केल्या.

**स्मिता पाटील**



मराठी व हिंदी चित्रपट जगतात आपली छाप उमटविणारी अभिनेत्री स्मिता पाटील ह्या देखील शिरपूर तालुक्यातील शिवाजीराव पाटील यांच्या कन्या.

**समाजिक कार्य**

**डॉ. मेबल आरोळे :** राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजनेच्या निर्मितीत डॉ. मेबल आरोळे यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. अमेरिकेत उच्च शिक्षण घेवून भारतात परतलेल्या डॉ. मेबल



यांनी आपले पती डॉ. रजनिकांत आरोळे यांच्याबरोबर जामखेड, जि. अहमदनगर येथे १९७० मध्ये ग्रामीण आरोग्य प्रकल्प सुरु केला. दुष्काळी भागातील सर्वांत दुर्लक्षित असलेल्या गरीब समाजाला आरोग्याच्या सुविधा पुरवतानाच त्यांच्यासाठी विविध कार्यक्रम राबवून त्यांचे जीवनमान उंचवण्याचा प्रयत्न केला. अतिशय दुर्गम भागातील लोकांवर अशिक्षित, अंधश्रध्दा, अन्याय, अत्याचार, कुपोषण अशा गोष्टींचा पगडा असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर डॉ. मेबल यांनी त्यांच्या आरोग्य व आर्थिक विकास या गोष्टींवर काम करण्यास सुरुवात केली. डॉ. मेबल यांच्या मते या दुर्गम भागातील लोकांत बदल घडवून आणण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे महिला होत्या. त्यामुळे त्यांनी तेथील महिलांना एकत्र आणले, त्यांना आरोग्याचे शिक्षण देऊन त्याचे महत्त्व पटवून दिले. अंगणवाड्या, महिला मंडळे, बचत गट, आरोग्य शिबिरे अशा माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर करण्याबरोबरच आत्मसन्मानही मिळवून दिला आहे.

खेड्यापाड्यातील गोरगरिबांपर्यंत आरोग्याचे महत्त्व पटवून देणारा ग्रामीण आरोग्य प्रकल्प जामखेड, कर्जत, अकोले या तालुक्यातील ३०० हून अधिक गावांबरोबरच आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश तसेच ईशान्य भारतातील काही ठिकाणी यशस्वीपणे राबवला गेला. सध्या जगातील १०० देशांमध्ये 'जामखेड मॉडेल' स्वीकारण्यात आले आहे.

भारतात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजनेच्या निर्मितीतही डॉ. आरोळे दाम्पत्याचा महत्वाचा सिंहाचा वाटा आहे. दुर्गम भागातील लोकांसाठी आरोग्यविषयक महत्त्वाचे कार्य करणाऱ्या डॉ. मेबल यांना रॅमन मॅगसॅसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**नीलिमा मिश्रा** – संसाराचा रहाटगाडा नीट चालण्यासाठी आर्थिक हातभार लागावा यासाठी गावातील महिलांना बचत गटांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणाऱ्या नीलिमा मिश्रा. २००३ मध्ये भगिनी निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन संस्था स्थापन करुन बहादरपूर जि. जळगांव येथून आपल्या कार्याची सुरुवात केली. पहिला महिला बचत गट स्थापन केला. या बचत गटांमार्फत महिलांना एकत्र करुन त्यांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवणाऱ्या नीलिमा मिश्रा यांनी तयार केलेल्या बहादरपूरची गोधडीची ख्याती सातासमुद्रापार आहे. अमेरिका, आस्ट्रेलिया, फ्रान्स आदि देशात येथील बचत गटांची गोधडी निर्यात होत असते. जळगाव, नंदुरबार, धुळे,



नाशिक जिल्ह्यातील १८०० बचत गटांच्या माध्यमातून २५०० कुटुंबांचा आर्थिक स्वावलंबनाबाबतचा प्रश्न निकाली निघाला आहे. नीलिमा मिश्रा यांनी सन २००४ पासून आजपर्यंत अडीच हजार कुटुंबे आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण केली आहे. गावात शौचालये, शेतकरी बचत गट वृक्षारोपण, पाझर तलाव, नाला बांधणी आदी कार्य पाहता त्यांचे ग्रामीण विकासातील व महिला बचत गटातील योगदान स्पष्ट होते. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना २०११ मध्ये रॅमन मॅगसॅसे पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

**सावरपाडा एक्सप्रेस–कविता राऊत**

नाशिक जिल्ह्यातील सावरपाडा येथे ५ मे,



१९८५ रोजी एका सामान्य कुटुंबात तिचा जन्म झाला. तिने भारताचे लॉंग डिस्टन्स रनर या खेळाचे आशियाई व कॉमनवेल्थ या स्पर्धेमध्ये प्रतिनिधित्व केले आहे. १० किमी धावण्याच्या शर्यतीत तिचा ३४.३२ मिनिटांचा राष्ट्रीय विक्रम आहे.

२०१० च्या कॉमनवेल्थ खेळांमध्ये १०,००० मीटर धावण्याच्या शर्यतीत कविता राऊतने कांस्य पदक पटकाविले. महिलांच्या शर्यतीतल हे पहिले वैयक्तिक पदक आहे. तिने २०१० च्या आशियाई खेळात १०,००० मीटर धावण्याच्या शर्यतीत रजत पदक मिळविले आहे. चीनमध्ये गुआंझु येथे ५००० मीटर धावण्याच्या शर्यतीत कविताचा १६.०५ मिनिटांचा वैयक्तिक विक्रम आहे, तिने १० नोव्हेंबर, २००९ रोजी झालेल्या आशियाई ॲथलॅटिक्स चॅम्पीयनशिपमध्ये कास्य पदकासह आपल्या नावावर नोंदवला. धावण्याचे राष्ट्रीय विक्रम करणारी कविता राऊत आज 'सावरपाडा एक्स्प्रेस' म्हणून ओळखली जाते.

**अंजना ठमके :** त्र्यंबकेश्वरमधील गणेशगाव या खेड्यातील अंजना ठमके हिने



जिद्द आणि प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जात जिल्हा, राज्य, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले नाव गाजवले आहे. चीन येथे नुकत्याच पार पडलेल्या आशियाई यूथ गेम्सच्या ॲथलेटिक्समध्ये मुलींच्या ८०० मीटरच्या प्राथमिक फेरीत २ मिनिटे १३.२१ सेकंद अशी वेळ नोंदविल्यानंतर ८०० मीटरची मुख्य शर्यत २ मिनिटे ११.४७ सेकंदात पार करून सुवर्ण पदकावर तिने आपले नाव कोरले. या स्पर्धेतील भारतीय महिलांचे हे पहिलेच सुवर्णपदक आहे. ❒❒

# येवल्याची शान... पैठणीचा सन्मान



आपली प्राचीन वस्त्रोद्योगकला जोपासली जावी, त्यात नावीन्यपूर्ण प्रयोग व्हावे यादृष्टीने केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयातर्फे राष्ट्रीय स्तरावरील संत कबीर हा पुरस्कार वस्त्रोद्योग कारागिरांना देण्यात येतो. रोख रक्कम ७ लाख रुपये, सुवर्णपदक, ताम्रपट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे . अशा या राष्ट्रीय पुरस्कारासाठी यंदा नाशिक जिल्हयातील येवला येथील जेष्ठ पैठणी कारागीर शांतीलाल भांडगे यांची निवड करण्यात आली.

**देवेंद्र भुजबळ**

येवला हे परंपरागत पैठणीसाठी प्रसिद्ध आहे. येवल्यातील जोगवाडा परिसरात शांतीलाल भांडगे यांचा जन्म १९४४ साली कै. विठ्ठलसा मुरलीधरसा भांडगे यांच्या पोटी झाला. शांतीलाल जन्मत:च कुशाग्र बुद्धीचे होते. परंतु घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे त्यांना ९ वी पर्यंतच शिक्षण घेता आले. पुढे ते वडिलांना पैठणी विणकामात मदत करू लागले. अशा प्रकारे शालेय जीवनातच त्यांनी पैठणी कलेचे व व्यवसायाचे बाळकडू घेतले. परंतु या व्यवसायातून तेव्हा पुरेसा पैसा मिळत नसल्याने ते नाइलाजाने भारत सरकारच्या मुंबई येथील विणकर सेवा केंद्रात १९६९ साली रुजू झाले.



दरम्यान १९७१ पर्यंत येवला येथील पैठणी उद्योग लयाला जाऊ लागला होता. भारत सरकारच्या वतीने १९७२ साली लंडन येथे भारतीय विणकरांच्या वस्त्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते . या प्रदर्शनात भांडगे यांनी स्वत: तयार केलेल्या दोन पैठण्यांचे नमुने ठेवले होते . त्याच वेळी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाच्या वतीने पैठणी उद्योगाला प्रोत्साहन द्यावयाचे ठरवण्यात आले. त्याप्रमाणे विणकर सेवा केंद्रात पैठणीचे सहा लुम तयार करण्यात आले. या केंद्रात प्रारंभी २० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. १९७२ सालीच मुंबई येथील वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे भरविण्यात आलेल्या वस्त्र प्रदर्शनात पैठणी ठेवण्यात आली. या पैठणीला चांगली मागणी मिळाली. या मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून रेशीम उद्योगला चालना मिळाली. त्यानंतर मात्र पैठणी उद्योगाला चांगली चालना मिळाली.

केंद्र शासनाने पारंपरिक वस्त्रोद्योगाला चालना मिळावी म्हणून १९८६ साली हातमाग वर्ष साजरे केले . पैठणी क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल शांतीलाल भांडगे यांना केंद्र शासनाचा हातमाग वर्ष पुरस्कार मिळाला. श्री. भांडगे यांचे वैशिष्टये म्हणजे त्यांनी आर्थिक दृष्टया परवडतील अशा पैठणीचे एकधोटी , तीनधोटी असे प्रकार तयार केले. त्यांच्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी पैठणीचे मुनीया ब्रॉकेट , असावली , बारओपंजा, बंगडी मोर , लोटस , कूयरी , कॉटन पैठणी , टसर पैठणी असे विविध प्रकार कुशलतेने हाताळले आहेत. त्यांनी ६० इंच पन्हा असलेली भव्य पैठणी तयार केली आहे. या पैठणीसाठी त्यांनी स्वतंत्र हातमाग तयार केला होता. असावली नावाच्या पैठणीत त्यांनी ७०० वर्षापूर्वीचे डिझाइन आकारात आणले होते . यासाठी त्यांना १९९१ साली राष्ट्रपतींचा पुरस्कार मिळाला होता .

शांतीलाल भांडगे यांच्या बरोबरच त्यांचे लहान बंधू दिंगबर व दोन पुत्र राजेश व महेश यांनाही पैठणी क्षेत्रातील कामगिरीबद्दल राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे . मुंबई येथील हवामान न मानवल्यामुळे भांडगे यांनी विणकर सेवा केंद्रातून स्वेच्छा निवृत्ती पत्करली. परंतु या केंद्रामुळे आपल्याला मिळालेल्या अनुभवाचा, ज्ञानाचा ते मोठया कृतज्ञतेने उल्लेख करतात. कृतज्ञता, नम्रता, सौजन्यशीलता हे भांडगे यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिकच प्रभावी करतात.

आपली कला आपल्या वा आपल्या कुटुंबापुरतीच मर्यादित न राहता तीचा अधिकाधिक प्रसार व्हावा या हेतूने आजपर्यंत भांडगे यांनी अनेक युवक-युवतीना पैठणी कलेचे प्रशिक्षण दिले आहे. वयाच्या सत्तरीतही ते सतत कार्यरत आहेत आणि पैठणीसाठी नवनवीन प्रयोग करण्यात मग्न आहेत.

**संपर्क : ९८६९४८४८००**

❑ ❑

# वाघाडची यशकथा



वाघाड मध्यम प्रकल्प, हा वाघाड (ता. दिंडोरी जि. नाशिक) या गांवाजवळ गोदावरी नदीची उपनदी असलेल्या कोळवण नदीवर १९८० साली बांधण्यात आला आहे. धरणाला दोन कालवे असून उजव्या कालव्याची लांबी ४५ कि.मी. व डाव्या कालव्याची लांबी १५ कि.मी. आहे. प्रकल्पाचे लागवडीलायक क्षेत्र ९६४२ हेक्टर असून सिंचनक्षेत्र ६७५० हेक्टर इतके आहे. १९८०-९० सालापर्यंत ३० टक्के क्षेत्राला फक्त सिंचनाचा लाभ मिळत होता. १९९१ साली वाघाड कालव्याच्या पुच्छ भागात समाज परिवर्तन केंद्र ओझरच्या साहाय्याने ३ पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आल्या. पाणी वापर संस्थांच्या माध्यमातून पुच्छ भागाला पाणी मिळण्यातील अडचणी दूर झाल्या. त्यांना खात्रीशीर पाणी मिळू लागले. सिंचन क्षेत्रात वाढ झाली त्यासोबत पुच्छ भागातील गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटला. या तीन पाणी वापर संस्थांची यशस्विता पाहून वाघाड प्रकल्पावर टप्याटप्यात २००३ पर्यंत उजव्या कालव्यावर २० व डाव्या कालव्यावर ४ अशा एकूण २४ पाणी वापर संस्था स्थापन झाल्या आहेत.

या २४ संस्था त्यांच्या कार्यक्षेत्रामधील सिंचन व्यवस्थापन यशस्वीपणे सांभाळीत होत्या. तेवढ्यावर न थांबता या संस्था एकत्रित येऊन वाघाड प्रकल्पावर २००३ मध्ये प्रकल्पस्तरीय संस्थाही स्थापन करण्यात आली. या संस्थेने संपूर्ण प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन प्रकल्प आहे त्या स्थितीत ताब्यात घेण्याची तयारी दर्शवली. २००५ साली या संस्थेस प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन हस्तांतरण करण्यात आले, असा राज्यातील तसेच देशातील हा पहिलाच प्रकल्प असून, तो ताब्यात घेऊन वाघाडच्या शेतकऱ्यांनी इतिहास घडविला.

जागतिक बँक साहाय्यित महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पामध्ये पुढे वाघाड प्रकल्पाचा अंतर्भाव होऊन प्रकल्पातील कालवा व वितरण व्यवस्थेचे पुनर्स्थापनेचे काम हाती घेण्यात आले. या पुनर्स्थापना कामात सुध्दा वाघाडच्या शेतकऱ्यांनी/ पाणी वापर संस्थांनी एकूण ५० लक्ष रुपये दिले. वितरण प्रणालीच्या पुनर्स्थापनाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच कालव्याच्या पुनर्स्थापनाचे काम प्रगतिपथावर आहे.

प्रकल्पातील पाणी उपलब्धतेप्रमाणे वाघाड प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेमार्फत १५ ऑक्टोबरला हंगाम व रोटेशन यांचे नियोजन करण्यात येते . कालव्याच्या मुखाशी या संस्थेला पाणी मोजून देण्यात येऊन, मंजूर पाणी, हक्कानुसार रोटेशननिहाय पुरविण्यात येते. या संस्थेमार्फत शेतकऱ्यांना क्षेत्रावर किंवा तासावर पाणी पुरवठा करण्यात येतो. ही संस्था सहभागी सिंचन व्यवस्थापन चांगल्या पद्धतीने मागील ६-७ वर्षापासून राबवित आहे.

पाणी वापर संस्थामुळे शेतकऱ्यास पाण्याची हमी मिळाली. शेतकऱ्यांनी पाणी बचतीच्या तसेच ठिबक/तुषार सिंचनाच्या साहाय्याने केलेल्या पाण्याच्या बचतीमुळे आठमाही प्रकल्पातून बारमाही सिंचन करणे शक्य होत आहे. प्रकल्पाकरिता पूर्वी हजारो ग्राहक होते परंतु प्रकल्पस्तरीय संस्थेला हस्तांतरण केल्यानंतर फक्त एकाच ग्राहकाला पाणी पुरवठा करावा लागत आहे.

संस्थेला राज्यातील तसेच देश-विदेशातील शेतकरी व अधिकारी भेटी देऊन पाणी वापर संस्थाबद्दलची माहिती व प्रेरणा घेतात. आज राज्यामध्ये ज्या हजारो संस्था कार्यरत आहेत त्यांच्या जडणघडणीमध्ये वाघाड प्रकल्पावरील पाणी वापर संस्थांचा सहभाग आहे.

वाघाड प्रकल्प व वाघाड प्रकल्पस्तरीय पाणी वापर संस्थेला राज्यशासन तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुढील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. १) २००१-०२ चा राष्ट्रीय उत्पादकता परिषद नवी दिल्ली या संस्थेचा द्वितीय सर्वोत्तम उत्पादकता, २) सन २००६-०७ चा राष्ट्रीय उत्पादकता परिषद नवी दिल्ली या संस्थेचा द्वितीय सर्वोत्तम उत्पादकता पुरस्कार, ३)आयसीआयडी ह्या आंतरराष्ट्रीय संस्थेचा WAT SAVE ANNUAL AWARD – २००९ FOR INNOVATIVE WATER MANAGEMENT, ४) सीआयआय (Confedration of Indian Industry) हैद्राबाद या संस्थेचा Excellence in Water Management – २००९ चा पुरस्कार

५) पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था व्यवस्थापन पुरसकार-, ६) राजीव गांधी प्रगती अभियांनामध्ये पाणी वापर संस्था व तत्सम कार्याबाबत राज्य शासनाचा द्वितीय पुरस्कार

केवळ पाण्याचे व्यवस्थापनापर्यंत न थांबता शेतमालाची विक्री व प्रक्रिया करण्यासाठी या संस्थेने २००९ मध्ये वाघाड ॲग्रीकल्चरल प्रोड्युसर कंपनी (वॅप्को) स्थापन केली. त्यामार्फत द्राक्ष व भाजीपाला विक्री करण्यात येत आहे.

**– टीम लोकराज्य**

# द्राक्षः समृद्धीची नवी दिशा

**गोरख पगार**

**नाशिक जिल्ह्यातील हवामान द्राक्ष पिकास अनुकूल असल्याने या भागातील शेतकऱ्यांनी द्राक्षशेती मोठ्या प्रमाणावर करण्यास सुरुवात केली. विशेषतः गेल्या वीस वर्षांत द्राक्षशेतीमध्ये त्यांनी केलेली प्रगती डोळ्यात भरण्यासारखी आहे. एकरी उत्पादनात सातत्याने वाढ झाली आहे. द्राक्षाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून परदेशातील बाजारपेठेत पाठवण्यास येथील शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे. दरवर्षी निर्यात करण्यात येणाऱ्या द्राक्ष कंटेनरमध्ये होणारी वाढ ही त्याची पावती आहे.**





गेल्या दहा ते पंधरा वर्षात मोठ्या प्रमाणात आणि मोठ्या वेगाने खाण्याच्या द्राक्षपिकाच्या उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे मागणी व पुरवठा ह्यांचे संतुलन बिघडून द्राक्षाचे भाव प्रत्येक वर्षी खाली येत गेले. द्राक्ष पीक घेण्यासाठी लागणाऱ्या खर्चामध्ये मात्र वाढ होत गेली. त्यामुळे दर एकरी मिळणाऱ्या उत्पन्नात हळू हळू घट होत गेली.

याशिवाय द्राक्ष हे नाशवंत पीक आहे. त्याची विक्री ठराविक वेळेत होणे आवश्यक असते. अन्यथा नुकसान ठरलेले. या वस्तुस्थितीचा विचार केल्यावर काही शेतकऱ्यांनी द्राक्षावर प्रक्रिया करुन त्यापासून बेदाणा करण्यास सुरूवात केली. परंतु त्यालाही मर्यादा आल्या. बेदाणा उत्पादनातदेखील इतकी वाढ झाली की बराचसा बेदाणा शीतगृहात शिल्लक राहू लागला. त्यामुळे बेदाण्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नात घट झाली आहे. अशा बिकट परिस्थितीत काही प्रगतिशील शेतकऱ्यांनी द्राक्षापासून वाइन तयार करण्याकडे लक्ष केंद्रित केले. वाइनचा विचार करणाऱ्या या शेतकऱ्यांनी पाश्चिमात्य देशातील द्राक्षलागवडीचा अभ्यास केला आणि त्यांच्या असे लक्षात आले की, तेथील ९० टक्के द्राक्षलागवड ही वाइनच्या द्राक्षजातींची असून त्यापासून तेथील शेतकरी कित्येक शतकांपासून वाइन तयार करत आले आहेत. तसेच द्राक्षासारख्या नाशवंत शेतीमालावर प्रक्रिया करून ते दोन गोष्टी साध्य करु शकतात त्या म्हणजे. द्राक्षरसावर प्रक्रिया करून वाईनची निर्मिती केल्याने त्याच्या किंमतीत वाढ होते. त्यामुळे द्राक्ष शेती व त्याच्या जोडीला प्रक्रिया उद्योग यांची सांगड तेथील शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात कित्येक पटीने वाढ करीत आहे.

द्राक्षापासून तयार केलेली वाइन कित्येक वर्षे सुरक्षित राहू शकते व त्याची विक्री योग्य प्रकारे करण्यासाठी त्यांना आणखी कालावधी मिळू शकतो. वाइन नाशवंत माल नसल्याने आहे त्या भावाने विकण्यासाठी त्यांच्यावर दडपण येत नाही.

**शासनाचे धोरण आणि नाशिक**

महाराष्ट्र शासनाने १९ ऑक्टोबर २००१ रोजी वाइन उद्योगास चालना देण्यासाठी नवीन धोरण जाहीर केले आणि काही सवलती देऊ केल्या. त्याच्या अंमलबजावणीस सुरूवात होऊन गेल्या १२ वर्षाच्या कालावधीत नाशिक जिल्ह्यात एकूण ४० छोटेमोठे वाइन प्रकल्प उभे राहण्यास साहाय्य झाले आहे.

वाइन उद्योगामुळे नाशिकला आता जगाच्या नकाशावर स्थान मिळाले आहे. गेल्या १२ वर्षात केवळ वाइन उद्योगामुळे अनेक विदेशी नागरिक नाशिकला येऊन गेले. त्यात फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, इटली आणि कॅलिफोर्नियातील नागरिकांचा, तेथील वाइन उद्योजकांचा आणि भारतातील या देशांच्या राजदूतांचा समावेश होता.

नाशिकमध्ये एकदा येऊन गेलेल्या या मंडळींनी त्यांच्या देशात नाशिकच्या वाइन्सची मागणी नोंदविली. तसेच नाशिकच्या वाइन उद्योजकांना ते त्यांच्या देशात भेटीसाठी येण्याचे निमंत्रणही देत आहेत. भविष्यात नाशिक हे भारताला परकीय चलन मिळवून देणारे महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे. त्याचबरोबर नाशिकचे पर्यटनविषयक महत्त्व त्याला कारणीभूत आहे. भारतातील नागरिकांना नाशिकने आपल्याकडे आकर्षित करून घेतले आहे. आणि त्याचे मुख्य कारण आहे नाशिकचा वाइन उद्योग.नाशिकचे वाईन पर्यटन

जिल्ह्यातील संपूर्ण वाईन उद्योग आपणास नजरेखालून घालवावयाचा असेल तर किमान चार दिवस आपण नाशिकला यायला हवे म्हणजे वाइन पर्यटनाचा आनंद घेता येऊ शकेल. या तीन दिवसातील पहिल्या दिवशी आपण नाशिक परिसरातील वाइनरीजना भेट देऊन शकाल. त्यातील प्रमुख म्हणजे सामंत सोमा, यार्क वाइनरी, ओझर येथील रेनेसॅन्स वाईनरी आणि महामार्गालगतच्या वाइन प्रकल्पामध्ये माऊंटन व्ह्यू वाइनरी, व्हॅली डे वीन आणि टेरवा वाईन्स या प्रकल्पांना आपण भेट देऊ शकता.

❑❑

# केळीचा गोडवा

**राज्यात केळी उत्पादनात जळगाव जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो. राज्यातील एकूण केळी पिकाखालील क्षेत्राचा विचार करता सुमारे ६० टक्के क्षेत्र ( ४५ हजार हेक्टर ) जळगाव जिल्ह्यात आहे. जिल्हयातील रावेर, यावल, चोपडा, मुक्ताईनगर या तालुक्यात केळी होते. रावेर तालुका हा फक्त केळी उत्पादक तालुका आहे. या तालुक्यात २३ हजार हेक्टर क्षेत्र केळी पिकाखाली आहे. जळगाव जिल्हयातील कृषी उत्पन्नाची वार्षिक उलाढाल १८०० कोटींच्या घरात जाते. त्यापैकी ९५० कोटी रुपये वार्षिक उलाढाल केळीच्या व्यापारातून होते.**

केळीबागांसाठी मध्यम ते गाळाची काळी कसदार भरपूर सेंद्रीय पदार्थ असलेली व पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन लागते. तापी व गिरणा नदीच्या काठावरील भारी व कसदार जमीन ही केळी लागवडीस वरदान ठरली आहे. भरपूर सूर्यप्रकाश सापेक्ष आर्द्रता १६ ते ४० अंश सेंटीग्रेड तापमान केळीस लागते.

हे द्विवार्षिक पीक असून ७० टक्के लागवड मे च्या मध्यापासून जुलै महिन्यापर्यंत होते. या लागवडीस मृग बाग लागवड म्हणतात. या लागवडीस पावसाळी उष्ण व दमट हवामान उपलब्ध होत असल्याने वाढ चांगली होते. उत्पादन भरपूर येते. दुसरी लागवड ही सप्टेंबरअखेर ते ऑक्टोबर महिन्यात केली जाते. या लागवडीस कांदेबाग म्हणतात. यापासून मिळणारे उत्पादन मृग बागेपेक्षा कमी येते. परंतु बाजारभाव चांगले मिळतात. जिल्ह्यात ग्रँड नाइन श्रीमंती, बसराई, महालक्ष्मी या वाणांची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. पारंपरिक वाणांपासून पीक घेतले जात असताना टिश्यू कल्चर हा पर्याय समोर आला. सर्व पिकांची एकसारखी वाढ, रोपे निरोगी व रोगमुक्त अधिक उत्पादन देणाऱ्या मातृवृक्षापासून रोपे तयार केलेली असतात. पिकांचा कालावधी १२ ते १३ महिन्यांचा असल्याने मशागतीचा खर्चही कमी येतो याचा परिणाम शेतकरी टिश्यू कल्चरकडे मोठ्या प्रमाणावर वळले. गेल्या वर्षीपर्यंत जैन टिश्यूकल्चरची तब्बल चार कोटी रोपे विविध शेतकऱ्यांच्या शेतात रुजली. हे क्षेत्र सुमारे ३३ हजार ३३३ एकरपर्यंत होते.

केळी पिकाला पाणी मोठ्या प्रमाणावर लागते. त्यासाठी होणारा पाण्याचा भूगर्भातील उपसा ही शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरू पहात होती. पिकाला सावरण्यासाठी कमी पाण्यावर व्यवस्थापन करणे गरजेचे झाले होते. जैन इरिगेशनने ही गरज ओळखली. सूक्ष्मसिंचन हा त्यावर पर्याय ठरला. १९८५ पासून शेतकऱ्यांना सूक्ष्मसिंचन उपलब्ध झाले. आज जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर ठिबक सिंचन केळी पिकासाठी वापरले जात आहे. शासनाचे ५० टक्के अनुदान ठिबकसाठी उपलब्ध होत असल्याने जिल्ह्यात ९० टक्के केळी ही ठिबकवर घेतली जाते. हजार कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल केळींच्या माध्यमातून होते. उती संवर्धित केळी रोपांचे भारतातील सर्वात मोठे केंद्र जळगाव झाले आहे.

गेल्या काही वर्षापासून पासून जळगाव जिल्ह्यातील केळीवर करपा रोग पडत आहे गारपीट, वादळाच्या तडाख्यात सापडून हजारो एकर मधील केळीचे नुकसान होत आहे राज्य शासनाने २०११-१२ पासून हवामान आधारित फळपीक विमा योजना सुरू केली आहे. याचा मोठया प्रमाणावर फायदा केळी उत्पादकांना होत असून सध्या त्यामध्ये कमी तापमान व वेगाने वाहणारे वारे या पासून संरक्षण मिळते. तसेच गारपिटीसारख्या आपत्ती व शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर होणारे नुकसान या योजनेत समाविष्ट करता येईल यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरु आहेत. तसेच केळीवरील करपा रोग निर्मूलनासाठी सर्वंकष पॅकेज राबवण्यात येत असून कंद प्रक्रियेसह फवारणीसाठी आवश्यक असलेल्या विविध औषधांचा शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात येते.



केळीबाबत शेतकऱ्यांना तांत्रिक माहिती उपलब्ध व्हावी, मूलभूत संशोधन व्हावे म्हणून जळगावला केळी संशोधन केंद्र राज्य शासनाने स्थापन केले आहे. त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत आहे जळगाव जिल्ह्यातील केळी निर्यात व्हावीत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी सावदा येथे पणन मंडळातर्फे निर्यात सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रात रायपनिंग चेंबर कोल्ड स्टोरेजची सोय आहे. यात प्रतिदिन २५ मे. टन केळीचे रायपनिंग केले जाते.

याशिवाय खाजगी शेतकऱ्यांना शासनाकडून रायपनिंग सेंटर पिकवणी केंद्र उपलब्ध करून दिले जात आहे. दोन शेतकऱ्यांनी रायपनिंग चेंबर उभारली असून त्याचा लाभ अन्य केळी उत्पादक शेतकरी घेत आहेत. जळगाव जिल्ह्यातील केळी जिल्ह्याबाहेर मोठया प्रमाणावर रवाना होतात. विशेष रेल्वेनेदेखील दिल्लीला केळी रवाना होतात. उत्तर भारतात गेल्यावर दिल्लीला असो वा काश्मीरला जळगावची केळी तेथे विकायला आलेली पाहिल्यावर जळगावकर सुखावून जातो. हीच केळी सातासमुद्रापार जाणे गरजेचे आहे.

विजय पाठक

**संपर्क : ९३७३३६७३७४**

# सहकाराचा महामेरू



**यशवंतराव चव्हाण, धनंजयराव गाडगीळ, पंडित नेहरू यांच्या सोबत विठ्ठलराव विखे-पाटील.**

**महादेव कुलकर्णी**

सावकारशाहीतून मुक्त व्हायचे तर 'सहकार' हाच सर्वोत्तम पर्याय आहे, याची महती पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांना समजली होती. १९२०-२१ पासून या क्षेत्रात त्यांनी झपाटल्यागत काम केले. सर्वजण एकत्र आल्यावर सहकारी साखर कारखाना का चालवू शकणार नाही, हा प्रश्न त्यांना त्या काळात पडला होता. तो सत्यसृष्टीत आणण्यासाठी शेतकऱ्यात त्यांनी आत्मविश्वास व उत्साह निर्माण केला. शेतकऱ्यांच्या मालकीचा कारखाना उभा राहु शकतो, असा विश्वास डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनीही त्यांना दिला. गाडगीळ व वैकुंठभाई मेहता यांच्या सहकार्याने विखे पाटलांनी क्रांतीच केली. २६ नोव्हेंबर १९५० रोजी विखे पाटलांचे हे स्वप्न पूर्ण झाले. त्यांच्या सहकार क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीमुळे विठ्ठलराव विखे-पाटील हे सहकाराचे महामेरू ठरतात.

प्रारंभी लहान शेतकऱ्यांना पतीवर कर्ज देणारी पहिली सहकारी संस्थाही विठ्ठलरावांनी सुरू केली. सहकारी साखर कारखाना काढण्याचा निर्णय बागायतदार परिषदेत त्यांनी घेतला. या परिषदेत छोटा खातेदार शेतकरी हा भागीदार असावा, हा विचार त्यांनी आग्रहाने मांडला. कारखाना १९५० मध्ये सुरू झाला. त्याचे पहिले अध्यक्ष धनंजयराव गाडगीळ झाले. त्यांच्या राजीनाम्यानंतर १९६० मध्ये त्यांच्याकडे अध्यक्षपद आले. गावात काढलेल्या पहिल्या सहकारी संस्थेचे अध्यक्षपदही त्यांनी इतरांना दिले होते. त्यांच्याकडून चांगले काम करून घेण्याची काळजी ते घेत. विखे-पाटील यांच्या सहकारी क्षेत्रातील कारखान्यानंतर महाराष्ट्रात साखर कारखान्यांची लाट आली. कारखान्याच्या माध्यमातून कार्यक्षेत्रात शिक्षण संस्था काढल्या, नागरी बँका आल्या, रस्ते झाले, पाटपाण्याच्या सुविधा निर्माण करण्यात आल्या. अनेकांना रोजगार उपलब्ध झाला. ग्रामीण भागाचा कारखान्यानी कायापालटच झाला. कारखान्याबरोबर सूतगिरण्या, कागद प्रकल्प, अर्कशाळा, बँका, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था जोमाने उभ्या राहिल्या.

सहकारातील अतुलनीय कामगिरीमुळे केंद्र सरकारने त्यांची दखल घेतली. २६ जानेवारी १९६१ रोजी प्रजासत्ताकदिनाच्या दिवशी राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी भारतातील पहिल्या साखर कारखान्याचे जनक विठ्ठलराव विखे-पाटील यांना पद्मश्री किताब देऊन त्यांचा बहुमान केला.

पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १५ मे १९६१ रोजी प्रवरानगरला भेट दिली होती. पंडितजींनीही आपल्या भाषणात सांगितले होते, 'देशात जेथे जाईन तेथे आठवण ठेवून लोकांना सांगेन की, आपण प्रवरानगरला जरूर भेट द्या. तेथील कार्यपद्धती पाहा, सर्वसामान्य माणसे किती विशाल कार्य करू शकतात, याचे प्रत्यंतर पाहा. प्रवरानगरच्या उदाहरणावरून अनुभव घेऊन देशाचे चित्र बदलून टाका.'

सार्वजनिक जीवनात काम करताना ग्रामीण भागात कुठल्या गोष्टीची काळजी घ्यावी लागते, याचे मूर्तिमंत उदाहरणही विखे पाटील होते. अगदी उमेदीच्या काळापासून परान्न घ्यावयाचे नाही. हा त्यांचा शिरस्ता होता. ते कोणाच्याही घरी किंवा कोणत्याही समारंभास जावोत, तेथे आपल्या खिशातून फडक्यात बांधून आणलेली चटणीभाकरच ते खात. याचा प्रत्यय पंडितजींना प्रवरा भेटीत आला होता. कार्यक्रम संपल्यावर पंडितजींसह सर्वजण जेवावयास बसले असता पद्मश्रींनी आपल्या खिशातील फडक्यात गुंडाळलेली पीठलं-भाकर काढली ते खायला लागले. तेवढ्यात पंडितजींनी त्यांना विचारले हे काय आहे. त्यांनाही त्यांच्यातील एक घास खाण्याचा मोह आवरला नाही.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेस त्यांनी मदत केलीच. पण आपल्या प्रवरा परिसरातील शिक्षणाचा विस्तार केला. शिक्षणसंस्था काढल्या. परिसरात व जिल्ह्यात जी ग्रामीण समृद्धी आली, त्याचे श्रेय त्यांना देणे श्रेयस्करच आहे.

**उत्तर महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र**

नाशिक विभागात नाशिक, अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार असे पाच जिल्हे व ५४ तालुके येतात. या विभागाची लोकसंख्या एक कोटी, ८५ लाख ७१ हजार ३७ आहे. त्यात एक कोटी २९ लाख ३९ हजार ५४६ ग्रामीण आहे. या विभागात ३१ हजार ९१७ सहकारी संस्था आहेत. जिल्हानिहाय विचार करता नाशिक ११ हजार ८७७, अहमदनगर ९ हजार ४९२, जळगाव ५ हजार ५२२, धुळे तीन हजार १६९, नंदुरबार एक हजार ८५७ अशी संख्या आहे. या विभागात विविध कार्यकारी सोसायट्या तीन हजार ९७७ आहेत. नागरी बँका नव्वद आहेत. सहकारात ३१ साखर कारखाने आहेत. दुधसंस्था पाच हजार आहेत. नोकरदार पतपुरवठा संस्था एक हजार ३० आहेत. तर पतसंस्था दोन हजार ७७७ आहेत. सहकाराचे असे जाळे या पाचही जिल्ह्यात विणलेले आहे.

**संपर्क : ९४२०३४२८१३**

# मेडिकल टुरिझमला आरोग्यविज्ञान विद्यापीठाची साथ

देशामध्ये दर्जेदार डॉक्टर निर्माण व्हावेत व त्यांनी दर्जेदार वैद्यकीय सेवा पुरवावी यासाठी महाराष्ट्रात ३ जून १९९८ रोजी आरोग्यविज्ञान विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. वैद्यकीय शिक्षणाच्या विकासासाठी विद्यापीठातर्फे विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. यामध्ये शिक्षक विकास व प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे महाविद्यालयांतील शिक्षकसंख्या लक्षणीयरीत्या वाढून त्यांच्यात गुणवत्तापूर्ण सुधारणा होत आहे. परीक्षेसाठी बहुपर्यायी प्रश्नसंच निर्मिती, वर्ग व रुग्णालयांमध्ये अनिवार्य उपस्थिती; अभ्यासक्रमात आवश्यकतेनुसार निरंतर सुधारणा, यामुळे विद्यार्थी संख्येबरोबरच त्यांच्या गुणवत्तेत सुधारणा झालेली आहे. या विद्यापीठाची मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर येथे विभागीय केंद्रे आहेत.




विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळी १९३ महाविद्यालये संलग्नित होती. आजपावेतो ३११ महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहेत. महाराष्ट्र आणि नाशिकचे नाव जागतिक मेडिकल टुरिझमच्या नकाशावर आणण्यामध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची भूमिका आणि कार्य म्हणून निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणारे आहे.

**स्वप्नील तोरणे**

संशोधन कार्यासाठी विद्यापीठाकडून विविध योजना राबवल्या जात आहेत. पीएच.डी. ही सन्माननीय पदवी प्रदान करण्यास सुरुवात केली आहे. एज्युकेशन फॉर हेल्थ या नावाचे जर्नल सुरु करण्याचे ठरले आहे. संपूर्ण भारतात आगळेवेगळा ठरणारा आंतरविद्याशाखा संशोधन विभाग विद्यापीठात सुरू करण्यात आला आहे. ॲलोपॅथी, दंत, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी व तत्सम विद्याशाखा यांचा समन्वय साधून संशोधनाला चालना देणारे विभाग येथे आहेत.

विद्यापीठातर्फे वैद्यकीय व्यवसायाच्या व्यवस्थापनासाठी एम.बी.ए. (हेल्थ केअर ॲडमिनिस्ट्रेशन) पदव्युत्तर अभ्यासक्रम, विविध फेलोशीप व प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सर्टिफिकेट कोर्स इन डिझास्टर मेडिसिन आणि फेलोशिप कोर्स इन इमर्जन्सी मेडिसिन ॲण्ड ट्रॉमाकेअर कोर्सेस लवकरच सुरू होणार आहेत. आयुर्वेद संशोधनासाठी आयुष विभागाची स्थापना करण्यात आली आहे. विविध रुग्णांवर उपचार करून चिकित्सा पद्धतीची प्रमाणताही सिद्ध केली जाणार असून विद्यापीठाच्या परिसरात दुर्मीळ वनौषधींचे उद्यान साकारले जात आहे. लवकरच क्लिनिकल इंजिनीअरिंग हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

नंदुरबार येथे आदिवासी आरोग्य व विकास केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. जिल्हा प्रशासन, आरोग्यसेवा व विद्यापीठ यांच्या सहकार्याने आरोग्य शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे. विद्यापीठाने कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन या विषयावर लक्ष केंद्रित केले आहे. विद्यापीठातर्फे आपत्ती व्यवस्थापनासाठी पोलीस, होमगार्ड, अग्निशमन दल यांच्यासाठी प्रात्यक्षिकांचे सादरीकरण तसेच नाशिकमधील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आणि विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

## डॉक्टर-रुग्ण सुसंवाद

रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील संवादाच्या अभावामुळे काही समस्या निर्माण होतात. हे लक्षात घेऊन विद्यापीठाने भारतात प्रथमच डॉक्टर-रुग्ण सुसंवाद व्हावा यासाठी कम्युनिकेशन स्किल्स अभ्यासक्रम सुरू केला आहे. विद्यापीठाने अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठाशी शैक्षणिक सहकार्य करार केला आहे.

महापालिकांमधील रुग्णालयांमध्ये असलेल्या शिक्षणबाह्य खाटांचा वापर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना व्हावा, असे विद्यापीठाने ठरवले आहे. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसोबत करार करण्यात आला आहे. तसेच ऑनलाइन क्रिटीकल केअर नर्सिंग कोर्स, बेसिक एमर्जन्सी इनोव्हेशन २०१३ या नवसंशोधन अधिवेशनाचे पुणे येथे आयोजन करण्यात येणार आहे.

## वैद्यकीय इतिहास संग्रहालय

संपूर्ण आशिया खंडात आगळेवेगळे ठरलेले असे आरोग्य विद्याशाखांचे वस्तुसंग्रहालय (Museum of History of Medicine) विद्यापीठाच्या मुख्यालयातील आवारामध्ये आकाराला आले आहे. आरोग्यशाखांच्या पाचही विद्याशाखांच्या उगमापासून आजवरचा सर्व प्रवास या वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून दर्शविला आहे. वैद्यकशास्त्राच्या विविध शाखांच्या अभ्यासासाठी व भविष्यातील संशोधनाची दिशा ठरविण्यासाठी भूतकाळाचा अभ्यास व संदर्भ विशेष उपयुक्त ठरतात. नाशिकमधील हे आगळेवेगळे वस्तुसंग्रहालय केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर देशभरातील जिज्ञासूंना ज्ञानाचा आगळावेगळा खजिनाच उघडून देणारे आहे.

**संपर्क : ९८८१७३४८३८**

## उत्तर महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास

# उज्ज्वल भविष्याची सुवर्णसंधी

**उत्तर महाराष्ट्राला शिक्षणाची मोठी परंपरा आहे. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन या भागातील अनेक समाजसेवकांनी विविध भागांमध्ये निरनिराळ्या विद्याशाखांमधील शिक्षण देणाऱ्या संस्था काढून या भागात शैक्षणिक क्रांती घडवून आणली. या भागात असणारी विद्यापीठे, तंत्रमहाविद्यालये, व्यावसायिक महाविद्यालये यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.**

**अशोक सोनवणे**

समाजजागृतीच्या कामासाठी महात्मा फुले यांनी दि. २४ सप्टेंबर १८२७ रोजी 'सत्यशोधक समाजाची ' स्थापना केली. म.फुले यांच्यानंतर शिक्षणप्रसाराचे व सामाजिक सुधारणांचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी चालू ठेवले. सावित्रीबाईंच्या नंतर राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन केले. राजर्षी शाहू महाराजांनीही बहुजन समाजाच्या शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्याचप्रमाणे त्यांनी त्यांच्या राज्याबाहेर जेथे शिक्षणप्रसाराचे काम शक्य होते आणि आवश्यकही होते तेथे सर्वतोपरी मदत केली. डी.आर.भोसले आणि कीर्तिवान निंबाळकर या दोन सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना नाशिक विभागात सत्यशोधक समाजाच्या विचारांचा आणि कार्याचा प्रसार करण्यासाठी त्यांनी पाठविले. डी. आर. भोसले यांना पिंपळगाव आणि दिडोंरी भागात पाठविण्यात आले होते. डी.आर.भोसले यांच्या सान्निध्यात गणपतदादा मोरे हे आले. त्यांनी सत्यशोधक समाजाचा विचार स्वीकारला. सत्यशोधक समाजाच्या विचारप्रचारासाठी सत्यशोधक जलसा उभा केला व संपूर्ण जिल्हाभर त्यांनी जलशाच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसार केला. त्यातूनच मराठा शिक्षण परिषदेचे काम सुरु झाले. मराठा शिक्षण परिषदेचे १९१२ साली धुळे येथे अधिवेशन भरले. या




अधिवेशनासाठी गणपतदादा मोरे आणि रावसाहेब थोरात हे उपस्थित होते. १९१३ साली हे अधिवेशन नाशिक येथे भरविण्यात आले. तेव्हाच नाशिक शहरात ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी वसतिगृह स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशाप्रकारे मराठा विद्याप्रसारक समाजाची स्थापना झाली. या संस्थेला राजर्षी शाहू महाराज, धारचे उदाजीराव महाराज पवार, ग्वाल्हेरचे माधवराव शिंदे महाराज, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज व सुरगाण्याचे धैर्यशील राव महाराज पवार यांनी मोठी मदत केली.

### गोखले एज्युकेशन सोसायटी

टी.ए.कुलकर्णी यांनी गोखले एज्युकेशन संस्था स्थापन करून १९२४ साली नाशिक शहरात एच. पी. टी. आर. वाय. के. महाविद्यालय स्थापन केले. तत्पूर्वी शहरात एक माध्यमिक विद्यालय होते. संपूर्ण जिल्ह्यात आणि उत्तर महाराष्ट्रात शिक्षणाची फारशी सुविधा उपलब्ध नव्हती . धुळे जिल्हयात पा.रो.घोगरे, झुलाल भिलाजी पाटील आदी समाजसुधारकांनी शिक्षण प्रसारासाठी प्रयत्न केले. जळगाव जिल्ह्यात मराठा विद्याप्रसारक समाजाची स्थापन करण्यात आली. धुळे आणि अहमदनगर जिल्ह्यातही मराठा विद्याप्रसारक समाजाची स्थापन करण्यात आली. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातही मराठा विद्याप्रसारक समाजाची स्थापना करण्यात आली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ साली रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. रयत शिक्षण संस्था आज राज्यातील व कर्नाटकातील एकूण ११ जिल्ह्यांमध्ये शिक्षणप्रसाराचे काम करते. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक आणि अहमदनगर या दोन जिल्ह्यात आणि विशेषत: आदिवासी भागात ही संस्था काम करते. अहमदनगर जिल्ह्यात या संस्थेने अधिक कार्य केले आहे. जळगाव मराठा विद्याप्रसारक समाजाची स्थापना १९१७ साली वामनराव पाटील, भास्करराव पाटील व गंभीरराव चव्हाण यांनी केली. जिल्ह्यात आज जवळपास या संस्थेच्या ५० शाखा असून सुमारे ५०,००० विद्यार्थी या संस्थेत शिक्षण घेत आहेत.


बहुजन समाजाच्या शिक्षणप्रसारासाठी साधारणपणे १९६० सालापूर्वी ज्या शिक्षणसंस्था स्थापन झाल्या, त्या प्रामुख्याने बहुजन समाजाच्या शिक्षणप्रसारासाठीच. वाहतुकीची साधने नव्हती. तसेच या समाजाची

आर्थिक परिस्थिती हलाखीची होती, त्यामुळे शहरात जाऊन शिकण्यासारखी परिस्थिती नव्हती. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता. ग्रामीण भागात शिक्षणाच्या शाखा सुरू करण्यासाठी त्यावेळच्या समाजसुधारकांनी अतोनात कष्ट घेतले.

**रयत शिक्षण संस्था**

प्रत्येक जिल्ह्यात मराठा विद्याप्रसारक समाज संस्था स्थापन करण्यात आल्या तरी रयत शिक्षण संस्थेनेही फार मोठे कार्य केले आहे. नाशिक व अहमदनगर जिल्हयात रयत शिक्षणसंस्थेच्या १२१ माध्यमिक, ०७ महाविद्यालये, ७ प्राथमिक शाळा व ३ आश्रमशाळा अशा एकूण १४१ शाखा आहेत. या सर्व शाखांकडून सुमारे हजारो विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत. जवळपास ५,००० एवढे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्या संस्थेत काम करीत आहेत.

**सानेगुरुजी**



स्वातंत्र्यपूर्व काळात उत्तर महाराष्ट्रात विशेषत: जळगाव जिल्ह्यात शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम प्रामुख्याने सानेगुरुजींनी केले. अमळनेर येथे त्यांनी स्वत: शिक्षक म्हणून काम केले. शिक्षण विषयक जनजागृती त्यांनी केलीच शिवाय स्वांतत्र्यचळवळीत त्यांनी सहभाग घेतला. फैजपूर येथे १९३६ साली काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन संपन्न झाले. तेथे सानेगुरुजी, गाडगे महाराज, धनाजी नाना चौधरी आदी समाजसुधारकांनी जनमानसात जनजागृती करण्यासाठी शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा घटक असल्याची जाणीव सर्वांना करून दिली व त्यासाठी कृतीही केली. धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागात शिक्षणविषयक जनजागृती केली. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी मालेगाव महात्मा गांधी विद्यामंदिर या शिक्षणसंस्थेची स्थापना केली. बोबा गुरुजींनी त्यांना मोठी बीडकर यांनी आदिवासींच्या शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शिक्षणप्रसाराचे काम पंडित धर्मा पाटील यांनी विधायक कार्य समिती या संस्थेची स्थापना करून सुरू केले.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण आणि तत्कालीन शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांनी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी फी माफीची सवलत जाहीर केली अन् मग ग्रामीण भागातील शिक्षणाचे प्रमाण वाढले. मराठा विद्याप्रसारक समाज नाशिक या संस्थेत आज जवळपास २ लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. सुमारे ८००० सेवक काम करतात. मराठा विद्याप्रसारक समाज या संस्थेत कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर गणपतदादा मोरे, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर काकासाहेब वाघ, कर्मवीर आण्णासाहेब मुरकुटे आदी समाजसुधारकांनी मोठे कार्य केले. त्यानंतर आबासाहेब सोनवणे, वामनराव पाटील, दगा अजबा पाटील, विठोबा पाटील कानळदकर, विठ्ठलराव हांडे, डॉ. बाबुराव ठाकरे, डॉ. वसंतराव पवार, दुलाजीनाना पाटील, मालोजीराव मोगल, श्रीमती नीलिमाताई पवार, बाळासाहेब वाघ आदी समाजधुरीणांनी या संस्थेचे नेतृत्व करुन संस्थेमार्फत नाशिक जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात शिक्षण पोहचविले.

**व्यावसायिक शिक्षण**

विनाअनुदान तत्त्वावर व्यावसायिक शिक्षण सुरू करण्याचा निर्णय घेतल्यानंतरही अनेक शिक्षण संस्था स्थापन झाल्या. तांत्रिक, व्यावसायिक, वैद्यकीय व व्यवस्थापनविषयक अनेक महाविद्यालये आणि तांत्रिक संस्था सुरू झाल्या. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे. तांत्रिक शिक्षण घेतलेले अनेक तरुण देशविदेशात वेगवेगळया पदांवर काम करीत आहेत. नाशिक येथील के. टी. एच. एम. महाविद्यालयात संगणक शिक्षणाची सोय १९९० दरम्यान सुरू झाली. आज संगणक क्षेत्रातील अनेक पदवीधर जगभर वेगवेगळ्या पदांवर काम करीत आहेत.

**शैक्षणिक परिवर्तन**

ज्या विविध शिक्षण संस्थांनी आणि समाजधुरीणांनी शिक्षणप्रसारासाठी गेले सुमारे शतकभर जी प्रचंड मेहनत घेतली, त्यामुळे ग्रामीण भागात मोठे बदल झाले. ग्रामीण भागाच्या सामाजिक शैक्षणिक व आर्थिक परिवर्तनाचे मोठे काम त्यातून झालेले दिसून येते.



मधुकरराव चौधरी

मधुकरराव चौधरींचे शिक्षणक्षेत्रातील योगदान हे महत्त्वपूर्ण आहे. त्यांची शिक्षणमंत्री म्हणून कारकीर्द अविस्मरणीय स्वरूपाची आहे. बदलत्या काळानुसार, बाळासाहेब विखे पाटील. कै. भाऊसाहेब थोरात, ना. मधुकरराव पिचड, शंकरराव कोल्हे, माधवराव बोरस्ते, यशवंतराव गडाख, डॉ. पा.रा. घोगरे, व्यंकट आण्णा रणधीर, पी.के.आण्णा पाटील, ना.छगनराव भुजबळ आदी मान्यवरांनी आपापल्या परिसरात वैद्यकीय, तांत्रिक, व्यवस्थापन, अभियांत्रिकी, बायोटेक्नोलॉजी, नर्सिंग, फिजीओथेरपी किंवा ग्रामीण विकासाशी निगडित विविध अभ्यासक्रम त्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये सुरू केले आहेत. व्यावसायिक शिक्षणापेक्षाही प्राथमिक-माध्यमिक शिक्षणावर भर देण्याचे आणि त्याची गुणवत्ता वृद्धिंगत करण्याचे रयत शिक्षण संस्थेचे धोरण आजही अनुसरलेले दिसत आहे. नगर आणि नाशिक जिल्ह्यात रयत शिक्षण संस्थेच्या प्रसारासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समवेत बापूसाहेब भापकर, हिराबाई भापकर, दत्ता देशमुख, पी.बी.कडू पाटील, शंकरराव काळे, डॉ. अण्णासाहेब शिंदे, डॉ. रावसाहेब शिंदे यांचे कार्य महत्त्वाचे आहे. संगमनेर येथे प्राचार्य मधुसूदन कौंडिण्य यांचा शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा प्रयोग हा फार महत्त्वाचा आहे. सामाजिक उत्तरदायित्व जोपासणाऱ्या अप्पासाहेब हजारे आणि पोपट पवार यांनी त्यांच्या गावात सुरू केलेले शिक्षणाचे प्रयोग सर्व समाजाला दिशा देणारे आहेत. विशेषत: अण्णा हजारे यांची राळेगणमधील नापासांची शाळा तर अभिनवच म्हणायला हवी.

(पान ४६ वर)

# सुव्यवस्थेचा संस्कार

मोहिनी राणे-देसले

समाजातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी पोलिसांकडे असते. कर्तव्यदक्ष पोलीस घडविण्याचे मोलाचे कार्य करीत आहे, नाशिकमधील महाराष्ट्र पोलीस अकादमी (एमपीए) जिथे शिस्तीसोबत गुणवत्ताही सांभाळण्यासाठी आग्रह धरला जातो.

एमपीएच्या कार्याला १०७ वर्षांची परंपरा आहे. यातून पोलीस दलाची छाती अभिमानाने भरून यावी, अशी कामगिरी आतापर्यंत घडली आहे. ब्रिटिश काळात १९०६ मध्ये सुरू झालेल्या या अकादमीची धुरा सनदी अधिकाऱ्यांकडे राहिलेली आहे. कोटकोर शिस्तपालन, गुणवत्तेचा आग्रह आणि दर्जेदार शिक्षण या आधारावर या संस्थेचा नावलौकिक अधिकच उंचावला आहे. ब्रिटिशांनी १९०६ मध्ये पुण्यात स्थापन केलेली ही संस्था दोनच वर्षात म्हणजे १९०८ मध्ये नाशिकमधील त्र्यंबक मार्गावर हलविण्यात आली. प्रारंभी पोलीस प्रशिक्षण शाळा (पीटीएस) असे या संस्थेचे नांव होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६१ मध्ये या संस्थेचे पोलीस प्रशिक्षण केंद्र (पीटीसी) असे नामकरण करण्यात आले. नंतर १९९० मध्ये महाराष्ट्र पोलीस अकादमी अशा नावाने या संस्थेची नवी ओळख निर्माण करण्यात आली. काळानुरूप नावात आणि गुणवत्तेत बदल होत गेलेल्या या संस्थेने आपल्या कामाचा दर्जा अधिकाधिक उंचावत नेला आहे. यामुळेच या संस्थेला ''आयएसओ'' ९००१ :२००० या आंतरराष्ट्रीय गुणवत्तेच्या प्रमाणपत्राने सन्मानित करण्यात आले आहे.''एमपीए'' मध्ये स्थापनेपासूनच इंडियन पोलीस सर्व्हिसच्या अधिकाऱ्यांसह (आयपीएस) पोलीस उपअधीक्षक (डीवायएसपी) आणि पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) या पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाते. सप्टेंबर, १९४८ मध्ये राजस्थानमधील माउंट अबू येथे केंद्रीय पोलीस प्रशिक्षण महाविद्यालय (आताचे राष्ट्रीय पोलीस अकादमी) स्थापन झाल्यानंतर यातील महत्त्वाचे पदाधिकारी पीटीसी मध्ये कार्यरत झाले. त्यामुळे सुरुवातीपासूनच या संस्थेने एक गुणात्मक उंची गाठली आहे. आताही आयपीएस दर्जाचा अधिकारी एमपीएचा प्रमुख असतो. या संस्थेमध्ये केंद्र आणि राज्याचे अबकारी विभाग, राज्य वन विभाग, नौदल, वीज महावितरण कंपनी, मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या बेस्ट तसेच अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनाही गरजेनुसार प्रशिक्षण दिले जाते. या संस्थेत १९८० मध्ये अखिल भारतीय पोलीस संमेलन आणि १९९३ मध्ये पोलीस सायन्स काँग्रेस या देशस्तरीय परिषदा झालेल्या आहेत.

### इतर राज्यांसाठी मार्गदर्शक

केवळ महाराष्ट्रातच कर्तव्यदक्ष पोलीस घडविण्याचे काम या संस्थेने केलेले नाही, तर महाराष्ट्र आणि गुजरात ही राज्ये एकत्र असतांना गुजरातमधीलही अनेक अधिकाऱ्यांनी कायदा व सुव्यवस्था कशी राखायची याचे धडे एमपीएमध्ये घेतले आहेत. त्याच बरोबर दादरा नगर हवेली, पुद्दुचेरी (पाँडेचेरी) आणि गोवा पोलिसांनाही येथे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे. गोवा सरकारच्या विनंतीनंतर आताही एमपीएमधून काही पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

### ऐतिहासिक वारसा स्थळ

नाशिक शहरातील त्र्यंबक मार्गावर झाडांची गर्दी असलेल्या २६७ एकर क्षेत्रावर एमपीए वसले आहे. तीन मुख्य इमारतींबरोबर असलेल्या संस्थेच्या तीन इमारतींची रचना जुन्या युरोपियन वास्तुकलेत करण्यात आलेली आहे. यातूनच संस्थेची भव्यता उठून दिसते. या इमारतींची रचना स्थानिक ऐतिहासिक वारसा असलेल्या स्थळांमध्ये करण्यात आली आहे.

❑ ❑



# बोलीभाषेचं माधुर्य

**सुभाष अहिरे**

खानदेशाला खानदेश नाव का पडले? ह्या प्रश्नावर इतिहासकारांची आणि अभ्यासकांची भिन्न मते आहेत. या खानदेशात अभिर-अहिर नावाचा एक बलदंड जनसमूह राहत होता असा एक मतप्रवाह आहे. कान्हाचा कान्ह देश म्हणजे खानदेश, खांड्ववनाचा भूभाग म्हणजे खानदेश किंवा थाळनेरच्या राजाला खान ही पदवी होती म्हणून खानदेश असा भिन्न मतप्रवाह असला तरी खानदेशात अमिर-अहिर नावाचा जनसमूह राहत होता, ह्या जनसमूहाला स्वतंत्र संस्कृती होती ह्या जनसमूहाची प्रमुख भाषा आहिराणी भाषा होती. यावर सर्व इतिहासकारांचे आणि अभ्यासकांचे एकमत दिसून येते.

खानदेशातील आहिराणी भाषा ही कोणीही कोणावर लादलेली भाषा नाही. ही खानदेशातील संपूर्ण समाजाने पुरातन काळापासून स्वीकारलेली भाषा आहे. खानदेशातील संपूर्ण जनसमूह कुटुंबात स्वत:ची स्वतंत्र मायबोली कुटुंबाची बोली म्हणून बोलतात. बाहेरच्या व्यवहारासाठी मात्र आहिराणी भाषा बोलतात. इंग्रजी भाषेच्या आक्रमणामुळे मायभाषा नष्ट होतील. यावर खानदेशवासीयांचा अजिबात विश्वास नाही. कारण जोपर्यंत खानदेशातील कुटुंबव्यवस्था भक्कम आहे, गावसंस्कृती सक्षम आहे. तोपर्यंत आहिराणी भाषा मरत नाही, मरणारही नाही !

खानदेशात आदिम काळापासून प्रत्येक जातसमूहाची स्वतंत्र समूहबोली आहे. ही बोली परंपरेने कुटुंबात आली आहे. म्हणून काही बोलींना जातबोली ह्या नावाने ओळखतात. त्यात बेलदारी बोली, वडारबोली, भिल्लबोली, भावसारीबोली, गुजरबोली, परधीबोली, परदेशीबोली, कैकाडीबोली, मांगगारोडी बोली, लाडशीबोली अशा अनेक प्रकारच्या जातबोल्या आजही खानदेशात बोलल्या जातात. प्रत्येक जातसमूहाच्या उपशाखा आहेत. त्या उपशाखा घरात कुटुंबाची बोली बोलतात .बाहेर जातबोली बोलतात. जातबोली आणि शाखाबोली यात फारशी तफावत नसते. फक्त उच्चारण पद्धती, लकब आणि हेल यात फरक जाणवतो.

**भिल्ली बोली**

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी लोकांची लोकभाषा, लोकसाहित्य , राहणीमाण ,केशभूषा , वेषभूषा , जीवन जगण्याची परंपरा यांची इतिहास काळापासून स्वतंत्र परंपरा आहे. आदिवासी ही एक जात नसून त्या भूभागावरील अनेक जाती - उपजातींच्या मोठ्या समूहाला आदिवासी म्हणून ओळखतात. डॉ. पुष्पा गावित यांच्या शोधनिबंधात भिल्ली बोली भाषेच्या एकूण पस्तीस बोल्यांची नोंद आहे. भिल्ली ही एक बोली विविध जातिसमूहाचे लोक एकत्र बोलतात. परंतु विविध शाखा आपल्या स्वत:च्या शाखा बोली बोलतात. त्यात कोरकू, बागलाणी, बर्डीभिल , मावची, कोकणी, भिलाली, भिलोडी, चोघरी , धामका , धोंडीया ,दुबळी , डुंगरी , गायती , राठवी, पावरी , तडवी , वारली, ठाकरी, अशा अनेक जातबोल्या आहेत. म्हणून मायबोली, शाखाबोली , समाजबोली, लोकबोली असा हा बोलींचा गुंता आहे. जो समाजमान्य आहे.

**स्वतंत्र मौखिक लोकवाङ्‌मय**

या बोलींना लिपी नाही म्हणून लेखनव्यवस्था नाही. परंतु या बोली देशाचा सांस्कृतिक इतिहास आहे. कारण प्रत्येक बोलीने स्वत:चं स्वतंत्र मौखिक लोकवाङ्‌मय निर्माण केलं आहे. या बोली बोलताना, ऐकताना मधाळ वाटतात कारण त्यांना लय आहे. मधुरता आहे.

खाजगीकरण , जागतिकीकरण , उदारीकरणाचा वेग गाव खेड्यांपर्यंत पोहचला आहे. ज्ञान , विज्ञान , तंत्रज्ञान खानदेशवासीयांनी स्वीकारलेलं आहे. गाव-खेड्यांत इंग्रजी शाळेचं पीक आलेलं आहे म्हणून गावची भाषा गावची संस्कृती धोक्यात येईल असं वाटणं स्वाभाविक आहे. कारण इंग्रजी भाषेसोबत मॉल संस्कृतीही गावात आली. गावाकडची आहिराणी भाषा बोलतांना त्या भाषेत मोबाईल , फ्रिज, कुलर, टी.व्ही, पाऊच , क्रॉइन, रिचार्ज अशा इंग्रजी शब्दांची भेसळ होते आणि मूळ आहिराणी भाषा संवादाची मिश्रित भाषा तयार होते. कोणतीही भाषा पूर्ण नसते. संवादाच्या भाषेला इतर भाषेचे शब्द घ्यावेच लागतात म्हणून सध्यातरी आहिराणीला भय नाही . कारण दीडशे वर्षे ब्रिटिश भारतात राहीले. इंग्रजी भाषेत राज्य केलं तरीसुद्धा ह्या गावच्या भाषा व बोली नष्ट करू शकले नाहीत. आतातर आमच्या गावचा माणूस सत्तास्थानावर आहे . म्हणून गावभाषा बोलणाऱ्याला मान आहे. मायभाषा बोलणाऱ्याच्या वाटयाला अपमान आहे. काही भाषाद्वेषी मायभाषा बोलणाऱ्याला गावठी, गावंढळ म्हणून अपमानित करतात. परंतु कोणतीही गावभाषा असंस्कृत नसते ती भाषा नाकारणारा असंस्कृत असतो. मोबाईल हे नव्या तंत्रज्ञानाचे यंत्र आहे तरी आम्ही त्या यंत्रावर आहिराणीतून संभाषण करू शकतो. मायभाषा सातासमुद्रापलीकडे नेऊ शकतो. इ-बुक सेवा माध्यमातून आपापल्या भाषा बोलू शकतील . मागणी तसा पुरवठा हे कंपन्यांचे धोरण आहे. भविष्यात आहिराणी भाषेचं स्वॉफ्टवेअर निर्माण होईल अशी खात्री आहे.




बालकांच्या प्राथमिक शिक्षणाकरिता त्या भूभागाच्या, परिसराच्या मायभाषेची जोड दिली तर बालकांना शाळेची ओढ लागेल. आहिराणी भाषेची चार साहित्य संमेलने झाली आहेत. पाचवे होणार आहे. आहिराणी भाषेत जसा लोकवाङ्‌मयाचा विपुल साठा आहे, तसा नववाङ्‌मय निर्मितीचाही साठा आहे. म्हणून मायभाषा मायबोलीचे जतन ही काळाची मुख्य गरज आहे.

**संपर्क : ८८०६११३७१३**

❒❒

# खानदेशी पाहुणचार

**उत्तर महाराष्ट्राचा मोठा भूभाग हा खानदेश म्हणून परिचित आहे. या सर्वच भागाची खाद्यसंस्कृती विलक्षण चवदार आहे. उत्तर महाराष्ट्राच्या शेजारी असणाऱ्या गुजरात आणि मध्यप्रदेश या दोन प्रांतांच्या खाद्य संस्कृतीचा प्रभाव येथील खाद्यसंस्कृतीवर आहे. गेल्या अनेक पिढ्यांपासून येथील मुख्य व्यवसाय शेती असल्याने येथील खाद्यसंस्कृतीला वेगळे परिमाण लाभले आहे. मुख्यत: बाजरी, ज्वारी वा दादर या धान्यपिकांसोबतच गहू व काही भागात तांदूळही पिकविला जात असल्याने या पिकांचा प्रभाव येथील अन्नपदार्थांवर दिसून येतो.**



खानदेशी खाद्यसंस्कृतीचे वैशिष्ट्य सांगावयाचे झाल्यास येथील ताटात मुंबई, पुणे यासांरख्या शहरांप्रमाणे अन्नपदार्थांचे विभाजन नसते. ज्याला चौरस आहार असे काही म्हणतात तो इकडे नाही. भाजी आणि भाकरी इतके साधे येथील जेवणाचे स्वरुप असते. आणि ते सुद्धा पातळ रस्सेदार भाजीत भाकरी चुरुन (ज्याला खानदेशात 'काला मोडणे' असं म्हणतात) पदार्थ एकजीव करून खाल्ले जातात. काला मोडून खाल्लं की अंगी लागतं, अशा शिकवणीचं बाळकडू दिलं जातं. म्हणूनच पूर्वीच्या संयुक्त कुटुंबात (खानदेशी भाषेत खटलं) पोरंसोरं जेवायला बसली की एका आजीबाईची खास नेमणूक पोरांना भाकरीचा काला करून देण्यासाठी असायची. हल्लीच्या काळात जेवणाचे स्वरूप काहीसे शहरी होत असले तरी अस्सल खानदेशी माणूस संधी मिळताच काला मोडतोच. सणवार किंवा कुणी पाहुणचाराला आला की मगच भात, वरण (ज्याला इतर महाराष्ट्रात आमटी म्हणतात) त्याचा समावेश जेवणात होत असे. खापराची पुरणपोळी ज्याला खापरमांडे असंही म्हणतात, हा इथल्या खाद्य संस्कृतीचा मानबिंदू. सणावाराला किंवा उन्हाळ्यात आंब्याच्या मोसमात खापराची पुरणपोळी हेच सणापेक्षा अधिक आकर्षण असते. खापरमांडे, आंब्याचा रस किंवा खीर, जोडीला कटाची आमटी, कुरडया, पापड आणि एखादी भाजी. खीर किंवा आमरसासोबत खापरमांडे खातांना मध्येच सोबतच्या आमटीत कुरडई कुस्करून भुरका मारला की ब्रह्मानंदी टाळी लागणे काय असते त्याची अनुभूती होते. बैलपोळा, अक्षय तृतीया (आखाजी), दसरा, दिवाळी पाडवा या सणांसोबतच कानुबाई मातेच्या उत्सवात आवर्जून हाच बेत ठरलेला असतो.

मिलिंद दुसाने



### झणझणीत आमट्या

काळा मसाला आणि त्याच्या झणझणीत आमट्या (उत्तर महाराष्ट्रात रस्स्याला आमटी म्हणतात) हे उत्तर महाराष्ट्राचे वैशिष्ट्य. याच आमटीत पाटोड्या, भज्या, डबूक वडे, वांगी ते अगदी मटणापर्यंत सर्व पदार्थ चवदार होऊन आपल्या ताटात येतात. नाशिक, अहमदनगर जिल्ह्यात या पाहुणचाराला काळ्या मसाल्याच्या भाज्या हमखास मिळणार. नाका-डोळ्यातून पाणी आल्यावरच या जेवणाला खरी लज्जत येते. धुळे जिल्ह्यात महामार्गावर वसलेल्या सोनगीर गावात थांबणाऱ्या ट्रक चालकांच्या जेवणाच्या गरजेतून शेवभाजी हा पदार्थ तयार झाला. गरम तर्रीदार शेवभाजी आणि बाजरीची भाकरी पोटभर खाऊन ट्रकचालक पुढच्या प्रवासाला रवाना होत. आज हीच शेवभाजी अनेक हॉटेल्सच्या मेनूकार्डवर आहे. मुंबई-आग्रा महामार्गावर नाशिकजवळ वडाळी भोई या गावची भजी प्रसिद्ध झाली आहे. ये-जा करणारे प्रवासी तेथे थांबून भजी

आणि शेंगदाण्याच्या विशिष्ट चटणीचा आस्वाद घेऊनच पुढे जातात.

**अविभाज्य तिखटपणा**

थोडक्यात तिखटपणा हा येथील जेवणाचा अविभाज्य भाग आहे. अगदी बाजरीची गरमागरम भाकर घ्यायची तिचा पोपडा काढायचा त्यावर लाल तिखट, मीठ आणि तेल टाकायचं. पोपडा वरून दाबला की ही तिखट भाकर खानदेशवासीयांचा नाष्टा. याच शिळ्या भाकरीचा काला करून त्यात तिखट मीठ, लोणच्याचा खार, लसूण, कांदा घालायचा की झाला बोकड काला. हाच काला तेलाच्या फोडणीवर कांदा परतून त्यात गरम केला की झाला मनोहर काला. या काही झटपट नाष्ट्याच्या रेसिपिज. याच नाष्ट्याच्या पदार्थात हरबऱ्याच्या डाळीचे फुनके आणि कढी हा एक वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ असतो. भिजवलेली डाळ वाटून तिच्यात लसूण, आलं, कोथिंबीर आणि चवीपुरतं मीठ घातलं की हे मिश्रण हाताच्या मुठीच्या आकारात वळायचे आणि पाण्यावर वाफवायचे. वाफवलेले हे फुनके फुगून गरम वाफांसह ताटात येतात तेव्हा ते कुस्करून त्यावर तेल घालून तोंडात टाकायचे. वरून कढीचा भुरका मारायचा.

शेजारच्या गुजरात राज्याचा प्रभाव काही पदार्थांवर दिसतो. कचोरी, फाफडा, खमण ढोकळे हे पदार्थ असेच आले. ते आज नाश्त्याच्या पदार्थात महत्त्वाचं स्थान पटकावून आहेत. नंदुरबारची पात्रा भजी अशीच. थोडक्यात अळूवडी कुरकुरीत आणि चवीला गोडआंबट. या पात्रा भज्यांची कीर्ती विदेशात गेली आहे. नवापूर भागात खमण ढोकळ्याचा भाऊबंद असल्यासारखा खमणी नावाचा पदार्थ मिळतो. तो तेथील नाष्ट्याचा अविभाज्य भाग आहे. डाळीच्या पिठाचे धिरडे हा नाष्ट्याचा महत्त्वपूर्ण पदार्थ. हा पदार्थ मकर संक्रांतीनंतर दुसऱ्या दिवशी कर साजरी करताना आवर्जून केला जातो. या दिवशी चेष्टेच्या नात्याची मंडळी परस्परांना 'धिंडरा खावा आनी गधडा वायी या', असे अहिराणी भाषेत म्हणतात. अशाच चटपटीत पदार्थात नाशिकचा चिवडा हा एक पदार्थ आहे, जो आता प्रसिद्ध झाला आहे.

येथील खाद्यसंस्कृती ही येथील कृषी जीवनाशी निगडित आहे. येथे पशुपालकांच्या घरात भाद्रपदात भालदेव बसविला जातो. हा आपल्या जनावरांचे रक्षण करतो अशी समजूत. म्हणून आठ दिवस घरातील दूधदुभते साठवून

## वांग्याचे भरीत



**जळगांव जिल्ह्यातले वांग्याचे भरीत सर्वत्र प्रसिद्ध आहे. हिवाळ्यात शेताशेतात भरीत पार्ट्या होतात. भरीतासाठी लागणारे वेगळे वांगे या भागात पिकते. तुरीच्या वाळलेल्या काड्यांना जाळून तयार झालेल्या निखाऱ्यात ही वांगी खरपूस भाजून त्यांचे साल काढले जाते. भाजलेल्या या वांग्यांना तेलही सुटते. नंतर त्यात कांदेपात, लसूणपात, हिरवी मिरची अशा सहज उपलब्ध असणाऱ्या जिनसा टाकून ते हाताने एकत्र केले जाते. हे वांग्याचे भरीत कच्चे किंवा मग पुन्हा तेलात परतून खातात.**

ठेवले जाते. भालदेव उठल्यावर साठविलेल्या दुधाचा खवा, लोणी, तूप करून हे पौष्टिक



पदार्थ आप्तेष्टांना वाटले जातात.

**कळण्याची भाकर**

कळण्याची भाकर ही जळगांव जिल्ह्यातील अनेक भागात दैनंदिन जेवणाचा एक भाग आहे. उडीद, दादर असे एकत्र दळून तयार होणारे हे पीठ उडदामुळे काहीसे चिकट होते, त्यामुळे कळण्याची भाकरी थापणे हे कौशल्याचे काम ठरते. चुलीवर खरपूस शेकलेली कळण्याची भाकरी आणि लाल मिरची घालून वाटलेली शेंगदाण्याची ओली चटणी, असा बाज. याचप्रमाणे फौजदारी डाळ, डाळ गंढोरी असे पदार्थही जळगाव जिल्ह्याची खासीयत आहे.



डाळ-बट्टीचं जेवण हा उत्तर महाराष्ट्रात मेजवानीचा मेनू मानला जातो. गायीच्या शेणाच्या गोवऱ्यांत भाजलेल्या या गव्हाच्या रवेदार पिठाच्या बट्ट्या (ज्याला स्थानिक लोक 'रोडगे' असे म्हणतात.) वरण आणि वरून साजूक तुपाची धार. जोडीला गटल्यांची किंवा वांग्यांची भाजी. खवय्ये या मेजवानीसाठी निमंत्रणाची वाटच पाहत असतात.

जळगाव जिल्ह्यातल्या लग्नातही वरण-पोळी आणि वांग्याची घोटलेली भाजी एवढ्या मेनूवर वऱ्हाडी खूश. तिकडे धुळे, नंदुरबार जिल्ह्यात वरणभात, मसालेभात आणि मठाची रस्सेदार भाजी (घुगऱ्या) एवढाच काय तो मेनू असायचा. नाही म्हणायला गोड पदार्थ बुंदी हजर असायची. हे सगळं अगदी अलीकडे म्हणजे मॅरेज लॉन आणि बुफे जेवणावळीचं स्वरूप प्राप्त होईपर्यंत सुरू होतं. तेव्हा दाराशी मांडव टाकून लोकांना जेवण देणं प्रतिष्ठेचं मानलं जात होतं.

**फोडणीची खिचडी**

फोडणीची खिचडी हा एक दैनंदिन जेवणातला असाच महत्त्वाचा पदार्थ. धुळे जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी सायंकाळी फोडणीची खिचडी ठरलेलीच. तूर, मसूर किंवा मूगडाळ आणि तांदूळ. कांदे, लसूण, तिखट, मसाला या मिश्रणावर परतून शिजवलेली ही खिचडी. शिजताना दरवळणारा घमघमाट हा रसनेला पाचक रसाचे घुमारे पाझरवण्यास पूरक ठरतो. आधण चुलीवरून उतरून खिचडी केव्हा ताटात पडते, असे होते. गरम खिचडीवर तेलाची धार, तोंडी लावायला लोणचं आणि जोडीला भाजलेला नागलीचा पापड. ही खिचडी दुपारच्या जेवणात असेल तर जोडीला

कढी हवीच. कढी-खिचडी आणि जोडीला बाजरीची भाकर आणि हिरव्यामिरच्यांचा ठेचा हा खानदेशी जेवणाचा बाज. भाजीसाठी काही नसेल तर पातळ रस्सेदार आमटी करून त्यात भाकरीचा काला मोडून खाणे हाही खानदेशी बाज. अशा आमट्यांना अहिराणी भाषेत 'बट्टं' असं म्हटलं जातं. त्यात खोबरं. शेंगदाणे,



खसखस अशा विविध प्रकारांचा समावेश होतो. बाळंतिणीला पौष्टिक खाद्य म्हणून असं जेवण देण्याची प्रथा आहे. उन्हाळा तीव्र असल्याने उन्हाचा प्रतिबंध करण्यासाठी कांद्याचं बट्टंही केलं जातं. याच श्रेणीत मोडणारे खूड मिरचीचे पाणीही असेच भन्नाट.

**मांसाहारी जेवण**

मांसाहारी जेवणात काळ्या मसाल्यातलं मटण, चिकन मात्र भन्नाट चव देतं. त्यातल्या त्यात जर खंडेरावाच्या गोंधळासाठी केलेलं मटण असेल तर केवळ मटण भाकरी काला मोडून खाण्यासाठी खवय्ये गर्दी करतात. गोंधळाच्या मटणाची नुसती आमटी पिणं हे अनेकांना आवडतं. तापी, गिरणा, पांझरा, गोदावरी, मौसम, कान, बुराई या नद्या आणि त्यावरील धरणे व अन्य जलसाठ्यात मासे मिळतात. त्यांचाही आवडीने आहारात समावेश होतो. एक मुछ, मुऱ्ह्या, कोंबडा, रोहू, कटला, डोकीन यांसारख्या जाती आता मत्स्योत्पादनाद्वारे मिळतात. नर्मदेतली वाम ही अशीच एक चवदार जात.

**वाळवणाचे पदार्थ**

खानदेशातल्या खाद्यसंस्कृतीत वाळवणाच्या पदार्थांचे खास स्थान आहे. मठा मुगाचे वडे, उडीद, नागली, दादरीचे पापड, जळगाव जिल्ह्यात होणाऱ्या बिबड्या, गव्हाच्या कुरडया, शेवया या सारखे पदार्थ तयार करून कडक उन्हात वाळवून वर्षभर साठवून मग जेवणात वापरले जातात. हे सर्व पदार्थ तयार करणे हे महिलांच्या संघटनशक्तीचे प्रत्यय देणारेच असते. गल्लीतल्या महिला एकत्र येऊन हे पदार्थ तयार करीत असतात. गरजेच्या वेळी झटपट स्वयंपाक करताना या पदार्थांचा वापर होतो. साध्या पाण्याला लसूण मिरचीची फोडणी देऊन केलेली वड्यांची भाजी हा



पदार्थ भाकरीचा काला मोडून फस्त केला जातो. यातल्या शेवया, कुरडयांसारखे पदार्थ आताच्या नूडल्सचे आदिम अवतारच होय. हे पदार्थ तयार करण्यासाठी महिलांचे होणारे संघटन म्हणजे बचतगट चळवळीची आद्य संकल्पना ठरते. केवळ शरीराचे पोषण, उदरभरण म्हणून नव्हे तर एका संस्कृतीची जडणघडण या खाद्यपदार्थातून होत असते.

**संपर्क : ९४२२७८९७३४**

❐❐

# नीतळ-मंगल अमळनेर



मंगळ ग्रहाचा आणि जळगाव जिल्ह्यातील 'अमळनेर' शहराचा प्राचीन काळापासून जरी संबंध असला तरी अलीकडच्या दोन दशकांपासून हे ठिकाण, मंगळ ग्रहाच्या मंदिराच्या जीर्णोद्धारामुळे प्रसिद्धीस आले आहे.

या स्थळाबद्दलची एक ११ व्या शतकातील कथा सांगितली जाते. या ठिकाणी अंबरीश ऋषी वास्तव्य करायचे. त्यांच्या साधनेने या ठिकाणी पाणी म्हणजे नीर आले. हे पाणी स्वच्छ म्हणजे निर्मळ, घाण नसलेले अर्थात अंमळ असल्याने अमळनीर असे या स्थळाचे नांव पडले. पुढे अपभ्रंश होऊन अमळनेर असे नाव प्रचलित झाले. जेथे स्वच्छ-नीतळ-मंगल असे वातावरण आहे. ते अमळनेर!!

**प्रा. गजानन शेपाळ**

या ठिकाणी मंगळ ग्रहाचे फार पुरातन परंतु छोटेसे मंदिर होते. त्याचा जीर्णोद्धार करून तेथे आता प्रशस्त सभामंडप, गर्भगृह बाजूला वन आणि संरक्षित उद्यान तयार केले आहे. या ठिकाणी भारतातून तसेच भारताबाहेरूनही मांगलिक (पत्रिकेत मंगळ असणारी व्यक्ती) आणि इतर भाविक येत असतात. संपूर्ण भारतात अमळनेर आणि कोलकता येथेच मंगळ ग्रहाची पुरातन मंदिरे आहेत. अमळनेर ह्या ठिकाणी इतरही कांही धार्मिक स्थळे आहे. जैनांचे ८ वे तीर्थकर चंद्रप्रभू आणि श्रीक्षेत्रपाल महाराज मंदिर येथे आहे. खानदेशातील पंढरपूर म्हणजे अमळनेर! अशी ओळख असलेल्या या ठिकाणी संत मुक्ताईची समाधी आहे. संत सखाराम महाराजदेखील येथीलच.

भारतातील सर्वात जुने तत्त्वज्ञान या विषयाचे केंद्र भारतीय तत्त्वज्ञान संस्था येथेच आहे. आज ही संस्था प्रताप तत्त्वज्ञान संस्था या नावाने ओळखली जाते. अमळनेरच्या उत्तरेला प्रतापनगर या भागात ४० एकरात विस्तारलेले प्रताप कॉलेज आणि हायस्कूल अमळनेरच्या शैक्षणिक क्षेत्रातील मानाची शिखरे आहेत.

सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानी आणि वैदिक पंडित न्यायाचार्य श्रीरामशास्त्री उपासनी, यांच्यामुळे अमळनेरचे नाव जगभर पोहोचले.

सानेगुरुजी अर्थात पांडुरंग सदाशिव साने हे अमळनेरच्या प्रताप हायस्कूलमध्येच शिकवत होते. अशा ह्या अमळनेर शहराने उद्योगक्षेत्रातही स्वत:चे नाव कोरलेले आहे. सनफ्लॉवर वनस्पती तूप येथेच उत्पादित केले जाते. विप्रो कंपनीचे जन्मठिकाण अमळनेर आहे. उद्योगपती अझीज प्रेमजींच्या वडीलांनी डालडाचे उत्पादन येथेच सुरू केले.

या नगरीजवळ आजही अंबरीश नावाची टेकडी असून, तेथे दरवर्षी यात्रा भरते. आता तर अमळनेरकडे सहलींचे ठिकाण म्हणून पाहिले जाते.

**संपर्क : ८१०८०४०२१३**

❐❐

# जनस्थानाची रत्ने

**नाशिक ही सांस्कृतिक भूमी आहे, साहित्य क्षेत्रात अत्यंत प्रतिभावान अशा विभूतींच्या सहवासाने ही भूमी पावन झालेली आहे. कवी चंद्रशेखर गोऱ्हे असोत की कवी गोविंद, नाशिकच्या सांस्कृतिक वातावरणाला नेहमीच भरभक्कम आधार मिळत आला आहे. याच विभूतींमध्ये ज्यांनी नाशिकची जडणघडण केली अशा काहींचा समावेश होतो. त्यात ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ ग. वि. अकोलकर, डॉ. अ. वा. वर्टी, चित्रमहर्षी दादासाहेब फाळके, कविवर्य कुसुमाग्रज, नाटककार वसंत कानेटकर, लोकशाहीर वामनदादा कर्डक यांचा प्राधान्याने उल्लेख होतो. या प्रभृती म्हणजे जनस्थानाला लाभलेले रत्नांचे**



**चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके**

धुंडिराज गोविंद ऊर्फ दादासाहेब फाळके यांचे शालेय शिक्षण मुंबई येथे झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् येथे प्रवेश घेतला. याच सुमारास त्यांना फोटोग्राफी, प्रोसेस फोटोग्राफी यांसारख्या गोष्टींचा छंद लागला. काही काळ त्यांनी बडोदा येथील कलाभवनात शिक्षण घेतले. कलाभवनाचे प्राचार्य गज्जर यांच्या उत्तेजनामुळे त्यांनी शिल्पकला, चित्रकला, थ्री कलर प्रोसेसिंग व छायाचित्रण इत्यादी क्षेत्रांत वेगवेगळे प्रयोग केले. एकहाती प्रयत्न करून पहिल्या भारतीय चित्रपटाची निर्मिती केली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत चित्रपटतंत्र आत्मसात करून त्यांनी भारतात चित्रपट निर्मितीचा पाया घातला आणि म्हणूनच त्यांना भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हणतात.

**ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ ग. वि. अकोलकर**

प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ प्रा. ग. वि. अकोलकर म्हणजे गणिताचार्य रामानुजम यांची जणू सावलीच. अकोलकर सर उत्तम साक्षेपी वाचक आणि लेखकही होते. अकोलकर सरांनी १९५० ते ७० या काळात नाशकातील तीन नामवंत शिक्षणसंस्थांमध्ये अध्यापनाचे काम केले. रा. गो. कुंटे, श्रीरंग गुणे व अकोलकर सर या तिघांनी मिळून गणित मंडळाची स्थापना केली होती. लहान मुलांना गणिताची गोडी लागावी हा त्याचा मुख्य उद्देश होता.

**कविवर्य कुसुमाग्रज**



हातात काठी, मानेला गुंडाळलेली मफलर व मोठ्या फ्रेमचा चष्मा अशा पेहरावातील एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व म्हणजे कविवर्य कुसुमाग्रज अर्थात विष्णू वामन शिरवाडकर. त्यांचा जन्म पुण्याचा. कुसुमाग्रज यांच्या नावाने आज महाराष्ट्रभर नाशिकची ओळख आहे. कारण तात्यासाहेब म्हणजे सुंदर शब्दांचे धनी होते. ते मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार व समीक्षक होते. आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव या विषयावरील त्यांचे लिखाण प्रचंड गाजलेले आहे.

त्यांची साहित्यसंपदा विपुल आहे. १९८८-८९ मध्ये त्यांना ज्ञानपीठ मिळाले. २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो.

**ज्येष्ठ नाटककार वसंत कानेटकर**

'रायगडाला जेव्हा जाग येते' हे नाटक लिहून अजरामर झालेले वसंत कानेटकर हे ज्येष्ठ नाटककार. गुलाम, घर, पंख, पोरका, तेथे चल राणी या त्यांच्या कादबऱ्यांना व लावण्यमयी या कथासंग्रहास अमाप प्रसिद्धी मिळाली. नाटकाच्या लिखाणासाठी त्यांनी प्राध्यापकी सोडून दिली. त्यानंतरच्या तीस वर्षांत त्यांनी चाळीस नाटके आणि काही एकांकिका लिहिल्या. त्यात वेड्याचं घर उन्हात, देवांचं मनोराज्य, प्रेमा तुझा रंग कसा, रायगडाला जेव्हा जाग येते, लेकुरे उदंड जाहली, मत्स्यगंधा, हिमालयाची सावली, विषवृक्षाची छाया, कस्तुरीमृग, वादळ माणसाळतंय, अश्रूंची झाली फुले, मला काही सांगायचंय या नाटकांचा समावेश आहे. १९८८ मध्ये ठाणे येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना मिळाला होता.

**प्रशांत भरवीरकर**



**विनोदवीर डॉ. अ.वा.वर्टी**

विनोद हाच डॉक्टरांच्या प्रतिभेचा अंगभूत गुण आहे. त्यांच्या विनोदाची जातही अतिशय नाजूक आणि हृदयस्पर्शी आहे. डॉ. वर्टी यांची भाषाशैली आणि वर्णनपद्धतीही अतिशय मार्मिक व विनोदी आहे. त्यांचे अवलोकनही बारकाव्याचे आहे. 'ही पावती स्वत: आचार्य अत्रे यांनी ज्यांना दिली ते डॉ. अ. वा. वर्टी हे केवळ प्रसिद्ध विनोदी कथाकारच नव्हे तर 'अमृत' या पहिल्या मराठी डायजेस्टचे आणि नंतर 'श्रीयुत'चे संपादकही होते.

**लोकशाहीर वामनदादा कर्डक**



लोकशाहीर वामनदादा कर्डक म्हणजे झंझावते वादळ. हा 'तुफानातील दिवा' तळागाळातील लोकांसाठी आयुष्यभर झटत राहिला. वामनदादांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ चा. देशवंडी, ता. सिन्नर येथे सईबाई कर्डक व तबाजी कर्डक या दाम्पत्याच्या पोटी झाला. त्यांनी ३ मे १९४३ रोजी पहिले विडंबन गीत लिहिले. तेव्हापासून २००४ पर्यंत गीतलेखन व गायनाचा अखंड प्रवास. दादांच्या प्रकाशित आणि अप्रकाशित मिळून साधारणतः दहा हजाराच्या आसपास गीतरचना आहेत. उर्दुतील गजल, खमसा, नज्म हे प्रकार दादांनीच मराठीत आणले. १९४० मध्ये दादांची अन् डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाली. बाबांचे प्रथम दर्शन झाल्यानंतर चाळीसगाव, मनमाड, टिळकनगर येथे बाबासाहेबांच्या स्टेजवर त्यांनी गायन केले. ३ मे १९४३ रोजी सायमन कमिशनमध्ये बाबासाहेबांची मुलाखत होती. बाबासाहेबांना प्रतिनिधित्त्व मिळावं यासाठी चाळीत सभा होती तेथे दादा प्रथम गायले. बाबासाहेबांनी समाजोद्धाराची जी चळवळ सुरू केली त्याला जलसाकार उमेदीने साथ देत होते.

जलशाच्या माध्यमातून करमणूक आणि प्रबोधन करणाऱ्यांत वामनदादा कर्डक हे नाव सक्रिय झाले.

### साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक

प्रसिद्ध स्मृतिचित्रे हा ग्रंथ म्हणजे लक्ष्मीबाईंचे आत्मवृत्त आहे. आपले दोष लपविणे व दुसऱ्यांचे दोष दाखवणे येथे प्रकार कोठेही सापडणार नाही. यातील विनोद कोणाला बोचणारा नाही कारण तो स्वत:वर केलेला आहे. टिळक व लक्ष्मीबाई दोघांनीही समाजकार्याला वाहून घेतलं होतं. यामुळे या आत्मवृत्ताला लोकइतिहासाचं स्वरूप आलंय. स्मृतीचित्रांबरोबरच त्यांनी टिळकांचे अर्धवट राहिलेले 'ख्रिस्तायन'ही पूर्ण केले. अनेक अभंग व कीर्तने रचली.

### दादासाहेब गायकवाड

भाऊराव कृष्णराव गायकवाड ऊर्फ दादासाहेब गायकवाड हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ज्येष्ठ सहकारी, दलित समाजाचे नेते व सुधारक होते. दादासाहेब या नावानेच ते ओळखले जात. डॉ. आंबेडकरांसमवेत त्यांनी दलितोद्धाराच्या कार्यास सुरुवात केली. ते मुंबई विधानसभेचे तसेच लोकसभेचे सदस्य होते. १९६२ मध्ये त्यांची राज्यसभेवर निवड झाली. १९५६ मध्ये त्यांनी डॉ. आंबेडकरांसोबत बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. महाडच्या सत्याग्रहात व नाशिकच्या काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रहात ते आघाडीवर होते.

### शांताबाई दाणी

शांताबाई यांचा जन्म १ जानेवारी १९१८ चा. त्यांनी आपल्या अफाट कार्यशक्तीच्या जोरावर तत्कालीन काळात देशातील क्रमांक चारचा पक्ष असलेल्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे नेतृत्व केले होते. १९४६ साली शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने आयोजित केलेले महिला संमेलनाचे अध्यक्षपद असो किंवा रायपूरमध्ये जाऊन केलेले आंदोलन असो, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची १९५७ साली झालेली स्थापना असो किंवा दादासाहेबांनी उभारलेला भूमिहीनांचा लढा यशस्वी करणे असो शांताबाईंनी प्रत्येक आघाडी नेटाने लढवली,

### शिवाजी तुपे

प्रख्यात निसर्गचित्रकार शिवाजी तुपे त्यांनी सर जे.जे.स्कू ल ऑफ आर्टमधून चित्रक लेचं औपचारिक शिक्षण घेतले. जलरंगातील लॅण्डस्केप्स आणि स्केचेस हे त्यांचे वैशिष्ट्य असून गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ ते लॅण्डस्केप्स करत आहेत.

### बाबुराव बागुल



विद्रोह मांडण्यासाठी कविता पुरेशी न वाटल्याने कथा व कादंबरीचा फॉर्म स्वीकारणारे बाबुराव बागुल म्हणजे नाशिक मधील मान्यवर विद्रोही लेखकांपैकी एक. ते दलित साहित्यविषयक चळवळीतील प्रमुख प्रवर्तकही होते. बागूल यांच्या लेखनामुळे मराठी साहित्यात विद्रोही पर्वाचा प्रारंभ झाला. दु:ख, दैन्य, दारिद्र्याचा जन्मजात अनुभव त्यांना मिळाला. आंबेडकरी चळवळीचा प्रभावशाली वारसा त्यांना वस्तीमधूनच मिळाला. १९६३ मध्ये 'जेव्हा मी जात चोरली होती' हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. बाबुरावांनी दलित साहित्याचे नाते अमेरिकेतील-आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांच्या साहित्याशी जोडून दलित साहित्याला वैश्विक भान देण्यास प्रारंभ केला.

**संपर्क : ९५०३६७७७४०**

## उज्ज्वल भविष्याची सुवर्णसंधी

**(पान ३९ वरून)**

### शेती क्षेत्रातील परिवर्तन

उत्तर महाराष्ट्रात चार विद्यापीठे आहेत. १९६६-६७ साली राहुरी येथे राज्यातील पहिले कृषी विद्यापीठ वसंतराव नाईक यांनी सुरु केले. या विद्यापीठाने शेती क्षेत्रातील परिवर्तनाचे व ग्रामीण भागाच्या परिवर्तनाचे ऐतिहासिक स्वरूपाचे कार्य केले आहे. जळगावचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक येथील राज्यातील लक्षावधी विद्यार्थ्यांना संधी देणारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य आयोग विज्ञान विद्यापीठ यांचा तर उल्लेख करावा लागेल. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने मानवी जीवनातील जवळपास अनेक विषयांचे संशोधन आणि शिक्षण देण्याचे काम हाती घेतले आहे. त्यांच्या कृषी विज्ञान केंद्राचे काम मोठे आहे. अगदी दूरशिक्षणासाठी त्यांनी उपग्रहाच्या मदतीने सुरु केलेला वापर हा ज्ञान आणि शिक्षण अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचा अभिनव उपक्रम म्हटला पाहिजे.

### कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे कार्य

नाशिक विभागात सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे कार्य फारच महत्त्वपूर्ण आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी १५ एप्रिल, १९२० रोजी ज्या बोर्डिंगचे भूमिपूजन केले त्या शाहू बोर्डिंगचे काम अनेक वर्ष दादासाहेब गायकवाड यांनी पाहिले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सुरुवातीच्या काळात नाशिकला येत असत. तेव्हा येथेच त्यांची आणि दादासाहेबांची भेट होत असे. श्रीमती शांताबाई दाणी आणि दादासाहेब रुपवते यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य खूप मोठे आहे. वसतिगृहात पुराचे पाणी शिरले तरी मुलींच्या शिक्षणाची व त्यांच्या संरक्षणाची काळजी घेणाऱ्या रुपाताई साळवे यांचे शैक्षणिक कार्यही नजरेआड करता येणार नाही. आदिवासी भागात ना. माणिकराव गावित, सुरगाणा भागात जिवा पांडू गावित, झेड. एम्. कहांडोळे, हरिभाऊ महाले यांनी शिक्षणप्रसाराचे काम आपापल्या भागात केले. जळगाव जिल्ह्यात बेंडोळे यांचेही काम तेवढेच महत्त्वाचे आहे.

या सर्व मान्यवरांच्या कष्टामुळेच २०१३च्या शालांत परीक्षेत नाशिक विभागात २,०६,५३६ एवढे तर बारावीच्या परीक्षेला १,४५,२०५ एवढे विद्यार्थी बसले होते. उत्तर विभागात सर्वच स्तरातील समाजधुरीणांनी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी जे योगदान दिले आहे, त्यामुळेच विविध विद्याशाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भविष्यात ती अजूनही वाढेल.

# चिरंतन स्मृती

सामाजिक न्याय विभागामार्फत महापुरुषांच्या स्मृतींचे, कार्याचे कायमस्वरूपी जतन व संवर्धन करण्यासाठी नाशिक जिल्ह्यात स्मृतिस्थळांचा विकास करण्यात येत आहे.

राजेंद्र कलाल

## येवला मुक्तिभूमी



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मी हिंदू म्हणून जन्मलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी धर्मांतराची घोषणा नाशिक जिल्ह्यातील येवला येथे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी केली होती. धर्मांतराच्या ऐतिहासिक घोषणेनंतर २१ वर्षांनी दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन त्यांनी धर्मांतर घोषणेची प्रतिज्ञापूर्ती केली. आज येवल्याच्या परिसरास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्या परिसरास ' मुक्तिभूमी' म्हणून ओळखले जाते. या मुक्तिभूमीवर बौद्ध जनता १३ ऑक्टोबर रोजी दरवर्षी लाखोच्या संख्येने उपस्थित राहते. या मुक्तिभूमीचे स्मारक भव्यदिव्य असले पाहिजे. यासाठी सामाजिक न्याय विभागाने पुढाकार घेतला आहे. मुक्तिप्रतिष्ठानच्या जागेबरोबरच शासनाच्या ४.३३ हेक्टर जागेत 'मुक्तिभूमी' स्मारक साकारत असून शासनाने मुक्तिभूमीच्या बांधकामासाठी २१ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी दिली आहे. आतापर्यंत मुक्तिभूमी स्मारकाचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. या मुक्तिभूमी स्मारकात १०० अनुयायांसाठी पाठशाळा, ॲम्फी थिएटर, भिख्खू निवास, डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित भित्ती शिल्प (विश्वभूषण) तळमजल्यावर, भगवान गौतमबुद्धांची मूर्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, विपश्यना हॉल, कर्मचारी निवासस्थान, बगिचा आदी बाबी असणार आहेत.

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृह

संभाजी तुकाराम गायकवाड ऊर्फ कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जवळचे सहकारी होते. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपदही दादासाहेबांनी भूषवले. दादासाहेब गायकवाड यांच्या नावाने सामाजिक न्याय विभागाच्या काही योजना व पुरस्कारही आहेत. त्यांच्या स्मृती कायमस्वरूपी जतन व संवर्धन करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने दादासाहेब गायकवाड यांचे जन्मठिकाण असलेल्या मौजे आंबेदिंडोरी, (जि.नाशिक) येथे कायमस्वरूपी सभागृह उभारले आहे. ३५ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अत्यंत सुसज्ज सभागृहात संग्रहालय, ग्रंथालय, ध्यान सभागृह, ध्वजस्तंभ व बगिचा आदी बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

## मुखेड क्रांतिस्तंभ

१९३१-३२ दरम्यान येवला तालुक्यातील मुखेड येथे 'पांडवप्रताप' ग्रंथाचे गावातील मंदिरात सवर्ण लोकांकडून पारायण केले जात होते. सार्वजनिक मंदिरात होणाऱ्या या पारायणात दलितांना प्रवेश दिला जात नव्हता. तेव्हा गावातील काही दलितांनी या 'पांडवप्रताप' पारायणास सहभागी करून घ्यावे. यासाठी संघर्ष करायला सुरुवात केली. 'पांडवप्रताप' ग्रंथ डोक्यावर घेऊन



दलितांनी मिरवणूक काढण्यास सुरुवात केली. या पांडवप्रताप सत्याग्रहाचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी केले. पांडवप्रताप ग्रंथावरून झालेल्या या संघर्षाची परिणती दलित-सवर्णांमध्ये भांडण-तंटे, कोर्ट-कचेऱ्यांमध्ये झाली. शासनाने हस्तक्षेप करून हा वाद संपवला. मुखेड येथील सत्याग्रहाची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लंडन येथे तार करून पाठविली जात होती. तारेचा आधार घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वत: बातमी तयार करून २४ सप्टेंबर १९३१ रोजी लंडन टाइम्स या वर्तमानपत्रात बातमी छापून आणली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर येवला तालुक्यातील मुखेड सत्याग्रहाची नोंद घेण्यात आली. या सत्याग्रहाच्या स्मृती म्हणून मुखेड येथे क्रांतिस्तंभ व स्मारक उभारण्यात येत आहे. १ हेक्टर जागेत याचे बांधकाम होणार आहे. १८ लाख रुपये खर्चून क्रांतिस्तंभ उभारण्यात आला आहे. तर स्मारकाच्या इमारतीचे ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. या सुसज्ज, भव्य अशा स्मारकात ग्रंथालय, वाचनकक्ष, ऐतिहासिक दस्तऐवजांचे संग्रहालय आदी सुविधा असणार आहेत.

## सामाजिक न्यायभवन

नाशिक विभागात नाशिक, जळगांव नंदुरबार अशा तीन जिल्हयात सामाजिक न्यायभवनाच्या इमारती उभ्या राहिल्या आहेत.

## १००० मुला-मुलींचे विभागीय वसतिगृह

मुंबई, पुणे, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, लातूर व नाशिक अशा सात ठिकाणी विभागस्तरावर १००० मुला-मुलींचे वसतिगृह सुरु करण्यात येणार आहेत. नाशिक विभागाचे वसतिगृह २०११-१२ पासून नाशिक-धुळे रस्त्यावरील आडगाव शिवारात सुरु झाले आहे. अनेक विद्यार्थी नाशिक शहरातील वैद्यकीय, अभियांत्रिकी, अध्यापन, कला, वाणिज्य, विज्ञान, कृषी इत्यादी महाविद्यालयांत प्रवेशित असून त्यामुळे उच्च शिक्षण घेण्याची संधी अनेक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उपलब्ध होत आहे.

संपर्क : ९८२३३८९६७८

❐ ❐

# नंदुरबार : समृद्ध आणि सुसंस्कृत

**महाराष्ट्राच्या उत्तरेकडील खानदेशातल्या धुळे जिल्ह्याचं विभाजन होऊन अस्तित्वात आलेला नवीन जिल्हा आणि त्याच्या मुख्यालयाचे ठिकाण म्हणजे नंदुरबार! सातपुड्याच्या डोंगरदऱ्यात आणि जंगलाच्या सान्निध्यात राहणारे आदिवासी आणि अठरापगड जातींचे व नाना धर्मांचे लोक अशी सरमिसळ या शहरात पाहावयास मिळते. वेगवेगळ्या बोली बोलणाऱ्या इथल्या लोकांची जीवनशैली वैविध्यपूर्ण आहे. शेती आणि जंगलसंपत्तीवर गुजराण करणाऱ्या या शहरात औद्योगिक विकासाचे वारे अद्याप शिरलेले नसले, तरी आधुनिक जीवनशैलीने शिरकाव केला आहे. त्यामुळे इथल्या लोकांच्या जगण्याची कुसही बदलत आहे.**

बदलती शहरे

रणजितसिंह राजपूत

खानदेशातील प्राचीन नगरांपैकी नंदुरबार हे एक नगर. सावळदा संस्कृती (स.पूर्व २००० ते १८०० ) मध्ये तापीतील आद्य शेतकऱ्यांच्या वसाहतीत नंदुरबार येथेही शेतकऱ्यांची वसाहत होती असा उल्लेख आढळतो. 'नंदीगड' या नावाने नंदुरबारचा पहिला ऐतिहासिक उल्लेख तिसऱ्या शतकातील कान्हेरी लेण्याच्या लेखात सापडतो. शिलालेखात नंदुरबारचा पुरातन उल्लेख सेंद्रक निकुम्भल्ल शक्ती याचा नागद ताम्रपट शके ५७६ यात आहे. याच शीर्षकाने प्रा. ग. ह. खरे यांनी १९३९ च्या संशोधनात एक लेख लिहिला होता. या लेखात ते म्हणतात, 'नांदीपूरद्वारी' या स्थळांचा उल्लेख राष्ट्रकूट राणी शील महादेवी हिच्या शके ७०८ च्या जेठवई दानपत्रात आला आहे. ज्येष्ठ इतिहास तज्ञ डॉ. सर्जेराव भामरे यांच्या मते नांदिपूरद्वारी म्हणजे नंदुरबारचे जुने नाव हे गांव नंद गवळीने बसवले म्हणून त्यास नंदीगड हे नाव पडले. असाही एक उल्लेख आढळतो. मुसलमान काळात या गावाला नजरबाद (नजर आबाद) असेही म्हणत.

१३४३ मध्ये आफ्रिकेचा प्रसिद्ध प्रवासी इब्न बतुता या नगरातून गेला असा उल्लेख आढळतो. मराठ्यांनी वसवलेली नगरी म्हणून त्याने तिचा उल्लेख केला आहे. या नगरात अधिकतर मराठे राहत. ते चांगले व्यापारी व औषधोपचार करण्यात प्रवीण होते. १३७० च्या सुमारास नंदुरबार परगणा गुजरातच्या मुजफ्फरशहाच्या ताब्यात होता. याच काळात मलिक फरुखीने नंदुरबारवर आक्रमण करून आजुबाजूचा प्रदेश उद्ध्वस्त केला. १४२९ मध्ये गलवारच्या प्रमुखाने गुजरातच्या सुलतानाविरुध्द खानदेशच्या फरुखी सुलतानाची मदत मागितली. यावेळी गलवार प्रमुखाने नंदुरबारची लुटमार केली. १५२६ मध्ये गुजरातच्या मुहम्मदशहाने मुबारकखान फरुखीला नंदुरबार व सुलतानपूर हे परगणे दिले. मुहम्मदशहाच्या मृत्यूनंतर गुजरात सुलतान (चंगेजखान) याने नंदुरबारवर अधिकार प्राप्त केला. थोड्याच कालावधीत हा प्रदेश परत फरुखी सुलतानास परत दिला. सन १५८४ मध्ये अकबर बादशहाने मिर्झा अजिज कोका यास खानदेशवर आक्रमण करण्यास पाठविले. त्याने नंदुरबार व सुलतानपूर या शहरांची लूट केली. हा प्रदेश जिंकला. अकबराने केलेल्या व्यवस्थेनुसार नंदुरबार व सुलतानपूर हे परगणे काही काळ खानदेशातून काढून माळव्यास जोडण्यात आले होते. एन-ए-अकबरीत नंदुरबारचा उल्लेख 'सरकार' (परगणा) असा येतो.

१६८५ चे सुमारास नंदुरबारनगराचे वर्णन भानुभट ऊर्फ हरिकवी यांनी शुंभूराजचरित्र काव्यग्रंथात नंदुरबारला नंदिद्वारपूर म्हटले आहे. हे नगर तिन्ही जगात सर्व गुणांचे सार, पृथ्वीवरील सुखाचा आधार व तेथील लोक सर्व प्रकारे सुखी आहेत. संतुष्टमनाचे व आनंदी आहेत, असे म्हटले आहे. ट्रव्हेर्नियरने नंदुरबारच्या समृध्दीचे वर्णन Enjoying Considerable Prosperity असे केले आहे. त्याचप्रमाणे लासेन, यूल, फेरिस्ता, ऐन-ए-अकबरी, अँडर्सन, इंग्लिश इन् वेस्टर्न इंडिया या ग्रंथांमध्ये नंदुरबारचे वर्णन आले आहे. फ्रेंच प्रवासी मार्टिन १६७० व १६८१ मध्ये नंदुरबारला होता. त्यानेही हे नगर समृद्ध असल्याचा उल्लेख केला आहे.




१६९६-९७ या सुमारास छत्रपती राजाराम महाराजांचे सरदार नेमाजी शिंदे व इतर आठ हजार स्वारांचे सैन्य घेऊन नंदुरबार परगण्यात येऊन नंदुरबारच्या सावकारांकडून त्यांनी १ लाख ४० हजार रुपये लुटले व मोगल सुभेदार हुसेन अलिखानचा पराभव केला. १७६० मध्ये हा भाग पेशव्यांनी आपल्या ताब्यात घेऊन त्याचा काही भाग शिंदे व होळकर यांना जहागिरीत दिला. १७६० पूर्वी नंदुरबार परगणा मोगल बादशहाच्या ताब्यात होता. पुढे १८१८ मध्ये हे नगर इंग्रजांच्या ताब्यात आले.

**प्राचीन महसूल व्यवस्थापन**

अकबराच्या काळात या भागातून ५ कोटी



## मशिदी

नंदुरबारला जे पिराचे स्थान आहे, तेथील मुतवालीस इंग्रजी अंमलानंतर प्रश्नावली विचारण्यात आली होती, तिची त्याने फारसी किताब व कागदपत्रे पाहून २७ नोव्हेंबर १८२८ मध्ये जी उत्तरे दिलीत त्यात म्हटले होते की, हिजरी सन ६११ अरबस्थानातून मुसलमानांनी येऊन येथील नंदा गवळी (रायनंद गवळी) यास जिंकले व पुढे तेथे पिराचे स्थान अहमदाबादेच्या नबाबाने हिजरी सन ९६६ मध्ये बांधले. नंदुरबारच्या दक्षिणेस एक मशीद आहे. तेथे फारसी भाषेत कोरलेल्या लेखावरून ती १५८३ मध्ये अकबर बादशहाने बनवली असे समजते. पाताळगंगेच्या दक्षिणेला जुनी मशीद व मकबरे आहेत. या इमारती वास्तुशिल्पाच्या कलाकृतीचे चांगले नमुने आहेत. नंदुरबारला एकूण १९ मशिदी आहेत.

दाम जमीन महसूल गोळा होत होता. १७९६ साली १,५१,६६९ रुपये इतका वसूल या परगण्यात झाला. १८०५ मध्ये ९,३१,२०६ रुपये एवढा वसूल झाला. १७९५-९६ साली या परगण्यात हरिगोविंद हा मामलेदार होता. त्याला वार्षिक ३००० रुपये पगार व पालखीचा मान होता.

### आर्थिक व्यापार

नंदुरबार त्यावेळी टरबूज, द्राक्ष व केशरासारख्या सुवास येणाऱ्या तांदळाकरिता सर्वदूर प्रसिध्द होते. कापूस, मीठ, डाळ, साखर व द्राक्ष्यांचे हा परगणा आगार समजला जाई. १७ व्या शतकात तर ते व्यापाराचे प्रमुख केंद्र होते. वारंवार होणाऱ्या हल्ल्यांनी ते उजाड होत राहिले व पुन:पुन्हा वसत राहिले. नंदुरबारात तांबे, पितळ, चिलखत, हत्यारे यांची निर्मिती होत होती. १६६६ मध्ये इंग्रजांनी येथे एक वखार घातली व ती चांगली चालल्यामुळे त्यांनी अहमदाबादचा कारखाना १६७० साली येथे आणला व त्यात तयार झालेला माल इंग्लंडला पाठविण्यात आला. नंदुरबारच्या आसपासच्या प्रदेशात कापडाचे उत्पादन होई. येथे बफ्ता व पटका या प्रकारचे कापड मिळत असे. सुरतजवळ जरी कापडाच्या किंमती वाढल्या की, नंदुरबारच्या कापडाला मागणी वाढत असे. येथून कापूस, जवस, गहू, रोशेलतेल वगैरे जिन्नस बाहेर जात असत. येथे मोठमोठे सावकार होते. पेशव्यांनाही ते कर्ज देत.

व्याजाच्या दराबाबत मात्र नंदुरबार हे मराठा साम्राज्यातील सर्वात मोठे महागडे नगर असावे. कारण एका व्यापाऱ्याने दरमहा दर शेकडा ५ रुपये दराने एका कुळाला कर्ज दिलेले दिसते. एवढा दर सहसा इतरत्र आढळत नाही तो नंदुरबारला आढळतो. आज नंदुरबारला व्यापारी एवढा गडगंज संपत्तीचा मालक का दिसतो तर त्याचे मूळ आपल्याला इतिहासात आढळते.

### मंदिर, देवस्थाने

नंदुरबार नगरात व परिसरात ६० च्या वर मंदिरे आहेत. यातील काही प्राचीन शिल्पकलेची आठवण करून देतात. उदा. दंडपाणेश्वर मंदिर सुमारे ३०० वर्षापूर्वी गणपती नाल्याजवळ गणेशमूर्ती व महादेवाची पिंड स्वयंभू अवस्थेत मिळाली असे सांगतात. . नंदराजाच्या दरबाराजवळचे संकष्टादेवीचे मंदिर. भारतात फक्त वाराणसी व नंदुरबार याच ठिकाणी या देवीची मंदिरे असल्याचे सांगितले जाते.

ब्रिटिश काळात या नगराची अधोगती होण्यास प्रारंभ १८०२ सालापासून झाला. होळकरांचे आक्रमण, वेळोवेळी पडलेले दुष्काळ, पेंढारी आणि अरब यांनी या भागावर केलेले हल्ले यामुळे हे नगर दयनीय परिस्थितीला पोहोचले.

१८६५ मध्ये नंदुरबार नगर परिषदेची स्थापना करण्यात आली. २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या १,११,३६७ आहे. शासनाच्या धोरणानुसार शहराचा समावेश आदिवासी उपयोजना क्षेत्रात करण्यात आला आहे.

### भौगोलिक स्थान

देशाच्या नकाशात आपल्याला गुजरात आणि मध्य प्रदेश यांच्या चिमट्यात अडकलेला नंदुरबार जिल्हा सापडेल. दीड दशकापूर्वीच जिल्हा म्हणून अस्तित्वात आलेल्या नंदुरबार जिल्ह्याचं मुख्यालय असलेलं हे शहर पूर्वी धुळे जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण होतं.

सातपुड्याच्या आणि सह्याद्रीच्या पसाऱ्यातील टेकड्यांनी व्यापलेल्या या जिल्ह्यातील प्रमुख शहर नंदुरबार हे तुलनेनं सपाटीवर आहे, तरी भोवती छोट्या छोट्या

## चलनपद्धती

नंदुरबार नगरावर मोगल चलन पद्धतीचा प्रभाव दिसतो. अकबराच्या काळात येथे नाणी पाडण्याची टाकसाळ असावी. शिवकाळात नंदुरबारमध्ये टके आणि रुके हे चलन प्रचलित होते. शिवाजीच्या काळात एक रुपयाबरोबर ४० टके मिळत. पेशव्यांच्या काळात मात्र ही किंमत बदललेली दिसते. मराठी राज्यात जे सरदार होते, त्यांचीही नाणी येथे व्यवहारात वापरली जात. नंदुरबार हे प्रामुख्याने होळकर घराण्याच्या ताब्यात होते. म्हणून त्या घराण्याने पाडलेली नाणीही येथे वापरली जात. नंदुरबार नगरात खोटी नाणीही प्रचलित होती.






**मध्यप्रदेशमधून येऊन नाशिककडे जाणाऱ्या उत्तर-दक्षिण मार्ग आणि सुरतकडून निजाम राज्याकडे जाणाऱ्या पश्चिम-पूर्व मार्गावरील सुरक्षित शहर असल्याने प्रचंड संपत्ती असलेल्या व्यापाऱ्यांचं नंदुरबार हे मुख्य केंद्र होतं.**
**ब्रिटिश सत्ता स्थिरावल्यावर दक्षिण गुजरातमधील सुरत आणि पूर्व खानदेशातील मध्य रेल्वेवरील महत्त्वाचं जंक्शन भुसावळ यांना जोडणारी रेल्वेलाइनही टाकली गेली. या तापी व्हॅले लाइनवरील नंदुरबार हे महत्त्वाचं स्टेशन असल्याने हे शहर गुजरातशी जोडलं गेलं आहे. ब्रिटिश शासनकर्त्यांशी असलेल्या नात्याचा लाभ घेऊन सुरत परिसरातील पारशी व्यापारी मंडळी जशी मुंबईच्या दिशेने डहाणूकडे सरकली, तशीच ती बलसाड, वापी, नवापूर, नंदुरबार या खानदेशातील रेल्वेलाइनवरील प्रमुख गावातही आली. ताडी, दारू, मिरची, तूर, उडीद, मूग, अंबाडी, तीळतेल, लाकूड इत्यादींच्या व्यापाराबरोबरच रेल्वे इंजिनात जळालेला कोळसा लिलावाने घेण्याचे पिढीजात अधिकार या लोकांनी आतापर्यंत सांभाळले होते. येथील मिरच्यांची बाजारपेठ महाराष्ट्रात सर्वांत मोठी आहे. त्यांच्यासोबत गुजराती मंडळीही नंदुरबारात पसरलेली. याचा नंदुरबारच्या संस्कृतीवर खोल परिणाम झाला आहे. नंदुरबारच्या भाषेलाही त्यामुळे 'गुजरी' म्हटलं जातं.**



टेकड्या आहेत. पूर्वी हे शहर भोवतालच्या टेकड्या मजबूत भिंतींनी जोडून किल्ल्यासारखं कोटाने सुरक्षित केलं होतं.

**बहुभाषिक नगरी**

गुजराथी मंडळींची ही भाषा गुजरी. पण प्रत्यक्षात मात्र नंदुरबारच्या स्थानिक भाषेत अहिराणी, भिली, मराठी आणि गुजराथी आणि मध्य प्रदेशच्या सामीप्यामुळे आलेली हिंदी, या सर्व भाषांचा सहभाग आहे. आदिवासींच्या भिलोरी भाषेप्रमाणेच अहिराणी भाषेलाही वेगळी लिपी नाही, परंतु मराठी भाषेच्या तुलनेत आहिराणी भाषा मृदू आहे. भिलोरी भाषेत तर हे वैशिष्ट्य विशेषकरून जाणवतं. आदिवासींच्या भिलोरी भाषेतही पोटभाषा आहेत. सातपुड्यात डोंगरी भिली, तर नवापूर परिसरातील मावची, पावरा भिलांची पावरी इत्यादी बोलीभाषा आहेत.

**विविध जातींचे जनसमूह**

पूर्वीच्या आणि आताच्या नंदुरबार शहरात कुणा एकाच जातीचं वर्चस्व नव्हतं, आणि त्यातही उच्च जातींचं संख्याबल कमीच होतं. त्यामुळे आपापल्या जाती, पोटजातींची भाषा, संस्कृती टिकवून या अठरापगड जाती गुण्यागोविंदाने जगत होत्या.

वेगवेगळ्या धर्मांचा प्रभावही या शहरात जाणवतो. हिंदू, मुस्लिम, जैन, महानुभावी, कबीरपंथी अशा विविध धर्मनिष्ठा असणारे समाजगट इथे सहिष्णुवृत्तीने राहतात. अशाच प्रकारचं नातं हिंदू-मुस्लिम समाजगटातही होतं. नंदुरबार शहरातील काही वर्षांपूर्वीचं उदाहरण घ्यायचं, तर त्या वेळी नंदुरबारमध्ये नगरपालिकेची एकच माध्यमिक शाळा दर्ग्याजवळच होती. या शाळेमध्ये गुजराथी, मराठी आणि उर्दू या तिन्ही माध्यमाचे विद्यार्थी होते. एकाच शाळेत एकमेकांचं वेगळेपण गृहीत धरून ते एकत्र शिकत होते. आठवड्यातून एक दिवस शेवटच्या तासाला सुट्टी असायची. घंटी झाल्याबरोबर सर्व अठरापगड जातींची आणि जैन, मुस्लिम, हिंदुधर्माची मुले टेकडीवरील दर्ग्याकडे पळत सुटायची. एक शिक्षक साखर-फुटाणे घेऊन अगोदरच टेकडीवरील दर्ग्याशी पहिल्या येणाऱ्या पोरांचं स्वागत करायला तयार असायचे. पहिल्या काही मुलांना ओंजळीनं, मागून येणाऱ्या पोरांना मुठीमुठीनं दिलं जायचं. नंदुरबार गावाची प्रथाही हीच होती. दर्ग्याच्या दरवर्षी होणाऱ्या जत्रेला जाणाऱ्यात हिंदूंचा भरणा मोठा असायचा. गणपती उत्सवात हजेरी लावायला आणि मिरवणुकीसमोर लेझीम खेळायला मुस्लीमधर्मीय हजर होत असत. गणेशोत्सवातील ११५ वर्षांची परंपरा असलेली 'हरीहर भेट' केवळ दादा-बाबा गणपती यांच्या भेटींचा सोहळा नाही तर इथल्या आठरा पगड जाती-धर्मांच्या लोकांचा तो वार्षिक स्नेहमिलनाचा सोहळा बनलाय.

गेल्या दोन-तीन दशकांत जे देशात झालं त्याचं प्रतिबिंब इथेही उमटलं. आपापल्या धर्माशी निष्ठा असलेल्या समाजगटांत एकमेकांबद्दल द्वेष, अविश्वास आणि दूरत्व वाढत गेलं, तसं इथेही झालं आहे; परंतु तरीही ह्या धर्मनिष्ठेला कडवेपणाचा, तिरस्काराचा गडद रंग नाही.

शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढू लागल्यावर गुजराती लोकांचं श्रॉफ हायस्कूल आणि ब्राह्मण आणि सवर्ण जातींचं डी.आर. हायस्कूल, मुस्लिमांसाठी उर्दू अँग्लो हायस्कूल सुरू झालं. आदिवासी मुलांना शिक्षण देण्यासाठी आदिवासी समाज कार्यकर्ते जयंत नटावदकर, जनार्दन वळवी यांनी शाळा व आश्रमशाळा सुरू केल्या. आता त्यांचं मोठ्या शिक्षणसंस्थांत रूपांतर झालेलं आहे.

पुरातन काळापासून या भूमीत माणसाचं अस्तित्व होतं. प्रकाशा इथे इतिहासपूर्वकालीन आदिवासी माणसांचं अस्तित्व होतं असं दाखवणारे पुरावे उत्खननात सापडले आहेत. आर्यांच्या आगमनापूर्वीच आदिवासी या क्षेत्रात वास्तव्य करून होते, असे पुराणकालीन ग्रंथांतून उल्लेख सापडतात. स्वत: आदिवासी आपण राजस्थानकडून आल्याचं सांगतात.

**बहुसांस्कृतिक कोलाज**

नंदुरबार शहरातील अठरापगड जातींच्या वास्तव्यामुळे इथल्या संस्कृतीत वैविध्य आणि उर्वरित महाराष्ट्रापेक्षा असलेलं वेगळेपणही जाणवतं. लग्नाच्या

वेळी लाऊडस्पीकर्स लावून सभोवताल दणाणून सोडण्याची आधुनिक पद्धती इथे पोचली आहे. मुहूर्तवेळेच्या बाबतीत मात्र मध्यम व कनिष्ठ जातींचा आग्रह नसतो. आता तर मारुतीचं दर्शन घेऊन नाचणारी पोरं-पोरीच लग्नाची घटिका ठरवतात. लग्न समारंभात नाचणं हा अटळ असा कार्यक्रम असतो. इथे त्यात आणखीही एक स्थानिक वैशिष्ट्य आहे. हिंदी, गुजराथी वा मराठी पॉप्युलर गाणी स्पीकर्सवर लावली जातात, पण कॅसेट्सचा वा सीडीचा वापर करून नाही. बहुधा सुमार आवाजाच्या स्थानिक गायकाला वाद्यवृंदासह अशा कार्यक्रमाला आणलं जातं. ज्या गाण्यांच्या तालावर नाचता येतं अशी पॉप्युलर हिंदी व गरब्याची गुजराथी गाणी हे गायक म्हणतात. गाण्यामध्ये स्त्रीच्या आवाजातील ओळी गाण्यासाठी गायिका नसते. कोवळ्या आवाजाचा पुरुष बाईच्या आवाजात गाणी म्हणतो. हा प्रकार का लोकप्रिय आहे हे एक गूढच म्हणावं लागेल.

**लग्नाची गाणी**

लग्नाची गाणी परंपरागत चालत आलेली असतात हे खरं, परंतु तशा अर्थाने ही गाणी पाठ केलेली नसतात आणि उत्स्फूर्त काव्यरचनाही नसते. परंपरेने चालत आलेल्या गाण्याच्या टेम्प्लेट्स असतात. लहान मुलांना रंगवण्याकरता पुस्तकं असतात, त्यातील रेखाचित्रांप्रमाणे गाण्यांचे ढाचे तयार असतात. गाणारी बाई त्यात वर्तमान वास्तवाचे रंग भरत जाते. मग ओळखीच्या, नात्यातील व्यक्तींना टोमणे मारणं, जुन्या घडलेल्या घटनांच्या आधारे टिंगलटवाळी करणं, असे तपशील त्यात भरले जातात. रात्रीच्या निवांत वेळी तासन् तास ही मैफल चालू राहते.

आदिवासींमध्ये स्त्रियांना सामूहिकरीत्या गाणी म्हणण्याची उपजत आवड असते. गाण्याची जशी पद्धत तशीच नाचाचीही. आदिवासींच्या नाचात वापरले जाणारे ढोल चांगलेच वजनदार आणि मोठ्या आकाराचे असतात. हे ओझं गळ्यात घेऊन, एक चाळ वाजवत ढोलवाला सतत पावलं टाकत असतो. ढोलाचा आवाज आला की पोरं-पोरी हळूहळू भोवती जमा होतात. पोरं, गडीमाणसं आधी नाचायला लागतात, अन् मग तरुण मुली हळूच एकमेकांच्या पंजांत पंजे अडकवतात, खांद्याला खांदा भिडवून पावलं टाकू लागतात. मग प्रौढ स्त्रियाही पुढे होतात. ढोलवाला, बासरीवाला,







झांजवाला हा वाद्यवृंद मधे आणि भोवती पुढेमागे आणि रिंगणात गोलाकारात सरकणारे मुला-मुलींचे लहान लहान गट. पुण्या-मुंबईसारखं या नाचांना धंदेवाईक रूप अजून तरी आलेलं नाही. गरब्याप्रमाणेच संक्रातीला पतंग उडवण्याचं वेड गुजरातमधून इथं पोचलेलंच आहे.

**खाद्यसंस्कृती**

शहरातील लोकांच्या रोजच्या जेवणात मुख्य पदार्थ म्हणजे ज्वारीची किंवा बाजरीची भाकर आणि भरपूर शेंगदाणा वापरलेली चटणी. चटणी बनवण्याच्या पद्धतीत भरपूर तेल आणि मुबलक तिखट यांचा वापर. मात्र कुठलाही समाज असो, पाहुणे आले की खिचडी पाहिजेच. सोबत पापड, कुरडया, सांडगे यासारखे तळणाचे पदार्थ असायलाच हवेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीला गल्लोगल्लीत उन्हात खाटलं तिरकं ठेवून त्यावर शेवया बनवणाऱ्या स्त्रिया नजरेत येतात. सणासुदीला पुरणपोळ्या, मांडे असणारच. अगदी मुस्लिमांमध्येही मटणाच्या रश्श्याबरोबर मांडे खाण्याची पद्धत आहे. गुजरात जवळ असल्यामुळे आणि स्थानिक पातळीवर तूर, मूग, हरभरा यांचं उत्पादन असल्याने स्वयंपाकात बेसनाचा उपयोग भरपूर प्रमाणात केला जातो. इथल्या हॉटेलांत गेलात तरी सकाळच्या नाष्ट्याला लोक शेव-खमणी (खमण ढोकळा) खाताना दिसतात. याशिवाय इथला खास पदार्थ म्हणजे भजीपात्रा. पात्रा म्हणजे आळूची पानं वा अळूच्या वड्या. मात्र नंदुरबारातील अळूच्या वड्या कडक तळलेल्या असतात, त्यामुळे त्या भरपूर टिकतातही. सामिष खाणारे लोक बकरं वा बोकड खाण्याऐवजी कोंबडी खाणंच जास्त पसंत करतात.

**मातृसत्ताक संस्कृती**

आदिवासींची वेषभूषा वैशिष्ट्यपूर्ण आहे. पुरुषांचे वेष खास वेगळे नसले, तरी पुरुषांनी दागिने घालणं हे समाजमान्य आहे. भिल्ल समाजातील स्त्रिया बहुधा साडीचे दोन तुकडे करून कमरेच्या खाली एक व वर डोके व छाती झाकण्याकरता एक अशी वेगवेगळ्या रंगांची वस्त्रं वापरतात. पावरा स्त्रियांच्या पायात, कानात, गळ्यात वापरले जाणारे दागिने बहुधा चांदीचे असतात. आदिवासीच्या घरामागे वाडी (किचन गार्डन) पहायला मिळते. इथे मका, लिंबू यासारखी झुडपं आणि वेगवेगळ्या शेंगांचे वेल लावले जातात, परंतु फुलांची झाडं क्वचितच दिसतात. आदिवासींत स्त्री-पुरुषातील नातं सवर्ण जातीतील या नात्यापेक्षा अधिक समान आहे. गुजर समाजातही कुटुंबात स्त्रीला खास अधिकार परंपरेने दिले आहेत. शेतातील धान्य एकदा खळ्यातून घरी आलं की त्याची कशी विल्हेवाट लावायची यावर घरातील प्रमुख स्त्रीचा अधिकार असतो. घरातील प्रमुख स्त्री कित्येकदा आपल्या लग्न झालेल्या मुलीकडे आपल्या मुलांपेक्षा जास्त झुकतं माप देते. मात्र इथे एक वेगळी परंपराही आहे. सासूनंतर घरातील मोठी सून धाकट्या जावांवर अधिकार गाजवते. त्यामुळे कुटुंबातील धाकट्या भावाला मुलगी मिळणं जरा कठीणच होतं. पण एकूणच मध्यम व अठरा-पगड जातींत स्त्रियांना पुरेसं महत्त्व आणि अधिकार परंपरेने दिले असतात. श्रावणातील कानुबाईचा उत्सव हा इथल्या मातृसत्ताक संस्कृतीची परंपरा अधोरेखित करणारा आहे.

**बदललेला चेहरामोहरा**

७ जुलै १९९८ रोजी नंदुरबार स्वतंत्र जिल्हा घोषित झाल्यापासून नंदुरबार शहराचं

रूप बदलत आहे. नागरी रुग्णालय, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसीलदार ऑफिस, पोलीस कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा न्यायालय, आदिवासी प्रकल्प कार्यालय, जिल्हा कारागृह यांच्या नवनव्या इमारती तिथे उभ्या राहिल्या आहेत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचं एकलव्य प्रशिक्षण उपकेंद्र,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय कृषी महाविद्यालय सुरू झालंय. शहरापासून जवळच असलेल्या बीजगुणन केंद्राची शंभर एकर जागाही त्यासाठी वर्ग करण्यात आली आहे. विधी महाविद्यालय व संशोधन केंद्र, पुढील शैक्षणिक वर्षापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयही सुरू होतंय. नगर परिषदेमुळे नवं नाट्यगृहही उभं राहिलं आहे. रस्ते रुंदावले आहेत. उड्डाणपुलांमुळे शहर आणि विकासाची गतीही वाढतेय. चौकांत पुतळे उभे करून सुशोभित केले गेले आहेत. पाणीपुरवठा योजना, जलशुद्धिकरण प्रकल्प, भूमिगत गटारे, रस्ते प्रकल्प, घरकूल योजना, ट्रक टर्मिनल, अद्ययावत अग्निशमन केंद्र, शासकीय ग्रंथालय, ग्राहक तक्रार निवारण मंचाची प्रशस्त इमारत, नगरपालिकेची वातानुकूलित व्यायामशाळा, क्रीडासंकूल झाले आहे. या सर्वांच्या सौंदर्याला नव्या बसस्थानामुळे रूपेरी किनार लाभली आहे. जनता अपघात विमा यासारख्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शहराचा चेहरामोहरा बदलला आहे. एकीकडे असे भौतिक बदल होत असताना वाढत्या लोकसंख्येमुळे, आधुनिक जीवनप्रणालीच्या प्रसारामुळे निर्माण होत असलेल्या वाढत्या गरजा पुऱ्या करण्यासाठी नोकऱ्यांची स्पर्धा व ताणतणाव निर्माण होऊ लागले आहेत. वाढत्या अपेक्षा, महत्त्वाकांक्षा आणि स्पर्धा यांच्या वाढत्या दबावामुळे नैराश्य वाढतं आहे.

यशवंतराव चव्हाण क्रीडा व व्यापारी संकूल



जिल्हा व सत्र न्यायालय, नवीन इमारत



मंगळवारच्या भल्या पहाटे नंदुरबार शहराच्या आसपासच्या गावातले शेतकरी, शेतमजूर कुटुंबे आपली गाठोडी बैलगाडीवर लादायची आणि नंदुरबारच्या मंगळबाजारात पोहचायची. बैलगाडीच्या मागे बाजारात विक्रीसाठीची गुरे-ढोरे बांधलेली असायची. एका डालक्यात कोंबड्या, दुसऱ्या डालक्यात पिढात बांधलेली गावरान कोंबडीची डझनभर अंडी, सोबतीला चुलीवर खमंग भाजलेल्या ज्वारी आणि बाजरीच्या भाकरीचं पुडकं. पुडक्यातल्या बरोबर मधल्या भाकरीवर नंदुरबारच्या फापडा मिरचीचा शेंगदाणे घातलेला ठेचा असायचा. शेवटच्या भाकरीवर मुगाचं पिठलं. न्याहरी आटोपली की, गाठोड्यातल्या गावरानी मिरची, कांदा, बटाटा, लिंबू, अद्रक, मोहरी, पालेभाज्या, कडधान्ये आणि घरी बनवलेलं तूप यांची विक्री दुपारपर्यंत करायची. भाव-ताव या गोष्टीला काही महत्त्वच नव्हते. उरलेला माल प्रत्येक कुटुंबाच्या ठरलेल्या व्यापाऱ्यांच्या दारात नेऊन दिला जायचा. हे व्यापारी म्हणजे गावातले बारा बलुतेदार. त्या मोबदल्यात त्यांच्याकडे असलेल्या जिन्नसा ते व्यापारी द्यायचे. त्यात कपडे, किराणा, तेल, चपला, शेताची अवजारे, पशुखाद्य, बैलांचे बाशिंग, घराला पुरेल एवढा खाऊ आणि सगळ्यात शेवटी पाटीदप्तर असायचं. हे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यावर गाड्या पुन्हा गावाकडे मार्गस्थ व्हायच्या.

यात शेतकरी आणि ग्राहक दोघेही मिळेल त्यात समाधानी असायचे. अगदी कालपर्यंत बलुतेदारांची काही घराणी या वस्तुविनिमयाच्या बाजारप्रणालीवर व्यवहार करत होती. आज हे सारं बदललंय. बैलगाड्यांची जागा आता चारचाकी छोटा हत्ती, डुक्कर गाड्यांनी घेतलीय. बाजाराचा दिवस मंगळवार असला तरी त्याची फारशी बंधने राहिली नाहीत. गावागावात, घराघरात मोबाइलने अशी जादू केलीय की, घरबसल्या बाजारभाव कळतात. बाजार ज्या दिवशी तेजीत असेल त्याच दिवशी माल बाजारात आणला जातो. पूर्वी फायदा, तोटा या गोष्टीला महत्त्व नव्हते. गावरानीचा जमाना गेला सारं काही संकरित झालंय. डझनावर मिळणारी अंडी आता पोल्ट्रीफार्ममधून शेकड्यांनी बाजारात मिळू लागली. उत्पन्नात भरघोस वाढ झालीय. वस्तूंच्या मोबदल्यात वस्तूंची जागा आता रुपयाने घेतलीय. आदिवासींच्या हातात पैसा खेळू लागलाय. सराफ बाजारातल्या दुकानातली चढ्या भावातली 'चांदी' तेजीत विकली जातेय. सुरत मार्केटचे प्रतिबिंब आजच्या मंगळबाजारात स्पष्ट दिसू लागलेय. घरच्या भाकरी बांधून बाजारात खायचे दिवस इतिहासजमा झालेत. बाजारातल्या खानावळीत वेटिंगला बसून खायचे दिवस आज सुरू झाले आहेत. बाजारात आलेला पहिल्यांदा पाटीदप्तर आणि शाळेला लागणाऱ्या पोरांच्या वस्तू घेतो, खाऊ घेतो आणि मग इतर वस्तूंच्या खरेदीकडे तो वळतो. सारं काही बदललेलं आहे. इथल्या लोकगीतातल्या शब्दांत सांगायचे झालेच तर...

जुमना-जुमना गावमा रे
नवली-नवली हवा रे....!

**संपर्क : ९४२२७८५५५५**



जुलै महिन्याच्या अंकामध्ये पान १६ वर आक्षी येथील शिलालेखाचा काळ १९२१ असा अनवधानाने आला असून, तो ११२१ असा आहे.

भ्रमंती


# अनुभूतीची प्रदक्षिणा

## नाशिक

प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेले, जनस्थान, पद्मपूर, त्रिकंटक, गुलशनाबाद इ. नावांनी प्रसिध्द असलेले रुद्राक्षभूमीकडून द्राक्षभूमीकडे, मंत्रभूमीकडून यंत्रभूमीकडे आणि पंचवटीपासून पेंटीयमकडे प्रवास करणारे, पंचवटी, तपोवन, काळाराम मंदीर, कुंभमेळा, रामकुंड, भक्तीधाम, मुक्तीधाम, सोमेश्वर, त्र्यंबकेश्वर, वणी, आल्हेर, मुल्हेर, मांगीतुंगी, अंकाई, टंकाई, चांदवड, धोडंबे, गाळणा, मालेगाव हे किल्ले असणारे, स्वातंत्र्यवीर सावरकर, परमामृत टीका लिहिणारे केशरबाबा कलंत्री, स्वातंत्र्यकवी गोविंद, रेव्ह. नारायण वामन टिळक व साहित्यलक्ष्मी लक्ष्मीबाई टिळक, पं. विष्णू दिगंबर पलुस्कर आणि चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके, ज्ञानपीठ विजेते तात्यासाहेब शिरवाडकर, वसंत कानेटकर, प्रभाकर वैद्य, माधव मनोहर, अ.वा.वर्टी विमादी पटवर्धन, काकासाहेब वाघ, दादासाहेब गायकवाड, शांताबाई दाणी, डॉ. गुप्ते, लोककवी वामनदादा कर्डक, शांतारामबापू वावरे, वेलमास्तर, शाहिर प्रताप परदेशी, वीर बापुराव गायधनी व दादासाहेब काळे यांची कर्मभूमी आणि कर्तृत्वभूमी असणारे, ग्रामदेवता

**अध्यात्मशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर पूर्व म्हणजे सुरुवात, पश्चिम म्हणजे परिपक्वता, दक्षिण म्हणजे पूर्णत्व आणि उत्तर म्हणजे साक्षात्कार असा दिशांचा अर्थ सांगितलेला आहे. यादृष्टीने उत्तर महाराष्ट्राचा ऐतिहासिक व पौराणिक धांडोळा घेणे म्हणजे एकप्रकारे साक्षात्कार दर्शनच ठरणार आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक-नगर-धुळे-जळगांव व नंदुरबार या पाच जिल्हयांचा समावेश होतो. त्यांचे ऐतिहासिक व पौराणिक दर्शन घेण्यासाठी साधनमार्ग म्हणजे येथील नद्या, किल्ले आणि मंदिरमार्गाची प्रदक्षिणा करणे होय!**

भूषण देशमुख





काळाराम मंदिर



नारोशंकर मंदिर



सप्तश्रृंगी देवी मंदिर



मुक्तिधाम

कालिका, भद्रकाली, सांडव्यावरची देवी, काळभैरव, एकमुखी दत्त, कमालेश्वर, काळाराम, गोराराम, सुंदरनारायण, प्राचीन गोदावरी मंदिर, भटजीबुवा आणि अजगर बुवांसारख्या सात संजीवन समाध्या असणारे, श्रीसंत गाडगेबाबांच्या चरणधुळीचे चंदन अभिमानाने माथ्यावर मिरवणारे, अशी नाशिकची राज्यात आणि देशात ओळख आहे. सिन्नरचे हेमाडपंती गौदेश्वर मंदिर, महागणपती व भैरवनाथ महाराज, मालेगांवचा भुईकोट किल्ला प्रसिद्ध आहे. येवला हे स्थान तात्या टोपे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्वामी मुक्तानंद यांच्यामुळे पावन झाले आहे. गंगापूर जलालपूर-गोवर्धन येथे आनंदीबाईचे वास्तव्य होते. त्र्यंबकेश्वर कुंभमेळा, नाथमंथाची अनुपानशिला आणि संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथांच्या वास्तव्यासाठी प्रसिद्ध आहे! चांदवडची रेणुका, इगतपुरीची घाटनदेवी, कळसुबाई, रामशेज, सिन्नरचे गारगोटी संग्रहालय, देवळालीचा तोफखाना, अंजनेरीचा परिसर, तळेगावचे नाणे संशोधन केंद्र, पांडवलेणी, चांभारलेणी, फाळके स्मारक, बौद्ध स्मारक, नक्षत्रवन कावनईचे कपिलधारा, टाकेदतीर्थ, सार्वजनिक वाचनालय, अभिनव भारत मंदिर, रामनाम आधार आश्रम, भारत प्रतिभूमी मुद्रणालय, ओझर मिंग, गाडगे महाराज धर्मशाळा, मेरीचे अभियांत्रिकी संशोधन केंद्र, धर्मवीर डॉ. मुंजेचे भोसला मिलिटरी, इगतपुरीचे विपश्यना केंद्र, धम्मगिरी, नांदुर मध्यमेश्वरचे पक्षी अभयारण्य, आरोग्यविज्ञान विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, भाऊ नावरेकरांचे निर्मल ग्रामनिर्माण केंद्र, समर्थ रामदासांचे टाकळी, गुरुगंगेश्वर वेदमंदिर, श्रीसंत जनार्दन स्वामी मंदिर, प्राचीन मुरलीधर मंदिर यांनी नाशिकला वैभवशाली बनवले आहे. रानवडचे भवानी मंदिर, म्हाळसाकोरेचे शिवमंदिर, ओझरंचे भुयारेश्वर मंदिर, खडक माळेगावचे शितलेश्वर, नांदुर मध्यमेश्वरचे सहस्त्रतीर्थ, कोठुरेचे बाणेश्वर, चांदोरीचे ज्योतिर्लिंग व पंचमानी मंदिर, दारणासांगतीचे जगदंबा मंदिर, टाहाकारीचे जगदंबा मंदिर, खेडेचे हिंगलाज माता मंदिर, सुकेणेचे दाऊदवली महाराज, सुकेणे येथील दत्तमंदिर व श्रीचक्रधर स्वामींची आदित्याची गढी, निफाडचे सती मंदिर, लासलगावचे भगरीबाबा, दिंडोरीचे मदुरा प्रसाद महेशानंदबाबा, मांगीरबाबा, पीरबाबा, माकडबाबा, आणि अंजनेरीसारख्या छोट्याशा गावात सोळा प्रचंड मंदिरांचा समूह अशी समृद्ध ऐतिहासिक व पौराणिक परंपरा नाशिकला लाभली आहे.

## अहमदनगर

कानामात्रा वेलांटी उकार नसलेले, सरळ अक्षरांचे, सहकारी चळवळीचे गाव! अहमदनगर ही निजामशाहीची राजधानी होती. १९४२ च्या लढ्यात पं. नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद या राष्ट्रीय नेत्यांना येथील भुईकोट किल्ल्यातील कारागृहात बंदिस्त करून ठेवले होते. याच कारागृहात पं.नेहरूंनी डिस्कव्हरी ऑफ इंडिया हा ग्रंथ लिहिला. नगर येथील ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय, उजव्या सोंडेचा गणपती मंदिर, दत्तमंदिर, चांदबिबीचा महाल, रणगाडे संग्रहालय प्रसिद्ध आहे. भंडरदरा हे प्रवरा नदीवरील मोठे धरण, कळसुबाईचे शिखर व बालेश्वर टेकडी, रत्नगडाच्या पायथ्याशी रत्नेश्वराचे प्राचीन मंदिर, अकोले येथील श्री अगस्तीऋषींचा आश्रम प्रसिध्द आहे. शिर्डी ही श्रीसंत साईबाबांची पावनभूमी आहे. साकोरी येथे ब्रम्हलीन श्री उपासनी महाराज आश्रम आहे. कोपरगाव बेट हे श्रीसंत जनार्दन स्वामी आश्रम, शुक्राचार्य व कच मंदिर प्रसिध्द आहे. पुणतांबे येथे संतचांगदेवांची समाधी आहे. प्रवरानगर येथे प्रवरा-गोदावरी संगमावर संगमेश्वर, गौतमेश्वर आणि घाटेश्वर अशी महादेवाची प्रसिद्ध मंदिरे आहेत. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटलांनी येथे आशियातील पहिला साखर कारखाना काढला. प्रवरेच्या काठी नेवासे येथे मोहिनीराज पुरातन मंदिर आहे. श्रीसंत ज्ञानेश्वरांनी ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी लिहिली तो 'पैस' खांब नेवासे येथेच आहे ! देवगड येथे दत्तस्थान आहे. सोनई येथे श्रीरेणुका दरबार, श्रीदुर्गाकाच मंदिर आहे... पारनेर ही सेनापती बापट यांची जन्मभूमी तसेच पूर्णवाद तत्त्वज्ञानाचे प्रणेते पारनेरकर महाराजांची ही पावन भूमी ! येथेच पराशर ऋषींची समाधी आहे. गर्भगिरी डोंगररांगेत मांजरसुंबा गावाजवळ गोरक्षनाथ गड आहे. पाथर्डी तालुक्यातील वृद्धेश्वर किंवा म्हातारबाबा हे नाथसंप्रदायाचे आद्यपीठ आहे. श्रीशनी शिंगणापूर हे शनिमहाराजांचे जागृत देवस्थान आहे. राहुरी गावात सखाराम



फराहबाग



ज्ञानेश्वर मंदिर, नेवासे

मानवाचे वास्तव्य होते. १८६९ मध्ये अहमदनगर, नाशिक आणि सोलापूर हे तीनही जिल्हे एकत्र होते.

अहमदनगर ही अनेक महापुरुषांची भूमी आहे. भारद्वाज या टोपण नावाने लिहिणारे श्री. शिवरामबुवा भारदे, रावसाहेब देशमुख, कोपरगावच्या लावणी सम्राज्ञी सुंदराबाई आणि कौशल्याबाई, वृद्धेश्वराचे नाथपंथी श्रीशंकर महाराज, सरदार मिरीकर, तिसगावचे दिनकर स्वामी, श्रीगोंदयाचे श्रीशेख महंमद, अरणगावचे अवतार मेहेरबाबा, शिर्डीचे साईबाबा, साकोरीचे श्री उपासनी महाराज व श्रीगोदावरी माता, ताहाराबादचे महिपतीबुवा, नगरचे संत दासगणू महाराज आणि ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीची जन्मभूमी श्रीक्षेत्र नेवासे म्हणजे नगर जिल्ह्याच्या आकाशातील प्रकाशमान स्वयंभू सूर्यच आहेत !

महाराजांची समाधी आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ देशात प्रसिध्द आहे. शिंदीचे राळेगण या नावाने पूर्वी ओळखले जाणारे आताचे राळेगणसिद्ध म्हणजे समाजसेवक अण्णा हजारे यांचे गाव व भीमा नदीतीरावर पेडगावला बहादूर गडकिल्ला आहे. येथेच छत्रपती श्रीसंभाजी महाराजांचा मोगलांनी छळ केला होता. राशीन येथे रेणुकास्वरूप यमाई व तुकाई मातेचे वास्तव्य आहे. येथील दीपमाळ हलती आहे. येथून जवळच दरगाव येथे प्राचीन एकमेव असे दुर्योधनाचे मंदिर आहे. खर्डी येथील भुईकोट किल्ला प्रसिध्द आहे. इ. स. १७९५ मध्ये मराठे व निजाम यांच्या लढाईत मराठे विजयी झाले होते. कर्जत तालुक्यात सिदद्धटेक हे सिद्धिविनायकाचे स्थान अष्टविनायकांपैकी एक आहे. नगर दौंड मार्गावरील अरणगाव ही अवतार मेहेरबाबा यांच्या ऊर्जेने भारलेली भूमी आहे. मेहेराबाद येथे त्यांची समाधी आहे. अकोले तालुक्यात हरिश्चंद्रगड किल्ला आहे. श्रीगोंदा याठिकाणी श्रीशेख महमंदाचे वास्तव्य होते. श्रीशेख महंमद या संतकवीला हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक समजले जाते. जोर्वे या ठिकाणी झालेल्या उत्खननातून दिसून आले आहे की इ.स.पू. १५०० वर्षापूर्वी प्रवरा आणि गोदेकाठी

## जळगाव


संत मुक्ताबाई, कवयित्री बहिणाबाई, केशवसुत, सानेगुरुजी, बालकवी, ना. धों. महानोर यांच्यामुळे प्रसिद्ध असलेला जळगाव जिल्हा! पूर्वीचे नाव ऋषिक त्यानंतर पूर्व खानदेश !

जळगाव हे जिल्ह्याचे स्थान आहे. १६३७ च्या पढतिभूषण या रुद्रभटाच्या ग्रंथात जळगावचा उल्लेख दिसतो. मेहरुण येथील नैसर्गिक तलावामुळे यास जलग्राम असे नाव मिळाले. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि चोख सोन्याची बाजारपेठ असलेले जळगाव म्हणजे वेरुळ अजिंठाचे प्रवेशद्वार समजले जाते. चाळीसगाव तालुक्यातील पाटणादेवी येथे उत्खननामध्ये अश्मयुगीन वसाहत आढळली आहे. पाटणे परिसरात बौद्धलेणी व यादवकालीन मंदिरे आहेत. देवी मंदिरात इ.स.१२०७ चा शिलालेख आहे. यादवांचा मांडलिक निकुंभ घराण्याचा राजा येथे राज्य करीत होता. पाटणे ही निकुंभांची राजधानी निकुंभांच्या किल्ल्यास बिज्जलगड असे नाव होते.

अमळनेर येथे प्रतापशेठ यांनी तत्त्वज्ञान मंदिर स्थापन केले. सानेगुरुजी प्रताप कॉलेजमध्ये होते. केशवसुतांचे फैजपूर-भडगाव येथे वास्तव्य होते. फैजपूरला काँग्रेस महाअधिवेशन भरले होते. अमळनेर हे कापड उद्योग व तंबाखू उद्योगासाठी प्रसिध्द आहे. गावातील पेशवेकालीन महादेव मंदिर प्रेक्षणीय आहे. वेशीतील मांगिरबाबा नवसाला पावणारा आहे. तीर्थकुंड, राममंदिर, जैनमंदिर व सखाराम महाराजांची समाधी प्रसिध्द आहे. १९१६ मध्ये सखाराम महाराजांनी विठ्ठल मंदिर बांधले. चाळीसगाव हे छत्रपती शाहूंनी सेनापती धनाजी जाधव यांना जहागिरी म्हणून दिलेले जनार्दन स्वामीचे जन्मगाव. केकी मूस यांनी ६० वर्षे स्टेशनजवळच्या बंगल्यात वास्तव्य केले. टेबलटॉप छायाचित्रणात आंतरराष्ट्रीय स्तरावर चाळीसगावचे नाव त्यांनी नेले. अनिलदादा देशमुखांच्या घराण्यावर कृपादृष्टी असलेले मुसा कादरी यांचा संदल म्हणजे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक आहे. तर रामदेवबाबा, इच्छादेवी, वालझिरी येथील वाल्मिक ऋषीचे स्थान प्रसिद्ध आहे. एदलबाद तालुक्यात आताचे (मुक्ताईनगर) चांगदेव हे गाव तापी पूर्णा संगमावरील चांगदेव मंदिरामुळे प्रसिद्ध आहे. येथील शिवमंदिर राजा गोविंद याने



अहमदनगर किल्ला



उनपदेव गरम पाण्याचा झरा

अकराव्या शतकात बांधले. इ. स. १३२५मध्ये येथे चांगदेवांनी समाधी घेतली. चोपडा ही मोगलकालीन प्रसिद्ध बाजारपेठ होती. चार डोंगरात वसलेले म्हणून चोपडा या नावाने प्रसिद्ध असलेल्या या ठिकाणी १७०२ मध्ये येथेच तुकानाथ सोळंकी यांनी तापी माहात्म्य हा ग्रंथ लिहिला. उनपदेव व सुनपदेव येथील गरम पाण्याचे झरे प्रसिद्ध आहेत. पद्मालयचा गणपती, भीम-बकासूर युद्धस्थळ आणि फरकांडेचे झुलते मनोरे प्रसिद्ध आहेत. अश्वत्थाम्याबद्दलच्या असंख्य दंतकथांनी हा परिसर समृध्द आहे. सातपुडा भागात अनेर नदीच्या काठी राणी काजलगुंफा उभराटी या ठिकाणी आहे. आदिवासी बांधवांचे हे श्रध्दास्थान अतिप्राचीन आहे. चोपड्यांच्या जवळच चहार्डी या गावी आठव्या शतकातील राष्ट्रकूटकालीन धातुमूर्ती सापडल्या आहेत. राष्ट्रकूट काळात चहार्डी हे जैनांचे मोठे वसतिस्थान होते. रावेर तालुक्यातील कळमोदे हे गाव यादवकालीन विहिरीसाठी प्रसिद्ध आहे. येथील किल्लाही प्रसिद्ध आहे. धरणगाव हे कापसासाठी प्रसिद्ध असल्याचा उल्लेख ऐन-ए-अकबरीत आहे. मुक्ताईनगरला संत मुक्ताबाईचे समाधिस्थान आहे. पाटणे येथील उत्खननात अश्मयुगीन मानवाचे अवशेष सापडले आहेत. शहामृगाच्या अंड्याच्या कवचावरील नक्षीकाम अद्भुत आहे. ताम्रपाषाण युगात जळगाव जिल्हा वाकाटकांच्या ताब्यात होता. वाकाटकांनंतर कलचुरींची सत्ता आली. मौर्य गोविंद राजचा शिलालेख पाटणे परिसरात सापडला त्यात सोमदेव व हेमाद्रीदेव यांनी भास्कराचार्यांचे नातू चांगदेव यांना दान दिल्याचा उल्लेख आढळतो. इ.स.१६०० मध्ये जळगाव मोगलांच्या ताब्यात होते. शिवरायांनी औरंगजेबाच्या राजवटीत दोनवेळा धरणगाव बाजारपेठ लुटली. १७१३ नंतर निजाम उल-मुल्कच्या राज्यात जळगावचा समावेश झाला. १७५२ मध्ये पेशवे व निजाम यांच्यात भालकीचा तह झाला. १८१८ नंतर इंग्रज अंमल सुरू झाला. १८६० नंतर खान्देश सुभ्याची पुनर्रचना झाली. १९०६ मध्ये जळगाव जिल्हा निर्माण झाला. अहिराणी ही या जिल्हयाची मातृभाषा आहे. गिअर्सनने अहिराणीच्या उपभाषा म्हणून पाचोरी, डांगी, शिंदखेडी, नंदुरबारी असे उल्लेख केले आहेत. लाड शिक्की, रंगारी, भावसारी, गुजराड्, भिलोरी, पावरी, तडवी, मावची, नेमाडी या उपबोली आहेत.

## धुळे

धुळे जिल्हा म्हणजे १९६० पूर्वीचा पश्चिम खानदेश. इतिहासाचार्य राजवाडे संशोधन मंदिर आणि आचार्य विनोबा भावे यांच्या स्थानबध्दतेच्या काळात 'गीताई' निर्मितीमुळे व बुवासाहेब श्रीपद्मनाभस्वामी यांचेमुळे संपूर्ण देशात धुळे प्रसिद्ध आहे.

धुळ्याची ग्रामदेवता म्हणजे पांझरा नदीकाठी असलेली एकवीरा माता. हे यादवकालीन मंदिर आहे. १९१० च्या प्लेगच्या साथीत संपूर्ण गाव उजाड झाले होते. जुने धुळे वगळता इतर भाग १९२० नंतर पुनर्रचित करण्यात आला आहे. पुरातत्त्व विभागाच्या संशोधनामुळे धुळे जिल्ह्याचा प्राचीन इतिहास उलगडला आहे. सावळदा, उन्नर हडप्पा, माळवा-जोर्वे या संस्कृतीच्या वसाहती येथे सापडल्या आहेत. सातवाहनानंतर अभीरांनी या भागावर राज्य केले.१७२३ ते १७५२ पर्यंत मोगलांचा अंमल होता. निजाम उल-मुल्कचा मुलगा सलाबतजंगचा मराठ्यांनी भालकीच्या लढाईत पराभव केला. १७५२ ते १८१८ पर्यंत खानदेशवर भगवा फडकत होता. १८०३ मध्ये दुष्काळाने धुळ्याची दुर्दशा केली. मराठी शासक प्रतिनिधी बाळाजी बळवंत यांनी देवपूरची गढी बसविली. गणेशपेठ वसवली सोनगीर- लळींगवर नियंत्रण ठेवण्यासाठी धुळे मुख्यालय ठेवले. १८१९ पासून ब्रिटिश सभेत कॅप्टन ब्रीग्जने धुळे हेच मुख्यालय केले. जुने धुळे, देवपूर व मोगलाई हे शहराचे तीन भाग होते. कॅप्टन ब्रीग्जने समांतर गल्ल्या निर्माण करून नियोजनबद्ध आखीवरेखीव शहराची निर्मिती केली. १५ ऑगस्ट १९०० रोजी चाळीसगाव-धुळे रेल्वे सुरू झाली. अहिराणी ही येथील स्थानिक भाषा आहे. साक्री हे कान नदीकाठचे तालुक्याचे गाव. बागलाणचे राजघराणे बागुल यांनी आमली गावात कन्हैयालाल नावाचे विष्णू मंदिर बांधले. बलसाणे गावात यादवकालीन शिलालेख असून चार मंदिरे आहेत. भामेर या गावी यादवकालीन गुंफा व किल्ला आहे. शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा गावात मराठाकालीन मंदिरे आहेत. भोगावती नदीवर गोपाळकृष्णाचे मंदिर प्रसिद्ध आहे. मेथी गावातील मंदिरे, मुडावद येथील अहिल्यादेवींनी बांधलेले कपिलेश्वर मंदिर व पाटण येथील आशापुरीमाता मंदिर प्रसिद्ध आहे. अरुणावती नदीकाठावरील शिरपूर येथील बालाजी मंदिर व अधांतरी पार्श्वनाथ भगवान प्रसिद्ध आहे. ही मूर्ती अधांतरी आहे. अहल्यापूर गावात पायविहिरीत अहिल्याबाईची प्रतिमा आहे. तसेच अतिप्राचीन खंडेराव मंदिर आहे.



राजवाडे संशोधन मंडळ



तोरणमाळ

## नंदुरबार

१९९८ मध्ये धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन नंदुरबार जिल्हा निर्माण झाला. स्वातंत्र्य लढ्यातील शिरीषकुमार मेहताच्या आत्मसमर्पणाने नंदुरबार हे राष्ट्रभक्तीचे पर्यायी नाम म्हणून देशात प्रसिद्ध झाले आहे. नंदुरबार जिल्ह्यात अस्तंबा व तोरणमाळ ही उंच शिखरे आहेत. नंदुरबार शहरातील शिरीषकुमार स्मारक, दंडपाणेश्वर उद्यान प्रेक्षणीय आहे. दरा आणि वीरपूर येथे गरम पाण्याचे झरे आहेत. गोमती नदीकिनारी दरा गावी नदीपात्रातील खडकावर जैनलेणी कोरलेली आहेत. सारंगखेडे येथील दत्तमंदिर प्रसिद्ध आहे. दत्तजयंतीला भरणारी घोड्यांची यात्रा प्रसिद्ध आहे. नंदगवळी राजामुळे नंदुरबार हे नाव मिळाले आहे. इ.स.पू. ३०० पासूनच्या ताम्रपाषाण युगाचा इतिहास नंदुरबारला आहे. मौर्य साम्राज्यानंतर सातवाहन. नंतर आभीरांचे राज्य. नंतर वाकाटक घराण्यातील कुंभकर्ण नावाचे राजघराणे. त्यानंतर कलचुरी त्यानंतर चालुक्य. त्यानंतर इ.स.८ ते १० या शतकात राष्ट्रकूट राजवट येथे होती. १३७० मध्ये तुघलक सरदार मलिकराज फारुकी यांनी बहामनीविरुद्ध लढा देऊन धुळे जिल्ह्याचा संपूर्ण प्रदेश जिंकला. थाळनेर ही त्याची राजधानी होती. आजही तेथे त्याचे अवशेष आहेत. दक्षिणकाशी म्हणून प्रसिद्ध असलेले तापी व गोमती संगमावरील प्रकाशे परिसरात उत्खननात सावळदे संस्कृतीचे अवशेष आढळले आहेत. सुलतानपूर गढीत अनेक जैनमूर्ती सापडल्या आहेत. धडगाव तालुक्यातील तोरणमाळ हे ब्रिटिश काळापासून थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. येथील यशवंत तलाव, सिताखाई दरी व गोरक्षनाथ गुंफा प्रसिद्ध आहे. १८५७ नंतर इंग्रजांशी लढा देऊन काजीसिंग, भागोजी नाईक यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले होते.

नाशिक-नंदुरबार-धुळे-जळगाव सर्व जिल्हे एका आंतरिक धाग्याने जोडले गेले आहेत. पितळखोऱ्याची बौध्द लेणी, महानुभाव मठ, आदिवासींच्या वनदेवता, यहामागी माताउत्सव, रासलीला, कानबाई, अंवरसिंग महाराज, गुलाब महाराज, शंकर महाराज, नारायणबुवा, भगरीबाबा, बुवासाहेब, पद्मनाथ स्वामी, सोनगीरकर महाराज, नशिराबादचे झिपरु अण्णा, जैन, बौध्द, महानुभाव, वारकरी आनंद, मुस्लीम, वैष्णव धर्मपंथांनी गुण्यागोविंदाने नांदणारी संस्कृती. शिरपूरच्या बाबा कवर टेकडीवरील जैनमूर्ती, बडवानीची बावनगज मूर्ती, शिरपूरची अधांतरी पार्श्वनाथमूर्ती असे कितीतरी दीपस्तंभ या जिल्ह्यात आहेत.

## मातृदेवता नमोःस्तुते



कानबाई, रानबाई, गौराई, गुलाबाई, सप्तशृंगी, साती आसरा, पांढरीमाय, मरीमाता, शीतलामाता, वडजखीन, सटवाई, पाटणादेवी, मंदाणेची अष्टभुजादेवी, म्हसदीची धनदाई, वणीची सप्तशृंगी, नाशिकची भद्रकाली, यावलची सातपुडा निवासिनी मनुदेवी, कोकले येथील नागाई, पाटणची आशापुरामाता, इंदवेची इंदाईमाता, चिमठाणेची पेडकाई माता, झिरणीपाडा येथील धनाई-पुनाई, नगाव अमळनेरची इंदासनी माता, शिरपूर अर्थ येथील म्हाळसादेवी, मालेगावची महालक्ष्मी, सटाण्याची महालक्ष्मी, तळवाडे मालेगांवची मनसापुरी, वाघळीची सूर्यमंदिर व मुधई भवानी, बेटावदची जोगेश्वरी माता, वहाळ येथील द्वारजादेवी, वनपट मालेगांवची फुलबाई, कोळेन्हाविची अंबाभवानी, पातोंडा येथील माहिजी, हिंगलाज माता, शिरुडची कालिका, पारोळ्याची झंझणी माता, चारठाण्याची भवानी, सामरादेची रेणुकामाता, उंटावदची सुलाईमाता, चोपडयाची सिध्दांबिका, घाटातली बीजासनी, सुलवाडयाची सुलक्षणामाता, मंदाण्याची शाकंभरी, झोडग्याची सप्तशृंगी, कालिका व धनदाई, करंजगव्हाणची विंध्यासनी, चिराईची चिराईमाता, शिरागडची अंबाभवानी नंदुरबारची संकटीमाता, निजामपूरची म्हसाई, हेडाव्याची चक्कर भवानी, नांदगावची एकवीरा अशा विविध नामरूपातून शक्तीचे एकच तत्त्व वास्तव्य करून आहे. आज कन्या भ्रूणहत्या मानसिकता असलेल्या समाजाला हे शक्तीस्वरूप देवीतत्त्व साद घालत आहे.

# मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी सुकन्या योजना



राज्यातील स्त्री-भ्रूणहत्या रोखणे, मुलींचे शिक्षण व आरोग्य सुधारणे, बालविवाह रोखणे, भविष्यासाठी आर्थिक तरतूद करणे, मुलीच्या जन्माबाबत समाजामध्ये सकारात्मक विचार आणणे, या व्यापक दृष्टिकोनातून सर्व गटातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात जन्मणाऱ्या मुलीसाठी सुकन्या योजना या नावाने नवीन योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली. ही योजना १ जानेवारी २०१४ पासून राबवण्यात येईल.

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीच्या नावे (दोन अपत्यांपर्यंत) २१,२०० रुपये मुलीच्या जन्माच्या एक वर्षाच्या आत आयुर्विमा महामंडळाच्या योजनेत गुंतवून, तिच्या वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर एकूण १ लाख रुपये इतकी रक्कम तिला देण्यात येईल. अतिरिक्त लाभ म्हणून या योजनेसह केंद्र शासनाच्या आम आदमी विमा योजना व त्यात समाविष्ट शिक्षा सहयोग योजनेचासुध्दा लाभ देण्यात येणार आहे. आम आदमी विमा योजनेत या मुलीच्या नावे जमा केलेल्या रकमेतून (कॉर्पस रुपये २१ हजार २००) नाममात्र १०० रुपये प्रतिवर्षी इतका हप्ता जमा करून या मुलीच्या कमावत्या पालकाचा विमा उतरविला जाईल. पालकाचा मृत्यू झाल्यास खालील प्रमाणे रक्कम देण्यात येईल.

नैसर्गिक मृत्यू ३० हजार रुपये, अपघातामुळे मृत्यू/कायमचे अपंगत्व ७५ हजार रुपये, दोन डोळे अथवा दोन अवयव अथवा एक डोळा व एक अवयव अपघातामुळे निकामी झाल्यास ७५ हजार रुपये आणि एक डोळा किंवा एक अवयव अपघातामुळे निकामी झाल्यास ३७ हजार ५०० रुपये.

त्याचप्रमाणे आम आदमी विमा योजनेत समाविष्ट असलेल्या शिक्षा सहयोग योजनेत त्या मुलीला ६०० रुपये इतकी शिष्यवृत्ती प्रती ६ महिने, इयत्ता ९ वी ते १२ वी मध्ये ही मुलगी शिकत असताना दिली जाईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ही बालिका १८ वर्षापर्यंत अविवाहित असणे त्याचप्रमाणे १० वी उत्तीर्ण आणि वडील महाराष्ट्राचे रहिवासी असणे आवश्यक आहे.

या योजनेतील ५७६ कोटी रुपये एवढा निधी अनुसूचित जातींसाठी, वार्षिक १०६ कोटी रुपये इतका निधी विशेष घटक योजनांतर्गत व अनुसूचित जमातीसाठी वार्षिक १६७ कोटी रुपये आदिवासी उपयोजनेंतर्गत आणि सर्वसाधारण गटासाठी वार्षिक ३०३ कोटी रुपये निधी महिला व बाल विकास विभागांतर्गत उपलब्ध करून देण्यात येईल.

### कृषिपंपाचे प्रलंबित वीज बिल



कृषिपंपधारकांनी एप्रिल २०१२ ते जून २०१३ या कालावधीत लागू झालेल्या ५ त्रैमासिक बिलांपैकी २ त्रैमासिक बिलांची रक्कम तातडीने भरावी. उर्वरित ३ त्रैमासिक बिलांची रक्कम ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यांत ३ समान हप्त्यात भरावी, असा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. पहिले बिल भरल्यानंतर थकबाकीसाठी खंडित केलेल्या जोडण्या जोडून देण्याचे निर्देश महावितरणला देण्यात आले आहेत.

कृषिपंपधारकांकडे एकूण ८,५०८ कोटी रुपयांची थकबाकी आहे. मार्च २०१२ पूर्वीच्या थकबाकीबद्दल नंतर निर्णय घेण्यात येणार असून एप्रिल २०१२ नंतरची बिले कृषिपंपधारकांनी भरावी, असा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार ५ अश्वशक्ती जोडभार असलेल्या ग्राहकांनी ५ त्रैमासिक बिलाच्या सुमारे ८,२५० रुपयांपैकी २ त्रैमासिक बिलांचे सुमारे ३,३०० रुपये आणि ३ अश्वशक्ती जोडभार असलेल्या ग्राहकांनी ५ त्रैमासिक बिलाच्या सुमारे ४,२३० रुपयांपैकी २ त्रैमासिक बिलांचे सुमारे १,६९२/- रुपये पहिल्या हप्त्यापोटी भरणे आवश्यक आहे. ५ अश्वशक्ती जोडभार असलेल्यांची उर्वरित रक्कम सुमारे ४,९५०/- आणि ३ अश्वशक्ती जोडभार असलेल्यांची उर्वरित रक्कम सुमारे रू. २,५३८/- ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर या महिन्यांत ३ समान हप्त्यात भरणे आवश्यक आहे. ५ अश्वशक्तीपेक्षा जास्त जोडभार असलेल्या कृषिपंपधारकांनी २ त्रैमासिक बिले तातडीने व उर्वरित ३ त्रैमासिक बिले वरीलप्रमाणे ३ समान हप्त्यात भरावी.

### जनावरांच्या छावण्या ३० सप्टेंबरपर्यंत सुरू ठेवणार



राज्यात पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यात काही ठिकाणी अद्यापही पुरेसा पाऊस न पडल्यामुळे जनावरांच्या छावण्या ३० सप्टेंबरपर्यंत पुढे सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर व दौंड, सातारा जिल्ह्यात फलटण, माण, खटाव तसेच सांगली जिल्ह्यात जत, आटपाडी, कवठेमहांकाळ व तासगाव आणि सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा व पंढरपूर या १३ तालुक्यात जनावरांच्या २२८ छावण्या अजूनही सुरू आहेत. या छावण्यांमध्ये सुमारे १ लाख ७५ हजार जनावरे आहेत. या १३ तालुक्यात सरासरी पावसाच्या तुलनेत ५९ ते ११२ टक्के इतका पाऊस झाला आहे. राज्यात सरासरी १ हजार १५७ मि.मी. पाऊस पडतो, परंतु उपरोक्त तालुक्यांमध्ये २२७ ते ४९६ मि.मी. या दरम्यान पाऊस झाला आहे. हे तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात त्यामुळे यापूर्वी मंत्रिमंडळाने ३१ ऑगस्टच्या पुढे या छावण्या चालू ठेवण्यास मान्यता दिली होती. विभागीय आयुक्तांची शिफारस त्याचप्रमाणे तालुक्यांचे पर्जन्यमान लक्षात घेता या छावण्या पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

### जैविक उत्पादन युनिट उभारणीस अर्थसाहाय्य




राज्य पुरस्कृत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या योजनेसाठी २०१३-१४ मध्ये रु.२५० लक्ष व २०१३-१४ ते २०१७-१८ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी रु.१२५० लक्ष इतक्या रकमेची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. ही योजना त्या-त्या वर्षी उपलब्ध असलेल्या खर्चाच्या मर्यादेत राबवण्यात येणार असून योजना घेताना ज्या जिल्ह्यात एकही युनिट नाही त्या जिल्ह्याला आधी मंजुरी देण्यात येईल. त्यानंतर इतर जिल्ह्यांचा विचार करण्यात येईल. राज्य शासनाच्या औद्योगिक धोरणांतर्गत देय अनुदान लक्षात घेता अनुदानाची एकूण मर्यादा २५ टक्क्यांपर्यंत असेल.

# जादूटोणा प्रतिबंध अध्यादेश

AN ORDINANCE

To bring social awakening and awareness in the society and to create a healthy and safe social environment with a view to protect the common people in the society against the evil and sinister practices thriving on ignorance and to combat and eradicate human sacrifice and other inhuman, evil, sinister and Aghori practices propagated in the name of so called supernatural or magical powers or evil spirits commonly known as black magic by conmen with sinister motive of exploiting the common people in the society and thereby destroying the very social fibre of the society ; and for matters connected therewith or incidental thereto

**अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने राज्यपालांनी जादूटोणा प्रतिबंध अध्यादेश जारी केला आहे. या अध्यादेशास महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अध्यादेश २०१३ असे संबोधण्यात येईल. हा अध्यादेश राज्यपाल के. शंकर नारायणन यांच्या मान्यतेने दिनांक २६ ऑगस्ट २०१३ पासून लागू करण्यात आला आहे.**




**सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ .**

अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून समाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, आणि समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण करण्याच्या व त्याद्वारे समाजाची घडीच विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने भोंदू लोकांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अलौकिक शक्तीच्या किंवा अद्‌भूत शक्तीच्या किंवा भूतपिशाच्च यांच्या नावाने निर्माण झालेल्या नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथांचा मुकाबला करुन त्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने, समाजामध्ये जनजागृती व सामाजिक जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच समाजात निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अध्यादेश.

ज्याअर्थी, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथा, आणि भोंदू लोकांकडून केले जाणारे जादूटोण्याचे व भूतपिशाच्चाचे प्रयोग यामुळे समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण होण्याच्या घटना सातत्याने उघडकीस येत असून त्यांचे प्रमाण अत्यंत भयावह आहे;

आणि ज्याअर्थी, अशा नुकसानकारक प्रथा, चालीरिती, जादूटोणा आणि इतर अमानुष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथा व त्यांचे अनिष्ट परिणाम आणि त्यांचा प्रसार यांना परिणामकारक रीतीने प्रतिबंध घालण्यासाठी व त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती व भोंदू लोकांचा आपल्याकडे अद्‌भूत किंवा चमत्कारी उपाय किंवा शक्ती असल्याचा खोटा दावा आणि त्यांची समाजविघातक व नुकसानकारक कृत्ये यांमुळे समाजाची घडीच विस्कटण्याचा आणि अधिकृत व शास्त्रीय वैद्यकीय उपाय व उपचार यांवरील सर्वसामान्य लोकांच्या विश्वासाला तडा जाण्याचा धोका निर्माण झाला आहे, आणि अज्ञानामुळे ते अशा भोंदूलोकांचा व जादूटोणा करणाऱ्या व्यक्तींचा आश्रय घेत आहेत, अशा परिस्थितीत, अशा जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती व भोंदू लोक यांच्या कुटिल कारस्थांनाना बळी पडण्यापासून

सर्वसामान्य लोकांना वाचविण्यासाठी उचित व कठोर सामाजिक व कायदेविषयक उपाययोजना करणे शासनाला अत्यावश्यक झाले आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत:-

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अध्यादेश, २०१३ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, तत्काळ अंमलात येईल.

२. (१) या अध्यादेशात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) 'संहिता' याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ असा आहे.

(ख) 'नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा' याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने, या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या किंवा वर्णन केलेल्या कृतींपैकी कोणतीही कृती स्वत: करणे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून करवून घेणे किंवा त्या कृती करण्यास इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करणे, असा आहे ;


(ग) विहित याचा अर्थ, या अध्यादेशाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

'प्रचार करणे' याचा अर्थ, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांच्याशी संबंधित किंवा त्याविषयी जाहिरात, साहित्य, लेख किंवा पुस्तक यांचे वितरण करणे किंवा ते प्रसिद्ध करणे, असा आहे आणि त्यामध्ये, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांच्या संबंधातील कोणतेही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपातील साहाय्य, अपप्रेरणा, सहभाग किंवा सहकार्य देणे यांचा समावेश होतो ;

(ड.) 'नियम' याचा अर्थ, या अध्यादेशान्वये केलेले नियम, असा आहे.

(२) यात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना, औषधिद्रव्ये व जादूटोण्याचे उपचार (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम, १९५४ व संहितेमध्ये जे जे अर्थ नेमून देण्यात आले आहेत, ते ते अर्थ असतील.

३. (१) कोणतीही व्यक्ती एकतर स्वत: किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत, या अध्यादेशास जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद किंवा वर्णन केलेल्या, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा करणार नाही किंवा त्यांचे प्रचालन किंवा प्रचार किंवा आचरण करणार नाही किंवा प्रचालन, प्रचार किंवा आचरण, करावयास लावणार नाही.



**(२) हा अध्यादेश अंमलात आल्याच्या दिनांकापासून कोणत्याही व्यक्तीने स्वत: किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा अशा स्वरुपाची कोणतीही कृती केली असेल आणि या अध्यादेशाच्या तरतुदींचे उल्लंघन करुन, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांची जाहिरात, आचरण, प्रचार किंवा प्रचालन केले तर, तो या अध्यादेशाच्या तरतुदींखाली अपराध ठरेल आणि अशा अपराधासाठी दोषी असलेली व्यक्ती, दोष सिद्ध झाल्यानंतर सहा महिन्यांहून कमी नसेल परंतु, सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु, पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.**

(३) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (२) अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही कृतीस किंवा अपराधास अपप्रेरणा देईल किंवा कोणतीही कृती किंवा अपराध करण्याचा प्रयत्न करील, तिने तो अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि दोष सिद्ध झाल्यानंतर, तिला पोट-कलम (२) मध्ये अशा अपराधासाठी जी शिक्षा असेल तीच शिक्षा करण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) खालील शिक्षापात्र अपराध हे दखलपात्र व अजामीनपात्र असतील.

४. कलम ३ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्याय-चौकशी, महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या न्यायालयात चालविण्यात येणार नाही.

५. (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, राज्याच्या कोणत्याही एक वा अनेक पोलीस ठाण्यांत, दक्षता अधिकारी म्हणून ओळखले जाणारे एक किंवा अनेक पोलीस अधिकारी, नियुक्त करता येतील :

परंतु, असा पोलिस अधिकारी हा पोलिस निरिक्षक, गट ब याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल.

(२) दक्षता अधिकाऱ्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील

(एक) त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रामध्ये या अध्यादेशाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन किंवा भंग याचा तपास करणे व त्यास प्रतिबंध करणे, आणि त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्रामधील जवळच्या पोलीस ठाण्याकडे अशा प्रकरणांची तक्रार

दाखल करणे; आणि अशा कृत्यास बळी पडलेल्या कुणाही व्यक्तीने अथवा तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही पोलीस ठाण्याकडे तक्रार दाखल केली असता, त्यावर योग्यरित्या व वेगाने कार्यवाही होईल याची खातरजमा करणे व आवश्यक तो सल्ला, मार्गदर्शन आणि मदत संबंधित पोलीस ठाण्याला करणे ;

(दोन) या अध्यादेशाच्या तरतुदींचे उल्लंघन करणा-या व्यक्तींचा खटला परिणामकारकपणे चालविण्यासाठी पुरावा गोळा करणे ; आणि ज्या क्षेत्रामध्ये असे उल्लंघन झाले आहे किंवा केले जात आहे त्या क्षेत्रातील पोलीस ठाण्यात त्याबाबतची तक्रार दाखल करणे ;

(तीन) यासंबंधात राज्य शासनाकडून, वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे त्याला नेमून देण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

(३) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेला दक्षता अधिकारी आपली पदीय कर्तव्ये किंवा कामे पार पाडत असताना त्यात अडथळे आणणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, दोष सिद्धी झाल्यानंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल एवढया मुदतीच्या कारावासाची किंवा, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढया द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(४) दक्षता अधिकारी, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

६. (१) राज्य शासनाने, याबाबत वेळोवेळी दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांना अधीन राहून, दक्षता अधिकाऱ्याला, त्याच्या अधिकारितेतील क्षेत्राच्या स्थानिक मर्यादेत, त्याच्या क्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्याच्या साहाय्याने.

(एक) या अध्यादेशाखालील अपराध केला आहे किंवा करण्यात येत आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, अशा कोणत्याही ठिकाणी, सर्व वाजवी वेळी, त्यास आवश्यक वाटेल अशा साहाय्यांसह, कोणतेही असल्यास, प्रवेश करता येईल व झडती घेता येईल ;

(दोन) या अध्यादेशाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतीही कृती किंवा गोष्ट करण्यासाठी जे वापरण्यात आले होते किंवा वापरण्यात येत आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, असे कोणतेही साहित्य, उपकरण किंवा जाहिरात जप्त करता येईल ;

(तीन) खंड (एक) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही जागेत आढळलेल्या कोणत्याही अभिलेखाची, कागदपत्राची किंवा इतर महत्त्वाच्या वस्तूची तपासणी करता येईल आणि जर ती या अध्यादेशाखाली शिक्षापात्र असलेला अपराध केल्याचा पुरावा म्हणून सादर करता येईल असे त्यास सकारण वाटत असेल तर, ती जप्त करता येईल.

(२) संहितेच्या तरतुदी, संहितेच्या कलम ९४ अन्वये काढलेल्या अधिपत्राच्या प्राधिकाराखाली केलेल्या कोणत्याही झडतीस व जप्तीस जशा लागू होतील, तशाच त्या, या अध्यादेशान्वये केलेल्या कोणत्याही झडतीस किंवा जप्तीस, शक्य होईल तेथवर, लागू होतील.

(३) जर एखाद्या व्यक्तीने, पोट–कलम (१) च्या खंड (दोन) किंवा (तीन) अन्वये काहीही जप्त केले असल्यास, ती व्यक्ती, शक्य तितक्या लवकर, त्याबाबत दंडाधिकाऱ्यास कळवील व त्याच्या अभिरक्षेसाठी दंडाधिकाऱ्याचे आदेश घेईल.

७. महाराष्ट्र पोलीस अधिनियमाची कलमे १५९ व १६० च्या तरतुदी, दक्षता अधिकाऱ्याने या अध्यादेशांतर्गत सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींना, असा अधिकारी हा जणू काही उक्त अधिनियमांतर्गत पोलीस अधिकारी असल्याचे समजून लागू असतील.

८. या अध्यादेशाखालील अपराधांच्या अन्वेषणाला व न्यायचौकशीला संहितेच्या तरतुदी लागू असतील.

९. या अध्यादेशाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यास पूरक असतील व त्याचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील.

१०. (१) कोणतीही व्यक्ती, या अध्यादेशान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरली असेल त्याबाबतीत, अशा अपराध्याला सिद्धापराध ठरविणारे न्यायालय, असा अपराध जेथे घडला असेल तेथील स्थानिक वृत्तपत्रांमध्ये अशा व्यक्तीचे नाव व निवासाचे ठिकाण आणि अशा अपराध्यास या अध्यादेशाखालील अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती, तसेच, जो तपशील प्रसिद्ध करण्याची परवानगी देणे न्यायालयास योग्य व उचित वाटेल असा अन्य तपशील, पोलिसांकडून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करण्यास सक्षम असेल. – दोष सिद्धीची वस्तुस्थिती प्रसिद्ध करणे.

(२) अशा आदेशाविरुद्ध दाखल केलेले अपील, कोणतेही असल्यास, अंतिमत: निकाली काढण्यात येईपर्यंत, पोट–कलम (१) अन्वये अशी कोणतीही प्रसिद्धी करण्यात येणार नाही.

११. (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अध्यादेशाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, नियम करता येतील.

(२) या अध्यादेशाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात, मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा त्यांचा निर्णय, राजपत्रात अधिसूचित करतील तर, असा निर्णय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा यथास्थिती, अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**अनुसूची**

**(कलम २ (१) (ख)**

१. भूत उतरविण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तीला, दोराने किंवा साखळीने बांधून ठेऊन तिला मारहाण करणे, काठीने किंवा चाबकाने मारणे, तिला पादत्राणे भिजवलेले पाणी प्यायला लावणे, मिरचीची धुरी देणे, त्या व्यक्तीला छताला टांगणे, त्याला दोराने किंवा केसांनी बांधणे, किंवा त्या व्यक्तीचे केस

उपटणे, व्यक्तीच्या शरीरावर किंवा अवयवांवर तापलेल्या वस्तूंचे चटके देऊन इजा पोहोचविणे, व्यक्तीला उघडयावर लैंगिक कृत्य करण्याची जबरदस्ती करणे, व्यक्तीवर अमानुष कृत्य करणे, व्यक्तीच्या तोंडात जबरदस्तीने मूत्र किंवा विष्टा घालणे किंवा यासारख्या कोणत्याही कृती करणे.

२. एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून, त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे ; आणि अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करून लोकांना फसवणे, ठकवणे आणि त्यांच्यावर दहशत बसविणे.

३. अलौकिक शक्तीची कृपा मिळविण्याच्या हेतूने, ज्यामुळे जिवाला धोका निर्माण होतो किंवा शरीराला जीवघेण्या जखमा होतात अशा अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे ; आणि अशा प्रथांचा अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे, उत्तेजन देणे किंवा सक्ती करणे.

**४. मौल्यवान वस्तू, गुप्त धन आणि जलस्त्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी, भानामती या नावाने कोणतेही अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्य आणि जादूटोणा करणे, आणि जारणमारण यांच्या नावाने व त्यासारख्या अन्य कारणाने नरबळी देणे, किंवा देण्याचा प्रयत्न करणे, किंवा अशी अमानुष कृत्ये करण्याचा सल्ला देणे, त्याकरिता प्रवृत्त करणे, अथवा प्रोत्साहन देणे.**

५. आपल्या अंगात अतींद्रिय शक्ती असल्याचे भासवून अथवा एखाद्या व्यक्तीत अतींद्रिय शक्ती संचारली असल्याचा आभास निर्माण करून इतरांच्या मनात भीती निर्माण करणे किंवा त्या व्यक्तीचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे, फसवणे व ठकवणे.

६. एखादी विशिष्ट व्यक्ती करणी करते, जादूटोणा करते किंवा भूत लावते किंवा मंत्रतंत्राने जनावरांचे दूध आटवते, असे सांगून त्या व्यक्तीबाबत तशी समजूत निर्माण करणे, किंवा त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती अपशकुनी आहे किंवा रोगराई पसरण्यास कारणीभूत ठरणारी आहे असे भासवणे, अशा व्यक्तीचे जगणे मुश्कील करणे, त्रासदायक करणे वा कठीण करणे ; एखादी व्यक्ती सैतान असल्याचे किंवा ती सैतानाचा अवतार असल्याचे जाहीर करणे.

७. जारणमारण, करणी किंवा चेटूक केल्याच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, तिची नग्नावस्थेत धिंड काढणे, किंवा तिच्या रोजच्या व्यवहारांवर बंदी घालणे.

८. मंत्राच्या साहाय्याने भूत पिशाच्चांना आवाहन करून, किंवा भूत पिशाच्चांना आवाहन करीन अशी धमकी देऊन सर्वसामान्य जनतेच्या मनात घबराट निर्माण करणे, एखाद्या व्यक्तीला शारीरिक इजा होण्यास भूताचा किंवा अतिंद्रिय शक्तीचा कोप असल्याचा समज करून देणे, आणि तिला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून, त्याऐवजी तिला अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्य वा उपाय करण्यास प्रवृत्त करणे, जादूटोणा अथवा अमानुष कृत्ये करून किंवा तसा आभास निर्माण करून एखाद्या व्यक्तीला मृत्यूची भीती घालणे, शारीरिक वेदना करण्याची किंवा तिचे आर्थिक नुकसान करण्याची धमकी देणे.

९. कुत्रा, साप किंवा विंचू चावल्यास एखाद्या व्यक्तीला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून किंवा प्रतिबंध करून, त्याऐवजी मंत्रतंत्र, गंडेदोरे किंवा यासारखे उपचार करणे.



१०. बोटाने शस्त्रक्रिया करून दाखवतो असा दावा करणे किंवा गर्भवती स्त्रीच्या गर्भाचे लिंग बदल करून दाखवतो असा दावा करणे.

११. (क) स्वत:त विशेष अलौकिक शक्ती असल्याचे अथवा कुणाचातरी अवतार असल्याचे वा स्वत:च पवित्र आत्मा असल्याचे भासवून किंवा त्याच्या नादी लागलेल्या व्यक्तीस पूर्वजन्मी तू माझी पत्नी, पती वा प्रेयसी, प्रियकर होता असे सांगून, अशा व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवणे ;

(ख) मूल न होणाऱ्या स्त्रीला अलौकिक शक्ती द्वारा मूल होण्याचे आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे.

१२. एखाद्या मानसिक विकलांग व्यक्तीमध्ये अलौकिक शक्ती असल्याचे भासवून त्या व्यक्तीचा वापर धंदा किंवा व्यवसाय यासाठी करणे.

## निवेदन

नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा, भोंदू लोकांकडून केले जाणारे जादूटोण्याचे व भूतपिशाच्चाचे प्रयोग यांमुळे समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण होण्याच्या घटना उघडकीस येत असून हे प्रमाण अत्यंत भयावह आहे.

२. अशा अनिष्ट आणि अमानुष प्रथा, इत्यादीबाबत एक विशेष व कठोर कायदा करून त्याद्वारे, या नुकसानकारक व अमानुष प्रथा, जादूटोणा आणि इतर अमानुष, दुष्ट व अघोरी प्रथा व त्यांचे अनिष्ट परिणाम आणि त्यांचा प्रसार यांना परिणामकारक रीतीने प्रतिबंध घालण्यासाठी व त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी, आणि जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती व भोंदू लोकांची समाजविघातक व नुकसानकारक कृत्ये यामुळे समाजाची घडीच विस्कटण्याचा आणि अधिकृत व शास्त्रीय वैद्यकीय उपाय व उपचार यांवरील सर्वसामान्य लोकांच्या विश्वासाला तडा जाण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे आणि ते अशा जादूटोणा करणाऱ्या व्यक्तींचा व भोंदू लोकांचा आश्रय घेत आहेत, अशा परिस्थितीत, अशा जादूटोणा करणाऱ्या व्यक्ती व भोंदू लोकांच्या कुटिल कारस्थानांना बळी पडण्यापासून सर्वसामान्य लोकांना वाचवण्यासाठी अध्यादेश प्रख्यापित करून उचित व कठोर सामाजिक व कायदेविषयक उपाययोजना करणे शासनाला अत्यावश्यक झाले आहे.

३. याकरिता, राज्य विधानमंडळाच्या सन २०११ च्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत विधेयक, २०११ (सन २०११ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१), हे दिनांक १० ऑगस्ट २०११ रोजी विधानसभेत पुर:स्थापित करण्यात आले होते व ते प्रलंबित आहे. तथापि, अंमलबजावणीच्या दृष्टीने, उक्त विधेयकाच्या विवक्षित तरतुदींमध्ये सुधारणा करून कायदा करण्याकरिता अध्यादेश प्रख्यापित करणे

शासनास इष्ट वाटते.

४. **या अध्यादेशाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत –**

(एक) 'नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा' या शब्दप्रयोगाची व्याख्या देऊन, नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट आणि अघोरी प्रथा आणि जादूटोणा यांच्या आचरणावर, प्रचालनावर व प्रसारावर, आणि भोंदू लोकांकडून केले जाणारे अनधिकृत व बेकायदेशीर वैद्यकीय उपचार यांवर बंदी घालण्यात आली आहे. या अध्यादेशान्वये, अशा कृतीस अपराध ठरविण्यात आले आहे आणि जरब बसण्यासाठी असे अपराध दखलपात्र व अजामीनपात्र ठरविण्यात आले असून अशा अपराधांकरिता कठोर शिक्षेच्या तरतूदी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे ;

(दोन) या अध्यादेशाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन होत आहे किंवा कसे, याचा तपास करणे आणि त्याला प्रतिबंध करणे, तसेच या कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर परिणामकारक खटला भरण्यासाठी साक्षीपुरावे गोळा करणे, यांकरिता एक दक्षता अधिकारी असेल, अशी तरतूद करण्यात आली आहे ;

(तीन) या अध्यादेशाच्या तरतुदींखालील अपराध केल्याबद्दल एखाद्या व्यक्तीच्या दोषसिद्धीसंबंधातील तपशील प्रसिद्ध करण्यासंबंधीचे अधिकार न्यायालयाला प्रदान करू शकेल अशी समर्थकारी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे ; आणि

(चार) इतर अनुषंगिक व संबंधित बाबी.

५. राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, एक विशेष व कठोर कायदा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

(दिनांक २४ ऑगस्ट २०१३. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने– सचिव आर. डी. शिंदे यांनी हा अध्यादेश प्रख्यापित केला आहे)



# विज्ञाननिष्ठ समाजसुधारक

विज्ञानवादी समाजसुधारक म्हणून डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची ख्याती होती. समाजाला अवनतीकडे नेणाऱ्या अघोरी प्रथा बंद होऊन विज्ञाननिष्ठ समाजाची निर्मिती व्हावी, हे त्यांचे स्वप्न होते. त्याच्या पूर्ततेसाठी ते आयुष्यभर संघर्ष करीत राहिले. अंधश्रद्धा निर्मूलन म्हटलं की आजही नरेंद्र दाभोलकर यांची प्रतिमा डोळ्यासमोर येते, ते या चळवळीशी किती एकरूप झाले होते याचेच हे द्योतक आहे. त्यांचा स्वभाव संयमी अन् नम्र होता. विचारानेच परिवर्तनाची ज्योत पेटविता येऊ शकते. अशी त्यांची श्रद्धा होती. उत्तम संघटनकौशल्य हा त्यांचा गुण सामाजिक चळवळीत काम करणाऱ्यांना प्रेरणादायी ठरणारा आहे.

डॉ. दाभोलकरांसारख्या पुरोगामी विचारसरणीच्या सुधारकाची हत्या होणं हा महाराष्ट्राला बसलेला जबर धक्का आहे. व्यक्तीची हल्ला करून विचारांची हत्या होत नसते.

महाराष्ट्राला पुरोगामी विचाराची मोठी परंपरा आहे. डॉ. दाभोलकर याच परंपरेचे पाईक होते. अंधश्रद्धांना विरोध करणारी आणि त्यासाठी तरुणांची एक क्रियाशील फळी उभी करणारी अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही संघटना त्यांनी स्थापन केली. संघटनेचे कार्य तळागाळात खेड्यापाड्यापर्यंत पोहचवले. त्यासाठी पुस्तके लिहिली. ते उत्तम वक्ते होते. त्यांचे वक्तृत्व प्रवाही अन् प्रभावी होते. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ आणि जादूटोणाविरोधी कायदा हे देव किंवा धर्माच्या विरोधात नसून देवधर्माच्या नावाने होणारा अन्याय आणि शोषणाच्या विरोधात आहे हे विचार ते उदाहरणांसहित पटवून देत.

डॉ. दाभोलकरांच्या हत्येने महाराष्ट्रातील पुरोगामी विचाराचे कार्यर्ते खचून न जाता त्यांचा विचार व कार्य पुढे नेण्यासाठी सरसावले आहेत. त्यांचा मुलगा हमीद व मुलगी मुक्ता वडिलांचा वारसा पुढे नेत आहेत.

**जडणघडण (१ नोव्हेंबर १९४५ ते २० ऑगस्ट २०१३)**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दाभोली येथील अच्युत लक्ष्मण दाभोलकर व ताराबाई दाभोलकर हे दांपत्य सुमारे १०० वर्षांपूर्वी साताऱ्यात येऊन स्थायिक झाले. त्यांच्या पोटी 1 नोव्हेंबर १९४५ रोजी नरेंद्र दाभोलकर यांचा जन्म झाला. अच्युत दाभोलकर वकील होते. त्यांना एकूण सहा पुत्र व तीन कन्यारत्ने झाली. डॉ.नरेंद्र दाभोलकर नऊ भावंडांमध्ये शेवटचे. नरेंद्र दाभोलकर यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले.

कबड्डीच्या मैदानावर अंगभूत कौशल्याची चुणूक दाखवत त्यांनी व्यक्तिगत कौशल्याची सात सुवर्णपदके मिळवली. क्रीडा क्षेत्रातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार व सामाजिक कार्यासाठी शिवछत्रपती युवा पुरस्कार या राज्यातील सर्वोच्च पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. हे दोन्ही पुरस्कार मिळवणारे ते एकमेव महाराष्ट्रीय नागरिक होत.

मिरजच्या वैद्यकीय महाविद्यालयातून १९७० मध्ये त्यांनी एमबीबीएसची पदवी संपादन केली. त्यानंतर सुरूवातीची १२ वर्षे त्यांनी पत्नी शैला दाभोलकर यांच्या समवेत साताऱ्यात सदाशीव पेठेत वैद्यकीय व्यवसाय केला.

१९७० ते ८२ या काळात त्यांनी समाजवादी युवक दल ही युवा संघटना सुरू केली. त्यामार्फत त्यांनी दलितांना सवर्णांचे पाणवठे खुले होण्यासाठी एक गाव, एक पाणवठा ही चळवळ चालवली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यावे, या मागणीसाठी झालेल्या चळवळीत त्यांना दोन वेळा १५ दिवसांचा तुरुंगवास भोगावा लागला. साताऱ्यातील पुरोगामी विचारांच्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन त्यांनी एकता शिक्षण प्रसारक या संस्थेमार्फत विविध उपक्रम राबविले.

सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांना साहाय्य देण्यासाठी स्थापन झालेल्या सामाजिक कृतज्ञता निधीचे ते संस्थापक-सदस्य होते. छोट्या देणगीतून एक कोटी रुपयांचा निधी उभा करून त्याच्या व्याजातून राज्यभरातील ४५ कार्यकर्त्यांना दरवर्षी १५ हजार रुपये मदत केली जाते.

**– किरण केंद्रे**

जादूटोणा प्रतिबंध अध्यादेश

# दूर करा तुमचे गैरसमज

रंगनाथ नाईकडे

**प्रश्न : लाखो भाविक दरवर्षी पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनाला जातात. हजारो भक्त वारकरी पायीसुद्धा जातात. यामध्ये वारकऱ्यांना शारीरिक त्रास होतो म्हणून जादूटोणा विरोधी कायद्यानुसार त्यांना अटक होईल का ? किमान सहा महिने सरकार त्यांना जेलमध्ये पाठवेल का ?**

**उत्तर :** कोणत्याही देवाची भक्ती, उपासना, प्रार्थना, पूजा करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेनेच दिला आहे. वारकरी संप्रदायाबद्दल महाराष्ट्रात नितांत आदर आहे. त्यामुळे शासन तसा कायदा कधीच करणार नाही. संपूर्ण जादूटोणा विरोधी कायद्याच्या मसुद्यात धर्म, धार्मिक रूढी, धार्मिक परंपरा असा शब्दही कुठे नाही. थोडक्यात पंढरपूरची वारीच नव्हे तर, कोणत्याही भक्तीला, उपासनेला, प्रार्थनेला, पूजेला, विधीला या कायद्यानुसार अटकाव नाही, कुणालाही यासाठी पोलीस अटक करु शकत नाहीत

**प्रश्न : पंढरपूरच्या वारीला जाताना, पायी दिंडीत चालताना, एखादा वारकरी आजारी पडला वा पाय घसरून पडला, एखादा अपघात झाला आणि यामुळे वारकऱ्याचा मृत्यू झाला तर त्या वारकऱ्यावर, त्या दिंडीवर व दिंडीच्या प्रमुखांवर या कायद्यानुसार कारवाई होईल का ?**

**उत्तर :** जादूटोणा विरोधी कायद्याच्या अनुसूचित जी १२ कृत्ये सांगितली आहेत. केवळ त्याच कृती शिक्षापात्र आहेत, इतर कोणत्याही नाहीत. या सूचीत ५ नंबरची कृती आहे. अलौकिक शक्तीची कृपा मिळवण्याच्या हेतूने, ज्यामुळे जिवाला धोका निर्माण होतो किंवा शरीराला जीवघेण्या जखमा होतात अशा अमानूष, अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे आणि अशा प्रथांचा अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे, उत्तेजन देणे किंवा सक्ती करणे. या ५ नंबरच्या कृतीत ज्या गोष्टी बसतील त्याच केवळ शिक्षापात्र असतील. वारीत, दिंडीत वा पायी चालणे हे दुरान्वयानेही या कृतीत बसत नाही. रस्त्यात अपघात होणे, कुणी पाय घसरून पडणे, आजारी पडणे आणि त्यामुळे मृत्यू पावणे हे कोणत्याही अर्थाने या जादूटोणा विरोधी कायद्यानुसार शिक्षापात्र ठरू शकत नाही. पोलीसही असा अर्थ काढू शकत नाहीत. तशी कायद्यात मूभा नाही. त्यामुळे वारकऱ्यांनी वा दिंडीप्रमुखांनी अशी शंका मनात आणण्याचे कारण नाही. हा केवळ अपघात असेल. तो कुठेही घडू शकतो. आपण पायी चालताना, प्रवास करताना असं घडू शकतं.

**प्रश्न : हरिपाठ, कीर्तन, प्रवचने, भजने यावर या कायद्यानुसार बंदी येईल? शिक्षापात्र ठरेल का?**

**उत्तर :** जादूटोणा विरोधी बिलात यावर बंदी वा शिक्षा होईल अशी कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे अशी भीती बाळगण्याचे कारणच नाही.

**प्रश्न : कीर्तनकाराने आपल्या कीर्तनात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम इत्यादी संतांचे चमत्कार सांगितले तर या कायद्यानुसार या कीर्तनकारांवर कारवाई होईल का?**

**उत्तर :** अनुसूची कृती नं.२ 'एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून त्याव्दारे आर्थिक प्राप्ती करणे आणि अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करून लोकांना फसवणे, ठकवणे आणि त्यांच्यावर दहशत बसविणे.' याचा अर्थ हा कायदा लागू झाल्यावर एखाद्या जिवंत व्यक्तीने नुसता चमत्कार केला तरी तो गुन्हा नाही. पण जिवंत व्यक्तीने चमत्कार करून त्यापासून आर्थिक प्राप्ती केली, लोकांना फसवलं, ठकवलं. त्यांच्यावर दहशत बसवली तरच तो या कायद्याने गुन्हा ठरेल आणि अशा व्यक्तीच्या चमत्काराचा प्रचार, प्रसार करणं कायद्यानं शिक्षा पात्र ठरू शकेल. कायदेशीर भाषेत बोलायचं झालं तर हा कायदा लागू होण्याच्या आधीच ज्यांनी चमत्कार केले असतील ते सांगणं, त्याचं वर्णन करणं, प्रचार, प्रसार करणं कायद्यान गुन्हा ठरू शकत नाही.

## महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा



देशाच्या सामाजिक सुधारणांमध्ये महाराष्ट्राच्या समाजसुधारकांचा वाटा फार मोठा आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात व त्यानंतर समाजातील वंचिताकरिता आणि पिढ्यान्‌पिढ्या दबलेल्या माणसांच्या उन्नतीकरिता महाराष्ट्राने केलेले कार्य इतर राज्याच्या तुलनेत उल्लेखनीय आहे. शाहू, फुले, आंबेडकर, गोखले, आगरकर, महर्षी शिंदे, संत गाडगेबाबा, या व अशा अनेक समाजसुधारकांनी समाज उद्धारासाठी व समाज परिवर्तनासाठी केलेल्या कार्याच्या पाऊलवाटने राज्याने आतापर्यंत प्रवास केला आहे. यामुळेच संपूर्ण देशामध्ये एक पुरोगामी राज्य म्हणून महाराष्ट्राची वेगळी ओळख आहे.

२०११ मध्ये 'व्यसनमुक्ती धोरण' जाहीर करून महाराष्ट्र राज्याने आपला वेगळा असा ठसा उमटविला आहे. त्यानंतर यावर्षी मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, जादूटोणा विरोधी कायद्याचा अध्यादेश दि. २६ ऑगस्ट २०१३ रोजी निर्गमित केला आहे. अमानूष, अनिष्ट, दुष्ट व अघोरी प्रथांचा मुकाबला करण्यासाठी व पीडित लोकांची सुटका करण्यासाठी या अध्यादेशाचा मोठा उपयोग होणार आहे. बालविवाह, विधवा पुनर्विवाह, देवदासी या अनेक समाजसुधारणांच्या बाबतीत भूतकाळात घेण्यात आलेल्या पुरोगामी निर्णयांच्या मालिकेत हा जादूटोणाविरोधी निर्णय जाऊन बसला आहे. महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारात हा एक आणखी मानाचा तुरा ठरेल. हा कायदा देशाला भविष्यात दिशादर्शक व प्रेरणादायी ठरेल.

– सामाजिक न्यायमंत्री, डॉ. शिवाजीराव मोघे

**प्रश्न : काही मंदिरे, दर्गे , चर्च भूत घालवण्याची ठिकाणं म्हणून प्रसिद्ध आहेत. हजारोंच्या संख्येने भूत काढण्यासाठी लोक या ठिकाणी येतात. या कायद्यामुळे या सगळ्या ठिकाणांवर कारवाई होणार का? ही स्थळ बंद पडणार का?**

**उत्तर :** अनुसूचीतील नंबर १ नुसार मंदिर, दर्गे वा चर्चमध्ये अथवा घरीसुद्धा जर भूत उतरवण्यासाठी कुणी मंत्र, प्रार्थना, भजन म्हणत असेल वा पूजा, उपासना विधी करत असेल तर तो कायद्यानं गुन्हा ठरणार नाही. पण भूत उतरवण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तीला दोराने, साखळीने बांधणे, मारहाण करणे, मिरचीची धुरी देणे, केसाने टांगणे, शरीरावर चटके देणे, तोंडात मूत्र, विष्ठा घालणे, जबरदस्तीने लैगिंक कृत्य करणे इत्यादी कृती करणे हा कायद्याने गुन्हा ठरवला आहे. अशा कृत्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्यावर आणि त्यांना साहाय्य करणाऱ्यावर कारवाई केली जाईल. त्या व्यक्ती ६ महिने ते ७ वर्ष शिक्षेस पात्र ठरू शकतील. (आणि ५ हजार ते ५० हजार रुपये दंडास पात्र ठरतील.)

**प्रश्न : सार्वजनिक गणेशोत्सव, दुर्गोत्सव, आरत्या, भजनं, गायत्री मंत्र, सत्यनारायण करणे, इतर धार्मिक उत्सव, धार्मिक ट्रस्ट यांच्यावर बंदी येईल का? वैकल्य उपवास नवस बोलणे, मन्नत मागणे इत्यादी शिक्षापात्र ठरेल का ?**

**उत्तर :** प्रश्न क्र. १ चे उत्तर देताना विस्ताराने माहिती दिली आहे. तीच इथे लागू होते. या बाबींवर बंदी येणं किंवा त्या शिक्षापात्र ठरणं शक्य नाही

**प्रश्न : कायद्यात भोंदू लोक असा शब्द आहे त्यांचा सर्वसामान्य धार्मिक लोकांना व अध्यात्मिक लोकांना त्रास होणार नाही का ? भोंदू लोक म्हटल्यावर सारेच कायद्याच्या कक्षेत येतील का?**

**उत्तर :** प्रत्यक्ष कायदा करण्यामागचा उद्येश सांगतांना जी प्रस्तावना आहे, त्यात भोंदू लोक असा शब्द आहे. पूर्वी यात भोंदू वैद्य, आणि भोंदू बाबा असे शब्द होते. मधल्या टप्प्यात भोंदू हा शब्द समाविष्ठ केला होता. उद्देश चांगला होता. इंग्रजीतील QUACKS या शब्दाचं ते मराठी भांषातर होतं. पण भारतात वैद्य परंपरा आहे. गावोगावी झाडपाल्यांची औषध देणारे वैद्य आहेत. भोंदू वैद्य याचा अर्थ सरकारमान्य आयुर्वेदाची (बी.ए.एम.एस.) पदवी नसणारा वैद्य. त्यामुळे हा कायदा परपंरागत वैद्यांना लागू पडत असल्याचा हा गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे व तसा प्रचार करण्याची संधी हितसंबधीयांना मिळणार असल्यामुळे शासनाने भोंदू वैद्य आणि भोंदू बाबा या दोन शब्दाऐवजी 'भोंदू लोक ' शब्द वापरण्याचं ठरवलं. तशी दुरस्ती करण्यात आलेली आहे. अनुसूचीतील १२ बाबीच शिक्षापात्र आहेत. बाहेरची एकही कृती शिक्षापात्र नाही.

**प्रश्न : लहान मुलांचे कान, नाक, टोचतात, जैन धर्मात कडक उपवास करतात. केस उपटून काढतात. यावर कायद्यानं निर्बंध येतील का ? ही कृत्ये शिक्षापात्र ठरतील का?**

**उत्तर :** नाही. जादूटोणा विरोधी गायद्यात कुठेही असे नाही. यात जीव जाण्याची शक्यता नसते. यात जीवघेण्या जखमाही होत नाहीत. त्यामुळे अनुसुचीतील क्र.३ लागू होत नाही.

**प्रश्न : धर्मप्रसार, धर्मप्रचार करण्यावर हा कायदा निर्बंध लादतो. घटनेत धर्म प्रचार स्वातंत्र दिलं आहे, त्यामुळे हा कायदा घटना विरोधी ठरत नाही का?**

**उत्तर :** धर्म प्रचार, प्रसारावर या कायद्याने कुठेही बंदी घातली नाही. तसे जादूटोणा विरोधी बिलात कुठेही नाही.

**प्रश्न : भारतीय दंड विधानातील अनेक कलमांचा वापर करून आजही या (जादूटोणा विरोधी कायद्यात सांगितलेल्या) साऱ्या बाबींना आळा घालता येतो ?**

**उत्तर :** घटना होवूच नये यासाठी या कायद्यातील तरतुदी आहेत. मन परिवर्तनाला जास्त महत्त्व आहे. आपल्या देशात जादूटोण्याच्या संशयापायी हजारो बळी जातात पण जोपर्यंत त्या व्यक्तीस जखमी होण्याइतपत मारहाण होत नाही तोवर पोलिसही दखल घेत नाहीत. परिणामत: जीव गेल्यावरच केस दाखल केली जाते. जादूटोणा विरोधी कायदा नुसता गुन्हा घडल्यावर शिक्षा देण्यासाठीच नाही तर अनेक ठिकाणी प्रतिबंध घालण्यासाठी सुद्धा आहे. त्यामुळं जादूटोणा, करणी करतो असे जाहीर करण्यावेळेपासून कायदा हस्तक्षेप करून पुढे होऊ घातलेल्या घटनेला प्रतिबंध करू शकणार आहे.

**प्रश्न : शाळेत सरस्वती वंदना , हरिनाम सप्ताह, भागवत सप्ताह यावर बंधने येतील का? वटपौर्णिमा , मंगळगौरी , धार्मिक उत्सव, विवाह, उदघाटन, भूमिपूजन , वास्तुशांती यावर प्रतिबंध येतील का ?**

**उत्तर :** जादूटोणा विरोधी कायद्यात वरील गोष्टींवर प्रतिबंध घालण्यासाठी वा बंदी आणण्यासाठी कोणतेही कलम नाही. हा केवळ

**प्रश्न :** देव-देवी अंगात येणं वा ती कुणाचा तरी अवतार आहे असं जाहीर करणं गुन्हा ठरेल का ? अष्टमीच्या दिवशी, मोहरमच्या वेळी अंगात येणं गुन्हा ठरेल काय?

उत्तर : अनुसूची क्र. ५ आपल्या अंगात अतिंद्रियशक्ती असल्याचे भासवून अथवा निर्माण करुन इतरांच्या मनात भीती निर्माण करणे किंवा त्या व्यक्तीचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे, फसवणे, ठकविणे, यानुसारच कारवाई होऊ शकेल. त्यामुळे केवळ अंगात देव, देवी येणं वा कुणाचा तरी अवतार म्हणून जाहीर करणे गुन्हा ठरणार नाही. कारण देव-देवी अंगात येणं हा मानसिक आजारही असू शकतो. अष्टमीच्या दिवशी घागर फुंकणाऱ्या हजारो स्त्रियांच्या अंगात देवी येत असते.मोहरमच्या काळातही असं होतं. या श्रध्देपोटी स्वीकारलेल्या सूचनांचा परिणाम असू शकतो. अंगात येणाऱ्या व्यक्तीला खरंच आपल्या अंगात देव-देवी आली असं वाटू शकतं. इथे कायदा हस्तक्षेप करत नाही. करु शकत नाही. पण अंगात आल्याचा आभास निर्माण करून धमकी देत असेल, फसवत, ठकवत असेल तर मात्र तो गुन्हा ठरेल. आपल्या महाराष्ट्रात आणि देशात जादूटोण्याच्या संशयापायी होणारी मारहाण आणि मृत्यू ही अतिशय गंभीर समस्या आहे. जवळपास अशा ९० टक्क्यांपेक्षा अधिक केसेस मध्ये कुणीतरी जाणत्यानं वा देव-देवी अंगात येणाऱ्यानं अमुकानं तुला करणी केली, असं सांगितलं असत. त्यानंतर सारे नातेवाईक वा सारं गाव एकत्र येऊन त्या तथाकथित करणी करणाऱ्याला मारहाण करतं. काही वेळा त्यात त्याचा मृत्यूही होतो. म्हणून ही बाब अतिशय गंभीर आहे. अशांना आळा घालणं सरकारचं कर्तव्यच आहे. वस्तुस्थिती अशी आहे की या जगात कुणीही कुणाला करणी, जादूटोणा करूच शकत नाही.

अपप्रचार आहे.

**प्रश्न : गळ्यात, हातात गंडेदोरे , ताईत, अंगठ्या, जाणवे घालणे, बोटात ग्रह खड्यांच्या अंगठ्या घालणे वगैरे गुन्हा ठरेल काय ?**

**उत्तर :** नाही. कायद्यात तसं कुठेही म्हटलेलं नाही.

**प्रश्न : अनेक धार्मिक उत्सवात निखाऱ्यावर चालण्याची प्रथा आहे. त्यावर बंदी येणार का? पोतराज चाबूक मारून घेतात, तो गुन्हा ठरेल काय?**

**उत्तर :** माणसाची कातडी निखाऱ्यामुळं किंवा अंगावरून जळते पलिते फिरवल्यामुळे ३ ते ४ सेकंद जळत नाही. पोळत नाही. (१२०० फॅरेनहीटपेक्षा अधिक उष्णता असली तरच तत्काळ जळते) या विज्ञानाचा उपयोग करून हे प्रयोग अनेक धार्मिक उत्सवात केले जातात. कार्यकर्त्यांनी हजारो कार्यक्रमास जाहीररीत्या हे करून दाखवलं आहे. हजारो सामान्य नागरिक आणि शाळेतील विद्यार्थ्यांकडून हे प्रयोग करून घेतले आहेत. पोतराजाने चाबूक मारून घेणे यात केवळ कौशल्य आहे, धोका नाही. दोन्ही गोष्टीत जिवाला धोका नसल्यामुळं अनुसूची क्र.३ लागू होणार नाही. गुन्हा ठरणार नाही.

**प्रश्न : वास्तुशास्त्र सांगणे, त्यानुसार घरात बदल करणे, कुडमुडे ज्योतिषी, जोशी, नंदीबैलवाले ज्योतिषी, इतर ज्योतिष्यांच्या भविष्य कथनावर बंदी येणार का? गृहशांती इत्यादीवर बंदी येणार का?**

**उत्तर :** जादूटोणा विरोधी बिलात असे काहीही नाही. यावर बंदी येणार नाही.

**प्रश्न :** हा कायदा केवळ हिंदू विरोधात आहे. इतर धर्मीयांना हात लावण्याची या सरकारची हिम्मत नाही.

**उत्तर :** या कायद्याच्या प्रारूपात कुठेही धर्माचा, कोणत्याच धर्माचा उल्लेख नाही. हा कायदा भारतीय नागारिकांना महाराष्ट्राच्या सीमा मर्यादेत लागू होणार आहे. अनुसूचीतील १२ बाबी आपण काळजीपूर्वक वाचल्या तर आपल्या लक्षात येईल की केवळ जिथे माणसांची लुबाडणूक होते, छळ होतो, अथवा जीव जाऊ शकतो, याच ठिकाणी कायद्याव्दारे शासन हस्तक्षेप करते आहे. केवळ जनतेच्या हितासाठी हा कायदा आहे. यातील १२ ही बाबी सगळ्याच धर्मात जन्मलेल्या लोकांना लागू होतात. जशी भारतीय दंड विधानची कलमं साऱ्यांनाच लागू होतात, तशीच अनुसूचीतील १२ बाबी सर्वच धर्मियांमध्ये भारतात तरी आढळतात.

**प्रश्न : कुत्रा, साप, विंचू चावल्यावर मंत्र टाकले, पारंपरिक मंत्रादी उपचार केले, रोग दुरुस्तीसाठी मंत्र उपचार केले तर कायद्यानं गुन्हा ठरेल काय ?**

**उत्तर :** अनुसूची क्र. ८,९ नुसार वरील बाबींसाठी मंत्रादी उपचार करणे गुन्हा नाही, पण वैद्यकीय औषधोपचार रोखून अथवा वैद्यकीय औषधोपचारास प्रतिबंध करुन कुणी मंत्र उपचार केले तरच कायद्यानं गुन्हा ठरेल. वैद्यकीय उपचार सुरु असताना अथवा त्या सोबत मंत्रादी उपचार केल्यास गुन्हा ठरणार नाही. यामध्ये केवळ माणसाचे जीव वाचविण्याचा शासनाचा उद्देश आहे. मंत्रोपचारांना विरोध करण्याचा नाही.

**प्रश्न : जमीनीखालचं पाणी सांगणारे पाणके, पानाडी, डाऊझिंग करणारे दोषी ठरतील का?**

**उत्तर :** नाही, तशी तरतूद या कायद्यात नाही.

**प्रश्न : गणपती दुर्गा, गौरी, ताजिया, ताबूत पाण्यात शिरवणे, निर्माल्य नदीत, तलावात शिरवणे कायद्याने गुन्हा ठरेल काय?**

**उत्तर :** नाही, जादूटोणा विरोधी बिलात असे कोणतेही प्रावधान नाही.

**प्रश्न :** मुंबईच्या लोकलमध्ये बंगाली बाबांचे जाहिरातीचे पोस्टर्स लागले असतात. ते या कायद्याखाली येऊ शकतील का?

**उत्तर :** हो, मोठ्याप्रमाणावर ते या कायद्याखाली येऊ शकतील. पण अनुसूचीतील १२ पैकी एखादी दुसरी बाब प्रत्यक्षात करतानाचे पुरावे गोळा करावे लागतील. त्यानंतर पोलीस प्रभावीपणे कारवाई करू शकतील.



**अनुसूचीतील तरतूदी**

अनुसूचितील काही क्लिष्ट बाबींचा खुलासा पुढीलप्रमाणे आहे. १) च्या तरतुदीमधील जर भूत उतरवण्यासाठी प्रार्थना, मंत्र म्हटले, पूजा केली तर गुन्हा नाही. २) अनुसुचतील क्रं. २ च्या तरतुदीमध्ये हे बिल लागू झाल्यानंतर जो चमत्कार करून फसवेल, ठकवेल तोच फक्त या कायदयाच्या कक्षेत येईल. आधीच्या लोकांवर कारवाई होणार नाही. ३) अनुसुचितील क्रं. ६ ची तरतूद विचारात घेता जादूटोणा संशयापायी किंवा गैरसमजामुळे अनेकांना फार त्रास होतो, त्यांचा छळ होतो, त्याच्यावर सामाजिक बहिष्कार होतो व अनेकदा त्याची परिणती हत्याकांडात होऊ शकते. ही एक सामाजिक गंभीर समस्या आहे. म्हणून मनुष्याचा जीव वाचवण्याची ही महत्त्वाची तरतूद आहे. ४) अनुसूचितील क्रं . ९ च्या तरतुदीवर विचार करता बोटाने शस्त्रक्रिया करण्याचे दावे करणे हा गुन्हा आहे. यामुळे अनेकदा लोक शस्त्रक्रिया करीत नाही. याची परिणती मृत्यूत होते. गर्भवती स्त्रियांच्या गर्भाचे लिंग बदलण्याचा दावा करणे ही अशक्य गोष्ट आहे व त्याला वैज्ञानिकदृष्ट्या काहीच आधार नाही. वैद्यकीय उपचार घेताना मंत्रतंत्राने उपचार केले तर गुन्हा नाही. विषारी साप चावला तर अॅन्टीव्हेनम इंजेक्शन, रेबीज निर्माण करू शकणारा कुत्रा चावला तर अँटी रेबिज इंजेक्शन व कोकणातील मोठा विंचू चावला तर वैद्यकीय उपचार माणसांचे प्राण वाचवू शकतात. प्राण वाचावेत, अंधश्रद्धेपायी लोक मरू नयेत म्हणून ही तरतूद आहे. ५) अनुसूचितील क्रं . ११ (ख) मधील तरतूदीनुसार मूल न होणाऱ्या स्त्रियांना अलौकिक शक्तीद्वारे मूल होण्याचे आश्वासन देऊन तिच्याशी लैगिंक संबंध ठेवणे हा गुन्हा आहे. यामुळे अनेक स्त्रियांचे दीर्घकाळ लैंगिक शोषण होते. ६) अनुसूचितील क्रं. १२ मधील मतिमंद व्यक्तींवर गुन्हा दाखल होणार नाही मात्र अलौकिक शक्ती असल्याचे भासवून त्याचा वापर धंदा किंवा व्यवसाय करेल त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो. अनूसूचीतील हया १२ बाबींविषयी कृती करणे गुन्हा ठरणार आहे. या बाहेरील एकाही गोष्टीचा, रूढी, पंरपरेचा यामध्ये अंतर्भाव असणार नाही. ज्या गोष्टींमुळे सर्वसामान्य माणसांचा जीव जाऊ शकतो, जिवाला धोका निर्माण होऊ शकतो, लुबाडणूक, फसवणूक होऊ शकते, अशाच अघोरी कृत्यांबद्दल हा कायदा हस्तक्षेप करणार आहे. अशा कायद्याला कोणताही सुबुद्ध माणूस विरोध करणार नाही.



**संपर्क : ९८२११०७५७४**

# दृष्टिक्षेपात नाशिक विभाग

- नाशिक येथे यशंवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञानपीठ असून जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आहे . अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ आहे
- २०११-१२ अखेर विभागत १४३१७ प्राथमिक शाळा,३९२२ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,२४९ उच्च शिक्षण संस्था, ४१४ आदिवासी आश्रमशाळा व १४५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत
- नाशिक येथे पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी महाराष्ट्र पोलीस अकादमी आहे. मेरी या नावाने प्रसिध्द असलेली महाराष्ट्र राज्य अभियांत्रिकी संशोधन संस्थाही नाशिक येथे कार्यरत आहे
- अहमदनगर येथे लष्कराचा वाहन संशोधन व विकास विभाग असून या विभागाच्या मान्यतेशिवाय कोणतेही वाहन भारतीय लष्करासाठी खरेदी करता येत नाही . देवळाली येथे कटक मंडळ असून सैनिकी प्रशिक्षणाचे केंद्र आहे
- ओझर (मिग) येथे विमानांचा कारखाना (एच.ए.एल) असून वायू सेनेकडे असलेल्या विमानांची दुरुस्ती करण्याचे काम ११ बेस रिपेअर डेपोत केले जाते
- एकलहरे येथे औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र असून तेथे निर्मिती केली जाणारी वीज महाराष्ट्रात तसेच इतर राज्यांना पुरविली जाते
- भारत सरकारचे भारत प्रतिभूती मुद्रणालय व चलर्थपत्र मुद्रणालय नाशिकरोड येथे आहे
- धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे सोने शुद्धीकरण कारखाना आहे
- नाशिक शहरालगत अंबड, सातपूर, गोंदे तसेच सिन्नर तालुकयात माळेगाव व मुसळगाव येथे औद्योगिकवसाहती असून सिमेन्स, बॉश, स्नायडर, महिंद्रा,एबीबी, लार्सन ॲण्ड टुब्रो, ॲटलस, कॅम्फ्को, गरवारे, मायलन, जिन्दाल, शालीमार पेन्ट्स, सॅमसोनीइट, व्हीआयपी, रेमन्ड इत्यादी नामांकित उद्योग आहेत
- विभागामध्ये एकूण १००६ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग असून भुसावळ,मनमाड व इगतपुरी ही मोठी जंक्शन्स आहेत
- रस्त्यांची एकूण लांबी ४९१६३ कि.मी. असून त्यापैकी ४४३५५ कि.मी. पृष्ठांकित रस्ते आहेत
- नाशिक येथील भारतातील पहिल्या स्ट्रेडेड व राज्यातील सर्वात मोठया सहा कि.मी. लांबीच्या उड्डाणपुलामुळे मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक सुरळीत होण्यास मोठी मदत झाली आहे



नाशिक येथे दर १२ वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा भरतो . पुढील कुंभमेळा जुलै २०१५ मध्ये भरणार आहे .

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, September 2013.
Date of Publication : 10th of every Month


# घरोघरी लोकराज्य

सुमारे चार लाख प्रतींचा खप असणारे देशातील एकमेव मासिक
संपूर्ण रंगीत छपाई आणि आकर्षक मांडणी

शेतकरी, शेतमजूर, कामगार, उद्योजक, अध्यापक, विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, महिला, डॉक्टर्स, शासकीय कर्मचारी, इंजिनिअर्स, पत्रकार, वकील, लोकप्रतिनिधी अशा सर्वांच्या जिव्हाळ्याच्या विषयांचा वेध साध्या आणि सोप्या शब्दात

- जाणकारांचे लेख
- यशस्वीतांच्या कथा
- तज्ज्ञांच्या मुलाखती
- उपयुक्त सूचना

संग्राह्य विशेषांक : एखाद्या विषयाचा सर्वांगीण आढावा घेणारे




केवळ अधिकृतच नव्हे तर, उपयुक्त आणि वाचनीय माहिती !

वार्षिक वर्गणी रू. १००/-

लोकराज्य
आजच्यासाठी आणि उद्यासाठीही ! !


O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे